म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. ३७५



REFBK-0004510
REFBK-0004510

काव्यकर्ता,

**मोरेश्वर विठ्ठल जोशी.**

# श्रीछत्रपतिकाव्य

१

## आद्यपर्व

हें काव्य

**मोरेश्वर विठ्ठल जोशी**

ह्यांनीं रचिलें

व

तें मुलुंड येथें प्रसिद्ध केलें.

REFBK-0004510

REFBK-0004510

मुद्रक

**मंगेश नारायण कुळकर्णी,**

कर्नाटक प्रेस, ३१८ ए, ठाकुरद्वार, मुंबई.

शके १८५२ ] किंमत १२ आणे. [ सन १९३१

संकाग्र. १०३५
१०/८/३२

दा. क्र. ४५७०

ह्या पुस्तकाच्या पुनर्मुद्रणाचे वगैरे सर्व प्रकारचे हक्क ग्रंथकर्त्यानें आपणाकडे राखून ठेविले आहेत.

नोंद नं. ६७७८

श्री

# अर्पणपत्रिका

श्रीशिवछत्रपतीच्या वंशीं बहु जाहले महाराजे ।
दाते त्राते ऐसे पात्र खरे गंधकुसुमहारा जे ॥ १ ॥

क्षत्रियकुलावतंस श्रीछत्रपति प्रभू महाराज ।
राजाराम करितसे अपुलेंसें जें निजप्रजाकाज ॥ २ ॥

करवीराधिप तो त्या वंशा भूषवि सुख प्रजेला हो ।
म्हणुनि झटे बहु संप्रति देवा! चिरकाल तो प्रजे लाहो ॥३॥

तत्पद्कमलीं सादर मी आर्यारूपि अर्पि हीं कणसें ।
मम गुरु विठ्ठल जोशी, मोरेश्वर नांव, गांव धामणसें ॥४॥

सं.क्र. १०३८ ता. २०/८/३२

श्री

# प्रस्तावना

क्षत्रियकुलावतंस श्रीछत्रपति शिवाजी महाराज ह्या महाप्रतापशाली राष्ट्रीय वीराच्या–राष्ट्रीय विभूतीच्या चरित्राचा अनेक दृष्टींनीं विचार करून पहातां त्याच्या तोडीचा दुसरा पुरुष अलीकडील ऐतिहासिक काळांत तरी पृथ्वीवरील चारही खंडांत जन्मास आलेला नाहीं. अमर्याद बिनहरकत पसरत जाऊन युरोप-खंडाला स्पेनपर्यंत व्यापून टाकीत जाणाऱ्या तसेंच आशियाखंडांत हिंदुस्थाना-पर्यंत येऊन पोहोंचलेल्या मुसलमानी सत्तेला शिवरायानें शह देऊन पायबंदही दिला आणि तिला एका मर्यादित क्षेत्रांत आणून स्तंभित करून ठेविलें. शिवरायानें आमच्या राष्ट्रांत नूतन जोमाचा, नूतन स्फूर्तीचा संचार करून दिला, नवीन शक्ति व नवीन तेज निर्माण करून आत्मविश्वास उत्पन्न केला. थोडक्यांत सांगा-वयाचें म्हणजे त्यानें आमच्या राष्ट्राच्या प्राणाचें संरक्षण केलें; म्हणूनच श्रीसम-र्थांनीं "शिवरायाचा आठवावा प्रताप" अशा प्रकारचा अत्यंत स्फूर्तीचा व जिव्हाळ्याचा उपदेश करून ठेविलेला आहे.

शिवरायाच्या बापानें अलोट संपत्ति व जहागीर मिळविली होती. त्या साध-नांवर शिवरायाला हवीतशी यावज्जीव चैन करितां आली असती, पण यवनांच्या मगरमिठींतून स्वदेश सोडवून व स्वधर्मांची विटंबना करणारांचा उच्छेद करून त्यानें स्वधर्माची व स्वराज्याची स्थापना करण्यासाठीं सुखोपभोगावर लाथ मारिली, एवढेंच नव्हे तर स्वतःच्या जीविताची पर्वा न करितां तें कित्येक वेळ धोक्यांत टाकिलें; आणि विशेष हें कीं असें करीत असतांना वडील पूज्य माण-सांचा त्यानें कधींहि अनादर केला नाहीं. अशा पुरुषाबद्दल कल्पनातीत आदरभाव हिंदूंना वाटावा हें साहजीकच आहे व तो व्यक्त करण्यासाठीं कांहींनीं शिवरा-याचीं चरित्रें लिहिलीं, कांहींनीं पोवाडे रचले, कांहींनीं पुतळे उभे केले, कांहींनीं निरनिराळ्या प्रकारचीं स्मारकें उभारलीं, कांहींनीं त्याचें नित्यस्मरण व दर्शन

व्हावें म्हणून आपआपल्या घरांत तसबिरी लाविल्या व कांहींनीं उत्सव सुरू केले. एवंच अनेक प्रकारें राजेरजवाड्यांपासून तों रंकापर्यंत आपआपले शक्त्यनुसार सर्वांनीं शिवरायाबद्दल असलेला आपला आदरभाव प्रकट केला आहे व तो ते अजूनही करीत आहेत.

आपणहि आपले शक्त्यनुसार शिवरायाबद्दलचा आदरभाव प्रकट करावा अशी माझे मनाला स्फूर्ती झाल्यामुळें शिवरायाचें काव्यबद्ध चरित्र लिहिण्याचा मी संकल्प केला व तें आर्याछंदांत लिहावें असें ठरविलें.

आर्याछंदांत सर्व चरित्र थोडक्यांत आणावयाचें म्हटलें तरी कमींत कमीं पांच सहा हजार आर्या होतील. त्या सर्व आर्या एकाच पुस्तकांत छापण्यापेक्षां त्या खंड करून छापणें अधिक सोईवार म्हणून ह्या काव्याची निरनिराळ्या पर्वांत विभागणी करून पहिल्या पर्वांत चार प्रकरणें दिलीं आहेत. शिवरायाच्या बाळपणच्या तसेंच त्याच्या शिक्षणाबद्दलच्या माहितीचें भरपूर वर्णन आज उपलब्ध नाहीं. श्रीशिवभारत, श्रीयुत केळुसकर व साने या विद्वानांनीं लिहिलेलीं शिवरायाचीं चरित्रें तसेंच श्रीयुत बापटकृत ' राजगुरु दादोजी कोंडदेव आणि छत्रपति शिवाजीमहाराज ' या पुस्तकांचा आधार घेऊन हीं प्रकरणें रचिलीं आहेत. शिवरायाच्या जन्मतिथीबद्दल अजून वाद आहे पण मला श्रीशिवभारतांत लिहिलेली तिथीच विश्वसनीय आहे असें वाटल्यावरून त्याच तिथीस शिवरायाचा जन्म झाला असें पहिल्या अध्यायांत सांगितलें आहे.

श्रीशिवभारतामध्यें शिवाजी हा विष्णूचा अंश आहे व त्यानें माता जिजाई हिचे पोटीं जन्म घेतला असें वर्णन केलेलें आहे. तोच आधार घेऊन पहिल्या अध्यायांतील ६२ आर्येच्या पुढील जन्मासंबंधीच्या आर्या मी रचिल्या आहेत. शिवरायाचीं चरित्रें जीं प्रसिद्ध झालीं आहेत त्यांमध्यें शिवरायाचे आजोबा मालोजीराजे यांस ' आपण भोंसले कुळांत जन्म घेऊन स्वराज्य व स्वधर्मस्थापना करणार आहों ' असें शंकरांनीं स्वप्नांत येऊन सांगितलें, अशाप्रकारचें वर्णन केलेलें आहे. यास्तव शिवाजीराजे हे शंकराचे अवतार होत असें कित्येक ग्रंथकार म्हणतात; पण पृथ्वीवर अवतार घेऊन कार्य करण्याचें काम श्रीविष्णूच करीत असतो अशी समजूत असल्यामुळें शिवराय हे विष्णूचेच अंश आहेत असें धरून त्याप्रमाणें आर्या रचिल्या आहेत.

हें चरित्र आर्याछंदांतच लिहिण्याचें कारण मुख्यतः असें कीं सामान्य वाचक अथवा विद्यार्थीवर्ग यांना सहज दुसऱ्याच्या मदतीशिवाय तें सरस रीतीनें म्हणतां येऊन पाठ करण्यालाही आर्यावृत्त सोपें पडतें व कानालाही तें मधुर लागतें हें होय. ही वेडीवांकडी पण भक्तिभावानें गाइलेली शिवरायाची कथा जनतेपुढें ठेवीत आहें. पुढील पर्वेंहि प्रसिद्ध करण्याचा माझा विचार आहे, पण तो योग लवकर येणें न येणें हें लोकांच्या अभिरुचीवर अवलंबून आहे.

त्यापूर्वी वाचकवर्गाकडून कांहीं सूचना आल्यास त्यांचा जरूर आदरपूर्वक साभार स्वीकार केला जाईल.

हें पर्व प्रसिद्ध करण्याचे कामीं ज्यांनीं ज्यांनीं मला मदत केली त्या सर्वांचा मी फार आभारी आहें.

मु॥ व पोस्ट मुलुंड, जिल्हा ठाणें.
मि॥ श्रावण शु॥ १ शके १८५३.

**मोरेश्वर विठ्ठल जोशी.**

ह्र्र्र

# श्रीछत्रपतिकाव्य

स क्रमांक. १०३२
१०/८/३२
क्र. ४९१०

## आद्यपर्वाची अनुक्रमणिका



| अध्याय | विषय | आर्या-संख्या | पृष्ठांक |
|---|---|---|---|
| १ | श्रीशितिकंठ—श्रीगजमुख-सरस्वती—व्यासादि मुनि—कवि भास कालिदास—श्रीशिवराय—नमन (१–६) पुण्यभरतभूमीचें श्रेष्ठत्व ( ७–१६ ) पैगंबरानुयायांचें आक्रमण; त्यांनीं केलेला धर्माचा उच्छेद (१७–२७) धर्मसंस्थापनार्थ परमेश्वरांचें अभिवचन (२८) शिवरायाच्या भोंसले घराण्याची कुलपरंपरा (२९–४२) जाधवरावाची कन्या जिजाई व शहाजी यांची विधिलिखित विवाह योजना (४३–६१) जिजाईची देवाच्या व पतिच्या ठिकाणीं भक्ति; स्वप्नांत हरिदर्शन ( ६२–६७ ) जिजाईचें दोहद ( ६८–७१ ) निजामराज्याच्या घडामोडीच्या काळांत शहाजी गर्भवती जिजाईस शिवनेरी किल्ल्यांत ठेवून मोगलांबरोबर लढण्यास निघून जातो (७२-७५) जिजाईचा शिवाईदेवीला नवस (७६) श्रीशिवरायांचा जन्म—दानधर्म वगैरे ( ७७–९४ ) षष्ठीपूजन व बारशाचा समारंभ (९५–१०२) शिवरायाच्या कुंडलीवरून ज्योतिषांनीं केलेलें भविष्य ( १०३–१०७ ) शिवरायाचें बाल- | | |

| अध्याय | विषय | आर्या-संख्या | पृष्ठांक |
|---|---|---|---|
| | सौंदर्य व बाळलीला (क्रीडा) (१०८–१४४) शिवरायाचे बाळपणींचे खेळ (१४५–१५२) शिवरायाची गोसेवा (१५३–१५४) शिवरायाचें बाळपणचें शारीरिक, बौद्धिक, धार्मिक व क्षात्रधर्मविषयक शिक्षण (१५५–१७५) शहाजीला स्वप्नांत गिरीश-दर्शन व त्यांनीं दिलेली आज्ञा (१७६-१७७) शिवरायाची बाराव्या वर्षीं पुण्यास रवानगी. हिंदुराष्ट्र तारावें अशी त्याची प्रबळ इच्छा (१७८) | १७८ | १–३६ |
| २ | मोंगलांनीं निजामशाहींत खळबळ उडवून जोराचे हल्ले केले. माहुली-किल्ल्याला वेढा दिला. गर्भवती जिजाई आपलेबरोबर आंत अडकल्यामुळें शहाजीस चिंता. वेढा दिलेल्या मोंगलांबरोबर तुंबळ युद्ध. निजामाची आई फितुर झालेली पाहून शहाजी मुलाला व बायकोला बरोबर घेऊन फळी फोडून बाहेर पडतो (१–२४) प्रवासांतील गर्भवतीच्या वेदना पाहून शहाजी चिंतेंत पडतो (२५–३१) गर्भवतीला शिवनेरीस ठेऊन शहाजी मोंगलांबरोबर लढण्यास निघून जातो (३२–३४) स्वत: जाधवरावच जांवयाचा सूड घेण्याकरितां मोंगलसैन्यानिशीं किल्ल्याजवळ येऊन थडकतो (३५–४०) तो किल्ल्यावर घुसत असतांना त्याला तेथील शिष्ट जनांनीं | | |

| अध्याय | विषय | आर्या-संख्या | पृष्ठांक |
|---|---|---|---|
| | युक्तिवादानें अडविल्यामुळें त्याचा अविचार नष्ट होऊन मनांत द्रवतो व त्याला पश्चात्ताप होतो ( ४१–५४ ) किल्ल्यावर जिजाईचे ठिकाणीं वीरपत्नी व सुताधर्म एकदम प्रगट होतात ( ५५–६३ ) जाधवराव तिचें समाधान करितो ( ६४–७२ ) जिजाईचा पतिसेवाधर्म व शिवनेरीवर रहाण्याचा निश्चय ( ७३–७८ ) बाप निघून जातो पण दोघांचींहि मनें अस्वस्थ ( ७९–८१ ) शुभसमयीं शिवरायाचा अवतार ( ८२–८७ ) | ८७ | ३७-५१ |
| ३ | शहाजीराजांच्या चित्ताची अस्वस्थता व विचाराची अनिश्चित दिशा—निजामशाही पुनः सांवरण्याची चिंता—ती सोडून कोणाचेंहि अंकित न राहाण्याचा शहाजीचा विचार—पुनः निजामशाही स्थापण्याचा त्याचा विचार—प्रतिकूळ दैवामुळें दोन्ही विचार बाजूस ठेवून विजापूरच्या अदिलशाहीचा तो अंकित होतो ( १–१४ ) शहाजीनें पहिल्या ६।७ वर्षांत पुष्कळ पराक्रम करून अदिलशहाची पूर्ण मर्जी संपादन केली; जहागीर, धन व कीर्ति मिळविली (१५–१८) शिवबाळाचे मनांत यवनद्वेष पूर्ण दृढ होतो ( १९–२१ ) शिवबाळाच्या गुण-रूप-शीलानें अमीर-उमराव व खुद्द अदिलशाहा मोहित होतात | | |

| अध्याय | विषय | आर्या-संख्या | पृष्ठांक |
|---|---|---|---|
| | व त्याला पहावयास शाहा बोलावितो (२२-२६) शहाचे दरबारांत आपणास नेणार हा शहाजीराजांचा बेत कळतांच शिवाजी मनांत संतप्त होतो व आपणास दरबारीं नेऊं नये व नीच व दुष्ट यवनांचा सहवास नको वगैरे गोष्टी स्पष्टपणें साहस करून शहाजीराजांना कळवितो ( २७–३५ ) शहाजीला शिवबाच्या यवनद्वेषातिरेकाची चिंता पडून तो त्याला बोधानें व युक्तिवादानें वळविण्याचा प्रयत्न करतो ( ३६–५३ ) बापाचा हा शुद्धभाव पाहून शिवबाच्या मनांत काहूर उठतें व त्याचें मन द्रवतें पण उलट तो युक्तिवादहि करितो. शिवबा सात दिवस दरबारांत जातो पण बादशहास कुरनिसात न करितां साधा सलामच करितो ( ५४–६८ ) कुरनिसात न करितां साधा सलाम करितो हें जाणूनबुजून नव्हे वगैरे बादशाहास सांगून शहाजी वेळ निभाऊन नेतो ( ६९–७० ) शहाजी पुनः विचारांत पडून शिवबाला पुनः बोध करितो–शिवबाही युक्तिवाद करितो व दरबारीं येऊन शहास खुष करितों असें सांगतो ( ७१–८१ ) शिवबानें दरबारीं जाऊन समयोचित असें वर्तन करून आपल्या दिव्य तेजानें बापाची व शहाची | | |

| अध्याय | विषय | आर्या-संख्या | पृष्ठांक |
|---|---|---|---|
| | कोंडी फोडिली व विलक्षण युक्तिवादानें शहाला निरुत्तर केलें व शिवाजीचा शहान गौरव केला ( ८२–९५ ) | ९५ | ५२-६५ |
| ४ | कुटुंबभारामुळें दादोजी कोंडदेव शहाजीराजाकडे आले व त्यांनीं त्यांना आश्रय दिला ( १–७ ) दादोजीनें शहाजीराजांचा विश्वास बसवून घेतल्यामुळें जहागिरीची व्यवस्था पहाण्यासाठीं शहाजी त्यांना पुण्यास पाठवितो ( ८–९ ) योग्य वेळीं त्यांनीं शिवबाला युवराजाला योग्य असा उपदेश केला कीं:—प्रातःकाळीं हरिहरनामाचें स्मरण करून त्याला नमन करावें; कालपाशाचें स्मरण ठेऊन प्रतिदिनीं सुकीर्ति जोडाया कार्यें करावीं. कोणालाहि खरा न्याय द्यावा; विचारानें वचन देऊन तें हरिश्चंद्रराजाप्रमाणें पाळावें; ( १०–२२ ) पराक्रमाच्या क्रीडा कराव्या, शस्त्र-अभ्यास करावा; मृगया, शरसंधानादि क्षत्रियांना विहित अशीं कर्में करावींत; रोजच्या वागण्यांत नियमितपणा असावा; अन्याला तुच्छ मानूं नये; मी मोठा म्हणून मिरवूं नये; मन लहरी नसावें; सज्जनांचें चरित्र गिरवावें; कुल, शील, तारुण्य असलें तरी गर्व नसावा; पूर्वजांचे इतिहास वाचून तरण्याचे उपाय शोधून काढावेत; विभवें | | |

| अध्याय | विषय | आर्या-संख्या | पृष्ठांक |
|---|---|---|---|
| | फुगूं नये; प्रपंच अक्षक्रीडेसम मानावा; ( २३–३७ ) वर्तन धर्मासम शुद्ध असावें; दुर्जन परित्यजावे; वृथा वैर करूं नये; परधन-परदाराभिलाषिता बाळगूं नये; परमेशपदीं अढळ निष्ठा असावी; वाणी गोड असावी; अपकीर्ति-पेक्षां मृत्यु बरा; सत्याचरणानें धाक बसतो; लहानांपासूनहि हितोक्ति घ्यावी; दुराग्रह धरूं नये ( ३८–४६ ) स्तुतिपाठकांवर विश्वास ठेवूं नये; अप्रिय पण सत्य बोलतो तो प्रेमा-स्पद; निश्चय अढळ असावा, देशाटनें करावींत, पंडितांशीं वादविवाद करावेत, केवळ वडिलांच्याच संपत्तीवर अवलंबून राहूं नये; परतंत्रवृत्ति खोटी, तो नरकच; स्वातंत्र्यवृत्ति स्वीकारावी; असंतोष हेंच सर्वांत मोठें दुःख; गालिप्रदान निंद्य; क्रोधवश होऊं नये; धैर्य धरावें; ( ४७–५८ ) शक्तिबळें न मिळे तें युक्तिबळें मिळे; मन, दृष्टि, मुख प्रसन्न असावें; नीतिनिपुणता, शौर्य, सुजनता इ. सद्गुण असावेत; बाह्यरंगाला भुलूं नये, महत्वाचें कार्य जपून करावें; सतत चिकाटी धरावी; पुनः पुनः यत्न करून स्वीकृ-तकार्य सिद्धीस न्यावें. ( ५९–६४ ) अप-राध असेल तेवढाच लक्षांत घ्यावा; योग्य वेळींच क्षमा करावी; महत्वाच्या कार्यांत उगाच | | |

| अध्याय | विषय | आर्या-संख्या | पृष्ठांक |
|---|---|---|---|
| | घाई करूं नये; कोणालाहि पोटावर मारूं नये; गांजा, दारू वगैरे व्यसनें अत्यंत अनर्थकर होत; दुर्गुण सहज जडतात; म्हणून त्यांपासून दूर रहावें; आहारविहार नियमित असावेत; ( ६५–७४ ) आधीं दुःख मग सुख; सत्समागमानें बुद्धि प्रदीप्त होते; दुर्योधनाप्रमाणें तिचा दुरुपयोग करूं नये; द्रव्यबळाहून विद्याबळ मोठें होय; विद्वज्जन आधीं सन्मानावेत; सत्संगति नेहमीं उत्तम फळदायी होते; ( ७५–८१ ) ऋण काढून सण करूं नये; उचितकर्म त करावें; धैर्य पराक्रम शौर्य दक्षता वगैरे क्षत्रियाचे गुण वाढवावे; ( ८२–८४ ) नृपनीति सोडूं नये; नाहींतर वेनराजाप्रमाणें त्याचा नाश होईल; निवडक विश्वासू असे लोक पदरीं असावेत; मंत्री हे राज्याचे आधार होत; पण ते गुणवान्, विद्वान्, कुलवान्, सुशीलसंपन्न व प्रभुकार्यीं दक्ष पाहिजेत; ( ८५–८९ ) पात्रता पाहून अधिकार द्यावे ( ९०–९१ ) युद्धांत शत्रूच्या बायका हातीं आल्या तर त्यांचा सन्मान करून त्यांना परत पाठवाव्यात; युद्धांत झालेल्या बंदीजनांचा छळ न करतां त्यांचे पराक्रम वर्णावेत; घायाळ झाले त्यांची शुश्रूषा करावी व त्यांना वस्त्राभरणें देऊन परत पाठवावेत; रणांत पिता आप्तस्वकीय यांचेहि वध | | |

| अध्याय | विषय | आर्या-संख्या | पृष्ठांक |
| --- | --- | --- | --- |
| | करणें पाप नाहीं; ( ९२-९७ ) बुद्धि खर्च करून थोड्यांत थोडा प्रयत्न व मोठ्यांत मोठा लाभ शोधून काढावा; आपल्या लेंकरां-प्रमाणें प्रजेचें पालन करावें म्हणजे तीच संक-टाचे वेळीं निवारण करील; राजधर्माला अनुसरूनच कर घ्यावा; प्रजेचा छळ केला असतां राजा अधोगतीला जातो; (९८–१०४) धनाचा सद्व्यय केल्यानें स्वार्थ व परमार्थहि साधतो; म्हणून तें धर्मकार्यांत व लोकहितार्थ खर्चावें, धर्मबाह्य आचरण केल्यानें मनुष्य निंदेस पात्र होतो; ( १०५–१०७ ) आई-पेक्षां अन्य श्रेष्ठ दैवत नाहीं; तिचे आशीर्वाद नसतील तर मुलगा जिवंत असून मृतवतच होय; दुसरें दैवत पिता, याचे आशीर्वादानें पुरुषार्थप्राप्ति होते; वडिलांना मान दिल्यानें लाभ-जय-श्री गळ्यांत माळ घालते; पुत्रानें पित्राज्ञा दाशरथी रामाप्रमाणें वेदवचनवत् मानावी; ( १०८–११२ ) या दादोजीच्या उपदेशामुळें शिवरायाला हिन्दुभूमीस सुख देतां आलें. ( ११३ ) बोधाच्या शेवटीं गुरु दादोजी कोंडदेव यांनीं शिवबाळाला आशीर्वाद दिला ( ११४–११७ ) उपसंहार ( ११८ ) | ११८ | ६६-८४ |
| | एकंदर आर्यासंख्या | ४७८ | |

४५१०
संग्रहालय १०३४
१०/२/३२
६४७८

# श्रीछत्रपति[1]काव्य

## आद्यपर्व

### अध्याय पहिला

### बालवृत्तांत

( गीतिवृत्त )

**श्रीशि**तिकंठ[2]प्रभुवरपदयुगकमलीं करूनियां नमन ।
नमिला म्यां **श्रीग**जमुख करितो जो विघ्नराशिचें शमन ॥ १ ॥

नमितों **स**रस्वतीला दे स्फूर्ति जिचा प्रसाद वाणीला[3] ।
मी काय वर्णुं[4] तो जो सुकविवरें सुरवरेंहि वाणीला[5] ॥ २ ॥

नमिले श्री**व्या**[6]सादि प्रमुख मुनिश्रेष्ठ सर्व म्यां भावें ।
कवि**भा**[7]स**का**[8]लिदासहि लोकीं यद्ग्रंथ[9]यश रसें[10] गावें ॥ ३ ॥

---

१ राजाधिराज ( छत्रपति ); श्रीशिवाजीमहाराजांनीं हिंदुपदपादशाही स्थापन केल्यानंतर त्यांना शके १५९६ या वर्षीं राज्याभिषेक करण्यांत आला त्यावेळेपासून त्यांनीं 'छत्रपति' ही पदवी धारण केली. २ श्री+शितिकंठ (शंकर)+प्रभुवर ( देवांमध्यें श्रेष्ठ )+पदयुग ( दोन पाय )+कमलीं=देव श्रेष्ठ जो शंकर त्याच्या चरणकमलीं. ३ वाचेला. ४ वर्णन करूं. ५ वर्णन केला; स्तविला. ६ प्रसिद्ध ऋषी; हा पराशरऋषीपासून सत्यवतीस झालेला मुलगा. तो जन्मतांच, तूं जेव्हां माझें स्मरण करशील तेव्हां मी तुझ्याजवळ येईन असें आईस सांगून तपश्चर्या करण्याकरितां गेला. यमुनानदीच्या तीरीं बनलेल्या द्वीपांत याचा जन्म झाल्यामुळें याला द्वैपायन असें म्हणतात. त्याचा रंग काळा असल्यामुळें त्यास कृष्ण असेंही

प्रणति[1] श्री**शि**वराया ज्यावरि शुभ छत्रचामरें[2] ढळलीं ।
दुसरी प्रणति तया[3] यद्बाहुबळें[4] यवन-इंद्रता[5] ढळली ॥ ४ ॥

मत्प्रणति पुन्हा त्यां[3] कीं[6] सूत्र[7] शिखा रक्षुनी स्वतेजानें[8] ।
**हिं**दूंचें साम्राज्य स्थापियलें **रा**मराज्यसें[9] ज्यानें ॥ ५ ॥

गोब्राह्मणश्रुतिस्मृति[10] तगलिं जयाच्या महानुभावानें[11] ।
त्या **शि**वरायाच्या मी कथितों चरिता सुभक्तिभावानें ॥ ६ ॥

**हि**मगिरिराज[12] विराजे भारतभूच्या[13] शिरीं जणों मुकुट ।
धन्यत्वें पुण्यत्वें करिति[14] इतर गिरि तयासि पाणिपुट[14] ॥ ७ ॥

---

म्हणतात. यानें वेदांचे विभाग पाडून रचना केली म्हणून यास वेदव्यास असेंही म्हणतात. महाभारताखेरीज व्यासानें अठरा पुराणें व अठरा उपपुराणें लिहिलीं. ब्रह्मसूत्रेंही यानें रचिलीं. हा अश्वत्थामादि सात चिरंजीवांपैकीं एक चिरंजीव होय. ७ कालिदासापूर्वी होऊन गेलेला कवी. याचे काव्यांत हास्यरस आढळून येतो. ८ भोजराजाच्या पदरीं असलेला प्रसिद्ध श्रेष्ठ कवी. हा पूर्वी सामान्य बुद्धीचा असून कालीदेवीच्या प्रसादानें याला काव्यस्फूर्ति झाली अशी आख्यायिका आहे. यानें शाकुंतलादि नाटकें व रघुवंशादि प्रसिद्ध काव्यें लिहिलीं आहेत. ९ ज्यांच्या ग्रंथांची थोरवी. १० प्रेमानें.

१ नमस्कार. २ छत्री ( छत्र )+चवऱ्या ( चामरें ); सार्वभौमत्व दाखविणारीं राजचिन्हें. ३ शिवरायाला. ४ ज्याच्या पराक्रमानें. ५ यवनांचें प्रभुत्व. ६ कारण ( कीं हें अव्यय विकल्प, प्रश्न, आधार आणि कारण असे अर्थ दाखवितें. ) ७ जानवें. ८ आपल्या पराक्रमानें. ९ रामाच्या राज्यासारखें; रामराज्यामध्यें प्रजा सुखी व संतुष्ट असे. १० श्रुति (वेद)+स्मृति ( श्रुतीचे आधारें सांगितलेले कायदे). ११ मोठ्या पराक्रमानें, महाप्रतापानें. १२ श्रेष्ठ हिमालयपर्वत. पृथ्वीवरील सर्व पर्वतांत हा उंच आहे. देवांचा निवास या पर्वतावर आहे. अनेक ऋषींनीं व धर्मात्म्यांनीं याचा आश्रय केलेला आहे. यावर मोठमोठे यज्ञयाग वगैरे झाले आहेत. शंकराचें निवासस्थान कैलास हा या पर्वतावर आहे. १३ भरत राजाच्या भूमीच्या=हिंदुस्थानाच्या. दुष्यंत राजाचा मुलगा भरत हा सर्व

वाहे भारतदेशीं[1] पूज्या पुण्या सरिद्वरा[2] गंगा[3] ।
स्नानें जलीं तियेच्या पावे अघराशि[4] सर्वथा भंगा ॥ ८ ॥

हिंदुस्थान असें हें केलें देवें स्वधाम अवतरुनी ।
देवचरितरतमानस[5] ते जाती हा भवांबुधी[6] तरुनी ॥ ९ ॥

आगमनिगमनुत[7] प्रभु भक्तशुभंकर तपस्विजनशरण[8] ।
पुण्यनिधिश्रीराम[9]श्रीकृष्ण[10] भवाब्धि[11]तरण यच्चरण ॥ १० ॥

इत्यादि-देवपदरज[12]संसर्गें पुण्य भूमि ही झाली ।
तेथें जन्मा आले प्राणी ते धन्य धन्य सुखशाली ॥ ११ ॥

---

आर्यावर्तावर ( आर्यभूमीवर ) आपलें अधिराज्य स्थापून चक्रवर्ती झाला. म्हणून याचें नांव या भूमीस पडून तिला भरतवर्ष, भरतखंड, भारत असें म्हणूं लागले. पूर्वी या भरतखंडाला अजनाभ असें म्हणत होते. १४ अंजलि करिती; हात जोडिती.

१ हिंदुस्थानांत. २ नद्यांमध्यें श्रेष्ठ. ३ ही विष्णूच्या पायापासून निघालेली स्वर्गांतील नदी. हिला भगिरथराजानें आपल्या पितरांचा उद्धार करण्याकरितां मोठी तपश्चर्या करून या पृथ्वीवर आणिली अशी कथा आहे. ४ पापसंचय. ५ देव +चरित ( चरित्र )+रत ( रममाण झालेलें )+मानस ( मन )=देवांच्या चरित्राचे ठिकाणीं रममाण झालेलें आहे मन ज्यांचें ते. ६ संसाररूपी सागर. ७ वेदानीं स्तविलेला. ८ तपस्वी जनांचा आश्रय. ९ हा परमेश्वराचा सातवा अवतार. हा लहान असतां, आपल्या यज्ञयागादि कर्माला राक्षस अडथळा आणितात म्हणून त्यांचा संहार करून यज्ञयागादि कर्मांचें संरक्षण करण्यासाठीं विश्वामित्रऋषीनें त्याला आपले आश्रमांत नेलें. श्रीरामानें राक्षसांचा संहार करून, निर्विघ्नपणें यज्ञयागादि कर्में पार पाडून दिलीं. गौतमाची स्त्री अहल्या ही शापामुळें शिळा होऊन पडली असतां श्रीरामाच्या चरणस्पर्शानें तिला पूर्वीचें स्वरूप प्राप्त झालें. रामनाम अंतःकरणापासून उच्चारतांच सर्व पाप नाहींसें होतें असा त्याचा महिमा आहे. सर्व बाजूंनीं आपलें रक्षण व्हावें म्हणून रामरक्षास्तोत्र म्हणण्याचा परिपाठ पडलेला आहे. १० हा परमेश्वराचा आठवा अवतार होय.

श्रीमद्व्यास[1]वसिष्ठ[2] हि गाधिज[3] वाल्मीकि[4] धौम्य[5] कच[6] दक्ष[7] ।
पुलह[8] पुलस्त्य[9] पराशर[10] ऋषि निजकर्मांत सर्व जे दक्ष[11] ॥ १२ ॥
ऐसे तपोनिधि ऋषी मखकर्मीं[12] मग्न जे सदाचारी ।
त्यांच्या तपोबळानें झाली ही भू समृद्ध सुखकारी ॥ १३ ॥
ऐशा भूवरि झाले धर्म[13]-हरिश्चंद्र[14]से महाराजे ।
धर्मपरायण[15] दाते योग्य[16] खरे गंधकुसुमहारी[16] जे ॥ १४ ॥
गोब्राह्मणपरिपालनदक्ष असे सार्वभौम ते राजे ।
नयसंचित[17] अगणित धन पाहुनि त्यांचें कुबेर[18]ही लाजे ॥ १५ ॥

---

"नाहं वसामि वैकुंठे योगिनां हृदये रवौ ।
मद्भक्ता यत्र गायन्ति तत्र तिष्ठामि नारद ॥"

म्हणजे मी वैकुंठांत रहात नाहीं, योग्यांच्या हृदयांत राहत नाहीं, सूर्यांत रहात नाहीं, परंतु माझे भक्त जेथें गात असतात तेथें मी उभा असतों असें नारदाला स्वतः श्रीकृष्णानीं सांगितलें आहे. यानीं अर्जुनास गीता सांगितली. आपल्या मातेस व अर्जुन वगैरे भक्तांस विश्वरूप दाखविलें. आपल्या भक्तांचें रक्षण करण्यासाठीं धांवा केल्याबरोबर जाऊन त्यांचें संकट निवारावयाचें हें त्यांचें ब्रीद होतें. श्रीकृष्णाच्या प्रसादानें वस्त्रहरणाचे वेळीं द्रौपदीची लज्जा राखिली गेली. नारदांनीं शापिलेल्या कुबेर पुत्राचा उद्धार श्रीकृष्णाच्या दर्शनानें झाला. कंसाची दासी कुब्जा हिच्या शरीराला कुबड होतें; तिला स्पर्श करून श्रीकृष्णानीं सरळ व सुरूप केली. ११ भव+अब्धि+तरण–संसाररूपी सागर तरून जाणारी नौका. १२ देवांच्या पायांच्या धुळीच्या संपर्कानें.

१ पान १ टीप ६ पाहा. २ एक प्रख्यात ब्रह्मर्षि. सूर्यवंशीय रघुकुलाचा कुलगुरु. याचे श्रेष्ठत्वाबद्दल विश्वामित्र नेहमीं स्पर्धा करीत असे त्यामुळें पुष्कळ लढे उत्पन्न झाले पण वसिष्ठाची शांती केव्हांही ढळली नाहीं. ३ विश्वामित्र. कान्यकुब्जदेशांतील गाधिराजाचा मुलगा. वसिष्ठाच्या आश्रमांत गेला असतां त्याचें ब्रह्मतेज पाहून हा चकीत झाला. वसिष्ठाची कामधेनु बलात्कारानें नेण्याचा यानें प्रयत्न केला पण त्यांत याचा पराजय झाला. यानें वसिष्ठशिष्य हरिश्चंद्र याचा अत्यंत छळ करून त्याला आपल्या सत्त्वापासून व शांतीपासून

ढळविण्यासाठीं प्रयत्नांचा कडेलोट केला पण त्यांत त्याला यश न येतां आपल्या सर्व तपश्चर्येचें उदक हरिश्चंद्राचे हातावर सोडावें लागलें. पुष्कळ तपश्चर्या करून हा राजर्षी, ऋषी, महर्षी व अखेर ब्रह्मर्षी झाला. ४ एक प्रसिद्ध ऋषी. यानें रामायण रचिलें. हा मूळचा ब्राह्मणाचा मुलगा. पण आईबापानीं याला लहानपणींच टाकून दिल्यामुळें लुटारू कोळयाच्या हातीं सांपडला. लूट करण्यामध्यें हा तरबेज झाला. पुढें एके दिवशीं नारदमुनीची व याची गांठ पडली; ह्या वेळीं आपलीं बायकामुलें आपल्या पातकाला भागीदार नाहींत, हें जेव्हां त्याला आढळून आलें तेव्हां तो तेथेंच तपश्चर्या करूं लागला. कालांतरानें त्याचेवर वारूळ ( वल्मीक ) बनलें. त्यांतून नारदमुनीनें त्याला बाहेर काढलें. तेव्हांपासून त्याला वाल्मीकि ऋषी म्हणूं लागले. ५ पांडवांचा पुरोहित. ६ एक ब्रह्मर्षी. ७ स्वायंभु मन्वंतरांत ब्रह्मदेवानें जे दश मानस पुत्र निर्माण केले त्यांपैकीं एक. ८ सप्तऋषीपैकीं एक. ९ सप्तऋषीपैकीं एक. पुलस्त्य ऋषीनीं भीष्मास भागीरथीतीरीं पृथ्वीप्रदक्षिणेचें फळ सांगितलें. १० मैत्रावरुणी वसिष्ठाचा पौत्र व शक्तिऋषीचा पुत्र. हा लहान असतांच याच्या बापास एका राक्षसानें भक्षिलें होतें. ही कथा मोठेपणीं आईकडून कळतांच यानें राक्षससत्र आरंभून सहस्रावधी राक्षस जाळून टाकिले. पुढें वसिष्ठानें याचा राग शांत केला. ११ तत्पर. १२ यज्ञकर्मांत. १३ पांडवश्रेष्ठ युधिष्ठिर. हा पापभीरू, दयाळु व प्राणिमात्रांचा स्नेह संपादणारा असा होता म्हणून यास अजातशत्रु म्हणत. हा मोठा सत्यवक्ता होता. संकटकालीं त्याचा बंधु भीम इत्यादिकांनीं याची पुष्कळ निर्भर्त्सना केली तथापी हा सत्यापासून ढळला नाहीं. यानें अपार संपत्ती मिळवून राजसूय व अश्वमेध नांवाचे यज्ञ केले. पण लावून द्यूत खेळण्याला कौरवांनीं धर्मराजाला भाग पाडलें व त्या कपटद्यूतामध्यें राज्यहरण झाल्याकारणानें यानें आपले भ्राते व पत्नी यांसह मोठ्या धैर्यानें बारा वर्षें वनवास काढला व एक वर्षपर्यंत विराटाचे घरीं अज्ञातवास भोगिला; नंतर कौरवांबरोबर युद्ध करून यानें राज्य मिळविलें. १४ अयोध्यानगरींत राज्य करणारा वसिष्ठाचा शिष्य. हा प्रसिद्ध दानशूर असून धर्मन्यायानें व पुत्राप्रमाणें प्रजेचें पालनपोषण करणारा होता. विश्वामित्रानें याचा अत्यंत छळ केला; पण हा आपले सत्त्वापासून ढळला नाहीं. १५ धर्मामध्यें मग्न झालेले. १६ गंध, कुसुम आणि हार यांनीं पूजा करण्यास योग्य; पूजार्ह. १७ न्यायानें साठविलेलें. १८ हा संपत्तीचा राजा व देवांचा कोषाधिपति. हा

धनधान्यसमृद्धि धरा[1] ऐशी विख्याति भरत[2]वर्षाची ।
अपहार बुद्धि चेतवि, ओढवली वेळ तदपकर्षाची ॥ १६ ॥

परदेशस्थ लुटारू आक्रमिती आर्यभू सुसंपन्ना ।
लुटिती मारिति जाळिति आर्यांची काय ती स्थिति विपन्ना ! ॥ १७ ॥

पैगंबरा[3]नुयायी ताम्रमुखी[4] लंबपिंग[5]कूर्चधर ।
दुष्ट शिखा[6]नष्ट छळिति आर्यांसी कीं सुरां[7] असुर[8] अधरें[9] ॥ १८ ॥

पश्चिम उत्तर पूर्व प्रथम पुढें सकल दक्षिण प्रांत ।
छद्में[10], बळें, अपायें केले त्यांनीं समस्त आक्रांत ॥ १९ ॥

नीति अनीति ऋता[11]नृत धर्माधर्म क्षमा[12]क्षम न्याय ।
अन्याय हीं सकल सम मानावीं तन्मतेंचि हें न्याय्यें[13] ॥ २० ॥

कुराण[14] एक्या हातीं खड्ग दुज्या घेउनी यवन धांवे ।
"हो यवन वा उडवितों शिर" ऐसें वदत हिंदु रोधावे[15] ॥ २१ ॥

गोवध नित्य करावे, भ्रष्टावे देव, वेद निंदावे, ।
स्त्रीजन बळें हरावे, दुष्ट किती यवनकृत्य सांगावें ? ॥ २२ ॥

टांगावे, झोडावे, कापावे नाक, कान, कर, पाय, ।
क्रकचें[16] उभे चिरावे यवनांहीं नित्य हिंदुचे कायें[17]. ॥ २३ ॥

---

शंकराचा मित्र असून कैलासांत राहतो. हा यक्षकिन्नरांचा राजा अशी कथा आहे.

१ पृथ्वी. २ हिंदुस्थानाची. पान २ टीप १३ पहा. ३ महमद (पैगंबर), मुसलमानी धर्माचा प्रवर्तक. ४ ज्यांचा चेहरा तांबूस वर्णाचा आहे असे. ५ लांब पिंगट रंगाची दाढी ( कूर्च ) असलेले. ६ शेंडी नसलेले. ७ देवांना. ८ राक्षस. ९ नीच. १० कपटानें. ११ ऋत ( सत्य )+अनृत ( असत्य ). १२ क्षम ( योग्य )+ अक्षम ( अयोग्य ). १३ बरोबर; न्यायाचें. १४ कुराण नांवाचा मुसलमानांचा धर्मग्रंथ. १५ अडवून धरावे. १६ करवतीनें. १७ देह.

निजधर्मत्यागाहुनि देशत्याग प्रशस्तचित्तानें ।
करिती धर्मपरायण[1] देहत्यागहि किती स्वहस्तानें ॥ २४ ॥

बसते, उठते, पडते, ओढहि घेते, रडोनि हंबरते, ।
थरथरते धेनु जिला निर्दय ओढिति वधार्थ फरफर ते ॥ २५ ॥

अबलांसि[2] देवदर्शनपूजनवंदन तथा कथाश्रवण ।
न घडे किः—पण न वदवे **य**वनविचेष्टित[3] विटाळि जें श्रवणें[4] ॥ २६ ॥

दुर्मद[5] निर्दय घातकि अवनितळीं[6] **य**वन मातले फार ।
धर्मोच्छेद[7] करोनी छळिती हे सत्य दैत्य[8]-अवतार ॥ २७ ॥

धर्म ग्लानी[9] पावे तधि तत्संस्थापनार्थ[10] **मी** *प्रकटें ।
हें वच सत्य करुनि तो कार्यीं दीनाचिया सदा चिकटे ॥ २८ ॥

प्रख्यात **सू**र्यवंशीं क्षात्र**सिसोदे**महाकुलामाजी[11] ।
प्रकटावें धरि ऐसें स्वमनीं सुरवर तया प्रणति माझी ॥ २९ ॥

मूळ **अ**योध्येचा[12] तो वंश तयांतील एक पुरुषवर ।
जावोनि **न**[13]र्मदेच्या तीरीं संपादि राज्य, कीर्ति, वैर[14] ॥ ३० ॥

---

१ धर्मामध्यें रत किंवा मग्न झालेले. २ स्त्रियांना. ३ यवनांचें निंद्य कृत्य. ४ कान. ५ अति मत्त; मदोन्मत्त. ६ पृथ्वीवर. ७ धर्माचा नाश. ८ राक्षसांचे अवतार. ९ उतरती कळा; शैथिल्य; ऱ्हास. १० धर्माची स्थापना करण्यासाठीं.

* यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत ।
अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम् ॥

असें प्रत्यक्ष भगवान् श्रीकृष्णानीं अर्जुनास सांगितलें आहे. ११ क्षात्र ( क्षत्रिय )+सिसोदे ( घराण्याचें आडनांव )+महाकुलामाजी ( श्रेष्ठ कुळामध्यें ). १२ मोक्षदायक सप्तपुरीपैकीं एक. सूर्यकुलोत्पन्न राजांची ही राजधानी. ही शरयू नदीच्या कांठीं आहे. वैवस्वत मनूनें आपणास राहण्यासाठीं ही स्थापि-

कालेंकरूनि तेथुनि कुळज तयाचे पुढें चितोडास ।
गेले राज्य कराया, यवनभुजंग[1] घेति त्यां तिथे डांसे[2] ॥ ३१ ॥

मेवाडाख्यप्रांतस्थितकिल्ला[3] चित्रकूट नांवाचा ।
ख्यात चितोड म्हणुनि तो; पडला वेढा तयासि यवनांचा ॥ ३२ ॥

भूषविलें कुल तें हो ! लक्ष्मणसिंहें लढोनि यवनांशीं ।
तत्सुत अजेयसिंह प्रबल, तयाचाचि सजण रिपुनाशी ॥ ३३ ॥

सजणज दिलीप, तत्सुत सिंह सुभट[4], सिंहसूनु[5] भोसाजी ।
तत्तनुज देवराज श्रीधीनें युक्त त्या सदा गा जी ! ॥ ३४ ॥

पितृनामावरुनि तया पडलें उपनांव भोंसले म्हणुनी ।
निजनांवापुढती हो ! तद्वंशज लावितात तें अजुनी ॥ ३५ ॥

तो देवराज गेला भीमातीरीं चितोड सोडोनी ।
यवनत्रासें; मग तो राहियला तेथ कीर्ति जोडोनी ॥ ३६ ॥

---

लेली होती. दशरथाचे वेळीं ही नगरी बारा योजनें लांब व तीन योजनें रुंद होती. श्रीरामचंद्राचा येथेंच जन्म झाला. श्रीरामचंद्रानें पुष्कळ वर्षें येथें राज्य केल्यावर त्यांतील सर्व प्राणिमात्रांसह वैकुंठास गमन केलें; म्हणून ती पुष्कळ वर्षें शून्य होती. त्यानंतर सूर्यवंशीय ऋषभ राजानें येथें पुन्हा वसती केली. १३ एक पवित्र नदी. ही अमरकंटक पर्वतांतील एका कुंडांत उगम पावून भडोच जवळ समुद्रास मिळते. हिच्या उगमाजवळ कपिलधारा नांवाचा ८० फूट उंचीचा एक धवधबा आहे. हिच्या कांठीं महेश्वर, ओंकार, मांधाता इत्यादि पवित्र क्षेत्रें आहेत. हिला रेवा असेंही हणतात. हिची उत्पत्ति शंकराच्या शरीरापासून झाली असा रामायण व महाभारत यांत उल्लेख आहे. नर्मदाखंडांत हिचें महात्म्य वर्णिलें आहे. हिच्याच कांठावर त्रेतायुगांत इंद्र व वृत्रासुराचें युद्ध झालें. १४ आणखी.

१ यवनरूपी सर्प. २ चावा. ३ मेवाड+आख्या ( नांव )+प्रांत+स्थित= मेवाड नांवाच्या प्रांतांत असलेला. ४ चांगला योद्धा. ५ सिंहजीचा मुलगा.

सुत इंद्रसेन त्याचा, शुभकृष्ण सुपुत्र इंद्रसेनाचा ।
शुभकृष्णाचा रूप प्रिय, तद्भूमींद्र सत्यवचनाचा ॥ ३७ ॥

भूमींद्रज धापाजी, तत्सुत बरहाटजी महामहित ।
हे निज हे पर ऐसा तद्भाव न तोचि साधि सकळ हित ॥ ३८ ॥

त्याचा पुढें खलोजी, तन्नंदन कर्णसिंहजी धीर ।
संभाजी कर्णात्मज अर्णवसा तो अगाध गंभीर ॥ ३९ ॥

संभाजीचा नंदन शंभूंचा भक्त बाबजी जाणा ।
तुळजापूर भवानीदेवीचाही तसाच तो राणा ॥ ४० ॥

---

६ त्याचा (भोसाजीचा) मुलगा. ७ संपत्तीनें व बुद्धीनें. ८ ही नदी सह्याद्रीपर्वतांत द्वादश ज्योतिर्लिंगांपैकीं भीमाशंकराजवळ उगम पावून रायचुरापासून १६ मैलावर कृष्णेस मिळते. हिला मुळामुठा नद्या मिळतात. हिचे कांठीं पंढरपूर क्षेत्र आहे. ह्या क्षेत्राचे ठिकाणीं हिला चंद्रभागा असें म्हणतात.

१ मोठ्यांनीं मान दिलेला. २ त्याचा ( खलोजीचा ) मुलगा. ३ कर्णसिंहजीचा मुलगा. ४ सागरासारखा. ५ चितोड येथील ‘ एक लिंगजी ’ सांबाचा. हें या घराण्याचें चितोड येथील कुलदैवत होय. ह्या कुलांतील पूर्वजांपैकीं पांच वर्षांच्या एका राज्यभ्रष्ट मुलाला घेऊन त्याची आई चितोड येथें आली. येथें ती एका ब्राह्मणाकडे आपल्या मुलाला गुरें राखण्यास ठेऊन या ब्राह्मणाचे आश्रयाला राहूं लागली. गोरक्षण करीत असतां अकस्मात् शिवाचें एक लिंग या मुलाच्या दृष्टीस पडलें तेव्हांपासून त्याची तो भक्ती करूं लागला. त्याच वेळीं त्याच्या आईनें आपण कोण कोठचे वगैरे सर्व वर्तमान त्या ब्राह्मणास विदित केलें. या ‘एक लिंगजी’ ची रोज आराधना करतां करतां श्रीसांबानें प्रसन्न होऊन “ पर्वतांतील मेवाड प्रांत यांतील राज्य तुजला दिलें; तूं महावंशीचा रजपूत राजा आहेस; ज्या ब्राह्मणाचे घरीं राहतोस तोच ब्राह्मण तुला अनुकूल होईल व अमुक स्थळीं द्रव्य मिळेल; तें घेऊन तूं राज्य साध्य कर व धर्मेंकरून प्रजापालन कर” असें त्या मुलास सांगितलें. त्याचप्रमाणें त्या ब्राह्मणालाही दृष्टांत झाला. असा दृष्टांत होतांच त्या ब्राह्मणानें त्या राजपुत्राच्या हस्तें गोरक्षण करण्याचें बंद करून, द्रव्य सांगितलें तें काढून, आपण त्याचें

त्याचा सुत **मा**लोजी शूर, बळी, साहसी म्हणति जन या ।
**निं**बाळकराची तद्भार्या **दी**पाभि[1]धा सुमति तनया ॥ ४१ ॥

नवसबळें जन म्हणती प्रसवलि ती पुत्ररत्न **शा**हाजी ।
गुणरूपतेजशौर्यें पावे क्षिति[2]वरि महायशा हा जी ! ॥ ४२ ॥

जाय समारंभा तो पितृसंगें रंगपंचमीदिवसीं ।
**जा**धवगृहीं शिशु[3]पणीं घडलें तर्कित न[4] जें तदा सं[5]सदीं ॥ ४३ ॥

**जा**धवराव **ल**खोजी तधिं मनस[6]बदार हो ! **नि**जामाँचा[7] ।
तद्वास **सिं**[8]धखेडीं; फार दरारा तदीय नामाचा ॥ ४४ ॥

गुण, रूप रम्य, मंजुळ वाणी, चापल्य, तेज पाहोनी ।
मोहित झाला **जा**धवराव जवळि घे तयासि बा[9]होनी. ॥ ४५ ॥

एका अंकीं[10] बसला तो बाळ[11]पणी सहा[12]सें **रा**वाँ[13]च्या ।
तंव ये दुसऱ्याहि बसे कन्यार[14]त्न प्रिय स्वबापाँ[15]च्या ॥ ४६ ॥

---

पुरोहितत्व पत्करिलें व त्या पर्वतामध्यें श्रीभवानी देवी होती तेथें एक किल्ला बांधिला. त्याचें नांव चित्रकूट असें ठेविलें. भवानीचे देवालयाचा जीर्णोद्धार करून आणखी 'एकलिंगजी' सांबाचें देवालय बांधिलें. ह्या पुरुषाचे वंशजांनीं चित्रकुटास ५०० वर्षें राज्य केलें असें म्हणतात. हा चित्रकूट किल्ला चितोड या नावानें पुढें इतिहासांत प्रसिद्ध झाला. याचेच वंशज जेव्हां पुढें दक्षिणेंत आले तेव्हां सिंगणापूर येथील महादेव हाच आपला 'एकलिंग' कुलस्वामी व श्री तुळजापूरची भवानी हीच आपली भवानी चितोडदेवी असें ते मानूं लागले. व याच भावनेनें बाबजीराजे ह्याच देवतांची आराधना करूं लागले. ६ तुळजापूर निजामराज्यांत सोलापूरपासून ९ कोसावर आहे तेथील भवानीदेवीचाही.

१ दीपानांवाची. २ पृथ्वीवर. ३ बाळपणीं. ४ पूर्वीं कल्पनेंत न आलेलें. ५ मंडळींत; सभेंत. ६ अमुक घोडेस्वार पदरीं ठेवण्याविषयींचा दिलेला मान आहे ज्याला तो. ७ मूर्तिजा निजामशहाचा. ८ जाधवरावाचें रहाण्याचें

सं कान्त. ९०३८ ९०/५/३२

गोजिरवाणी, सुगुणी, समवय, संस्मित[१], सुशील, दिव्य[२] मुलें ।
त्यांहीं दोघांनींही जन्मुनि केलीं स्वकीय धन्य कुलें ॥ ४७ ॥

अंकस्थ[३]बालरत्नें पाहुनि तो **रा**व कुतुक फार करी ।
कुरवाळी दोघांसी प्रेमानें तो धरोनियां स्वकरीं[४] ॥ ४८ ॥

तबकें गुलाल भरुनी पिचकाऱ्यांसह अनेक रंगाच्या ।
जागीं जागीं होतीं ठेवियलीं उधळण्यासि रंगाच्या[५] ॥ ४९ ॥

**रा**व विनोदेंचि म्हणे "वर तुज हा पाहिजे मुली ! काय ? ।
जोडा उत्तम दिसतो, दोघेंही शोभती रुचिर[६]काय" ॥ ५० ॥
हांसत खेळत तेव्हां अन्योन्यावरि गुलाल उडवीला ।
त्या दोघें; तों इतरें 'वाहवा' हा ध्वनि सहर्ष[७] उठवीला ॥ ५१ ॥

तंव वदले जन डोलत उत्तम दिसतो खराचि हा जोडा ।
उठुनी लगेच बोले **मा**लोजी "सोयरीक तरि जोडा" ॥ ५२ ॥

समजे सत्य वचन तें **मा**लोजी जो विनोद **रा**वाचा ।
करि मागणी मुलीची, त्यासि बजावुनि 'खरी करा वाचा' ॥ ५३ ॥

**रा**वस्त्रीतें[८] कळतां वार्ता ही होय ती अती क्रुद्ध ।
पतिसि पुसे "त्यासि तुम्ही होतां कैंवी असे वचनबद्ध ? ॥ ५४ ॥

"मनसब[९]दार तुम्ही, तो क्षुद्र शिलेदार[१०], जाणितां ना तें ? ।
"द्रव्यें गुणें यशें तो हीन अम्हांपरिस; जोडितां नातें ! ॥ ५५ ॥

---

ठिकाण. ९ बोलावून. १० मांडीवर. ११ उत्तम मुलगा. १२ हांसत. १३ जाधवरावाच्या. १४ जिजाई. १५ आपल्या बापाच्या (जाधवरावाच्या).

१ हसत असलेलीं. २ चांगलीं. ३ मांडीवर बसलेलीं मुलें. ४ आपले हातांत. ५ समारंभाच्या जागेच्या. ६ देखणी. ७ आनंदानें. ८ जाधवरावाचे बायकोला.

"केवळ सेवक अमुचा साजेल कसा अम्हांस हा व्याही ?
"हिणवुनि पिटितिल टाळ्या जन, चिंता त्या कशा सहाव्या ही ?"

निज मागणी न मानिलि **रा**वें सा[1]म्य न म्हणोनि अपमान ।
वाटे **मा**लोजीला; चवतळला तो तदा फ[2]णिसमान ॥ ५७ ॥

विधिब[3]ळ मोठें त्याचें; दिधला क्षि[4]तिनें तयासि धनठेवा ।
मनसबि दिधलि **नि**जामें; **रा**वाचा कां करील तो केवा ? ॥ ५८ ॥

---

९ पान १० टीप ६ पहा. १० पदरचीं घोडीं ठेवून सरकारची नोकरी करणारा.

१ बरोबरी. २ सर्पाप्रमाणें. जाधवरावालाहि मालोजीनें हट्ट धरून मागणी केली म्हणून अतिशयित क्रोध आला. यास्तव जाधवरावानें आपल्या कारकुनास बोलावून आणून असा हुकूम केला कीं मालोजीचा व त्याचे भावाचा जो कांहीं हिशोब झाला असेल तो त्यांस चुकता करावा व नोकरी सोडून आतांच्या आतां मुलें माणसें घेऊन येथून निघून जावयास सांगावें. त्याप्रमाणें जाधवरावाची नोकरी सोडून मालोजी भाऊ वगैरे सर्व माणसांसह निघून गेला. अशा रीतीनें जाधवरावानें आपला उपमर्द केला म्हणून मालोजीस पराकाष्ठेचा राग आला. सभेंत सर्वांदेखत केलेला करार मोडून जाधवराव मुलगी दुसऱ्यास देणार, ही आपली मोठीच अप्रतिष्ठा झाली, याहून मरण पुरवलें, असें त्या मानी पुरुषास वाटून त्याच्या चित्तास सारखीच तळमळ लागून राहिली. ३ दैवाचें सामर्थ्य. ४ पृथ्वीनें. जाधवरावानें आपला उपमर्द केला तेव्हां हरउपायानें त्यास आपली मागणी कबूल करावयास लावावयाची असा मालोजीनें निश्चय करून पुढें कसें करावें याचा विचार करूं लागला. पहिल्यानें आपली योग्यता वाढवावयाची असा विचार करून त्या मार्गास लागला तोंच अशी गोष्ट घडून आली कीं मालोजी व त्याचा बंधु असे दोघे जण एके दिवशीं रात्रीं आपल्या शेताची राखण करण्याकरितां गेले व आळीपाळीनें तें शेत राखीत बसले. पहिल्यानें विठोजी निजला आणि मालोजी जागत बसला. तो बसला त्या जागीं एक वारूळ होतें. कांहीं वेळ गेल्यावर त्या वारूळांतून भवानी देवीचा सुवर्णकंकणमंडित असा देदीप्यमान हस्त हळूच बाहेर निघून त्यानें त्यास

पालविल्याचा भास झाला व तो तसा हालून एकदम अदृश्य झाला. मालोजीनें भावास जागें करून आपणास झालेला दृष्टांत सांगितला. भाऊ म्हणाला "हा दृष्टांत लटका दिसतो." मग तो जागत बसला आणि मालोजी झोंपी गेला. तो निद्रिस्त होतांच त्याला स्वप्न पडलें त्यांत भवानी देवी शुभ्र पातळ नेसलेली, कपाळीं कुंकुममळवट भरलेली व सर्व अलंकारांनीं युक्त अशी त्याच्यापुढें उभी राहिली, व त्याच्या पाठीवर हात मारून त्यास जागृत करून म्हणाली:-मी तुला सर्व प्रकारें प्रसन्न झाल्यें आहें. त्या वारुळांत सर्प आहे तें स्वरूप माझें आहे. त्यास नमस्कार करून तें वारुळ खण म्हणजे त्यांत तुला द्रव्य सांपडेल तें तूं घे. सर्प निघून जाईल. त्याच्या वाटेस जाऊं नकोस. तुझ्या वंशास सत्तावीस पिढ्या राज्य दिलें आहे-हें स्वप्न पडल्यावर मालोजी जागा झाला व तें त्यानें आपले भावास निवेदन केलें. मग त्या दोघां बंधूंनीं प्रतीति पाहण्याचा विचार करून तें वारुळ खणलें. त्यांत त्यांस पुष्कळ द्रव्य सांपडलें. या द्रव्याचा विनियोग धर्मकृत्याकडे करून मालोजीनें देवालयें बांधिलीं; जीर्णोद्धार केले; ब्राह्मणांस दानें दिलीं; क्षेत्रांक्षेत्रांच्या ठिकाणीं तळीं, विहिरी, धर्मशाळा वगैरे बांधून अनेक धर्मकृत्यें केलीं. दानधर्म वगैरे करून श्रीमंतीविषयीं व पुण्यशीलतेविषयीं मालोजीनें लौकिक संपादून हजार बाराशें स्वार पदरीं बाळगून आपला इतमाम बराच वाढविला. ५ घोडेस्वार ठेवण्याचा अधिकार. आतां आपण जाधवरावाच्या बरोबरीचे झालों, जाधवराव आपली मागणी नाकारणार नाहीं अशा समजूतीनें मालोजीनें पुन्हा मुलीची मागणी केली; परंतु जाधवराव कांहीं केल्या त्याच्याशीं शरीरसंबंध करण्यास राजी होईना. म्हणून मालोजीनें जाधवरावाच्या ताब्यांतील परगण्यांत धामधूम सुरू करून, बरोबर स्वार घेऊन रावाच्या जहागिरीस तो उपद्रव देऊं लागला. इतकेंही करून जाधवराव आपला हट्टाग्रह सोडीना. अखेर आपलें गाऱ्हाणें घेऊन मालोजी तुळजापूरच्या भवानीच्या दर्शनास गेला. नंतर रात्रीं देवीनें स्वप्नांत येऊन त्याचा मनोरथ पूर्ण होईल असें अश्वासन दिलें. मग त्यानें परत अहमदनगरास येऊन जाधवरावास आपला अपमान केल्याबद्दल द्वंद्वयुद्धास आव्हान केलें. हें त्यांचें भांडण मूर्तिजा निजामाचे कानावर जाऊन त्यानें जाधवरावास सांगितलें "तुम्ही करार करून आतां नाहीं म्हणतां हें उचित नव्हे. तुमच्यामुळें मालोजीचा आम्हांला उपद्रव पोंचत आहे. हा कलह तुम्ही विनाकारण माजविला आहे तरी आतां मालोजीच्या मुलास मुलगी देऊन त्याच्याशीं समेट

झाला समान दर्जा अन्योन्यांचा शरीरसंबंध ।
जडला, झाला व्याही **मा**लोजी. कोण तोडि **वि**धिबंध[1] ? ॥ ५९ ॥

विधिसामर्थ्यें झाली **जा**धवजा[2] ती वधू **श**हाजीची ।
पडलि तयांची गांठी जन्माची, शुभ कथा अशी जीची. ॥ ६० ॥

तन्नाम **जि**जाई ती रमणी[3], सुगुणी, सुलक्षणा धन्या ।
लावण्यरूपखाणी; वाटे सुभगा[4] नसे अशी अन्या ॥ ६१ ॥

तारुण्य मुसमुसे जों तीचें सौंदर्य **चं**द्रसें विलसे ।
देवाच्या वा पतिच्या चरणीं तन्नेत्र जे कमलदलसे ॥ ६२ ॥

---

करा. " जाधवरावानें त्यावर असा जबाब दिला कीं " भोसल्यांच्या मुलास मुलगी देण्यासंबंधानें अनमान करण्याचें कारण एवढेंच कीं त्यांची आमची योग्यता सारखी नाहीं. एरवीं ते आमचे आप्तच आहेत. आमच्या घरांत सर्वांचा विचार असा कीं समान स्थळ पाहून मुलगी द्यावी. " हा त्याचा जबाब ऐकून निजामशहास वाटलें कीं आपण सांगत असतां हा ऐकत नाहीं, उद्दामपणा दाखवितो; तरी याचा गर्व हरण करण्यासाठीं मालोजीस चांगली मनसब देऊन योग्यतेस चढवावें. खरें म्हटलें असतां मालोजी उपद्रव देत होता म्हणून त्यास शासन करण्याचा विचार निजामाचे मनांत यावयास पाहिजे होता पण तो काळ निजामास प्रतिकूळ होता. मोंगलांची त्याच्या राज्यावर एकसारखी वक्रदृष्टि असून तें बुडवून टाकण्याचा निर्धार त्यांनीं केला होता. अशा आणीबाणीच्या वेळीं आपल्या राज्यांतील मराठे सरदारांत कलह माजून त्यांपैकीं कांहीं शत्रूस जाऊन मिळाल्यास आपला पक्ष तितका कमजोर होईल असा विचार निजामशहानें करून शूर व पराक्रमी मालोजीस आपलासा करण्याचा बेत केला. मग त्यानें मालोजी व त्याचा भाऊ विठोजी यांस मोठ्या स्नेहभावानें बोलावून आणून प्रत्येकीं बारा हजार स्वारांची मनसबि दिली व मालोजीस राजे हा किताब देऊन शिवनेरी व चाकण हे किल्ले व त्या सभोंवतालचा मुलूख सरंजामादाखल दिला आणि पुणें व सुपें ह्या परगण्यांची जहागीर करून दिली. ६ पर्वा.

१ दैवाचें बंधन. २ जाधवरावाची मुलगी जिजाई. ३ देखणी. ४ दैवशाली;

दर्शन घडे हरीचें स्वप्नीं सूचक सती **जि**जाईला ।
तव उदरीं जन्मुनि **मी** मुक्त करिन **य**वनकरगपृथ्वीला[1] ।। ६३ ।।

श्यामल[2]वर्णी सुंदर दिव्यप्रभ[3] सुप्रसन्न[4]-मुखकमल ।
स्वांक[5]स्थित पाहि सती[6] बाळ चतुर्भुज[7] सुलक्षणी विमल[8] ।। ६४ ।।

रत्नजडित मुकुट शिरीं कौस्तुभ[9] कंठीं सुकुंडलें कानीं ।
कटि-मेखला[10] मणिमयी[11] मोहे मन मूर्ति आणितां ध्यानीं ।। ६५ ।।

कटितट[12]-अंबर पिवळें, शंखगदाचक्रपद्मकरकमळें ।
श्रीवत्सांकित[13] वक्षःस्थळ, भाळ विशाळ, मृदुल पादतळें ।। ६६ ।।

---

सुदैवी. ५ कमळाच्या पाकळीसारखे.

१ यवनांच्या हातीं गेलेल्या पृथ्वीला. २ सांवळ्या वर्णाचा. ३ उत्तम तेजस्वी. ४ आनंदित. ५ स्वतःचे मांडीवर बसलेला. ६ जिजाई. ७ चार हात आहेत असा. ८ स्वच्छ. ९ समुद्रमंथनांतून निघालेलें रत्न. भगवान् श्रीविष्णूच हें धारण करितात. १० कंबरपट्टा. ११ रत्नजडित. १२ कटि ( कंबर )+तट ( प्रांत )+अंबर ( वस्त्र )=परिधान केलेलें वस्त्र. १३ एकदां ऋषींमध्यें ब्रह्मा विष्णू व शिव या तिघांमध्यें श्रेष्ठ कोण असा वाद पडला असतां त्याचा निर्णय लावण्याकरितां ऋषींनीं भृगुऋषीला पाठविलें. तेव्हां पहिल्यानें तो ब्रह्मदेवाकडे गेला, पण त्याला भृगुनें नमस्कार केला नाहीं यामुळें तो रागावला; तेव्हां त्याची क्षमा मागून कैलासांत शंकराकडे गेला तेथेंही असाच प्रकार घडला. या दोघांनाही क्रोध आलेला पाहून तसाच तो विष्णूकडे गेला; पण यावेळीं विष्णू निजलेले होते म्हणून त्यांचे छातीवर लाथ मारून त्यांस उठविलें; पण विष्णूनें न रागावतां उलट भक्ताच्या पायाला त्रास झाला असेल असें जाणून भृगुऋषीचें शांतवन केलें. यावरून विष्णूच तिघांमध्यें श्रेष्ठ व पूजार्ह आहे असें त्यानें ठरविलें. त्या वेळेपासून विष्णूनें, भक्तानें मारलेली ही लाथ आपले छातीवरील एक भूषण म्हणून मानलेली आहे. लाथ मारल्यामुळें विष्णूच्या छातीवर जी खूण उठली तिला श्रीवत्स असें म्हणतात.

बहु भव्य वैजयंती[1] माळा लोळे उरःस्थळावरती ।
आपादलंबिनी[2] ती साजे, सादर[3] रमा[4] उभी पुढती ॥ ६७ ॥

तद्गर्भवासि झाला हरि[5] वारायासि आर्य-अहितास[6] ।
दोहदभाव[7] सतीचा[8] सुचवी उदरस्थगर्भचरितास[9] ॥ ६८ ॥

पायीं दुर्ग चढावे, फोडावे कोट[10], शत्रु मारावे, ।
सिंहासनस्थ व्हावें, ध्वज धरुनि करीं स्वयें उभारावे ॥ ६९ ॥

कवचें[11] वपु झांकावें, ध्वनि दुंदुभिचे[12] रणांत परिसावे, ।
वारण[13] आरोहावे किंवा हयवररथांत[14] बैसावें ॥ ७० ॥

धनु खड्ग करीं घ्यावे, रिपुवरि शस्त्रास्त्रबाण सोडावे, ।
समरांगणीं उतरुनी दुर्मद[15] भूभारदुष्ट झोडावे. ॥ ७१ ॥

येरीकडे[16] शहाजी पडला व्यसनीं[17] निजामराज्यांत ।
झाला मोंगलरिपुला फितुर धनी. कोण वास करि त्यांत ? ॥ ७२ ॥

---

१ विष्णूच्या गळ्यांतील माळ. ही कधींही कोमेजत नाहीं. २ पायापर्यंत लोंबणारी. ३ आदरानें. ४ लक्ष्मी. ५ विष्णु. ६ आर्यांच्या शत्रूंस. ७ डोहाळे. ८ जिजाईचे. ९ पोटांत असलेल्या गर्भाच्या भावी चरित्रास. १० किल्ले. ११ चिलखतानें. १२ एक रणवाद्य आहे त्याचे. १३ हत्ती. १४ उत्तम घोड्यांच्या रथांत. १५ मदोन्मत्त. १६ दुसरीकडे. १७ संकटांत. शहाजी राजांचे वडील मालोजी राजे वारल्यावर त्यांची दौलत व मनसब निजामशहानें शहाजीराजांस दिली त्या वेळीं निजामशाहीचा कारभार मलिकंबर पहात होता. निजामशाहीला बुडविण्यासाठीं मोंगलांच्या स्वाऱ्या सुरू होत्या. दिल्लीचा बादशहा जहांगीर स्वतः मोठें सैन्य घेऊन लढावयास आला. मोंगल सैन्याची व मलिकंबराची मोठी लढाई झाली. या लढाईत शहाजीराजे यांच्या आंगच्या शौर्यवीर्यादि सकल गुणांचें निदर्शन पहिल्यानें झालें. मलिकंबराचा पराभव होऊन जरी त्यास मागें हटावें लागलें तरी शहाजीराजे यांनीं कच न खातां मोंगलांच्या

सस्त्रीक[1] मग निघाला सोडुनि तो मूर्तिजा[2] निजामास ।
निसटे रिपुवेढ्यांतुनि पडला असतांच तो सहा मास. ॥ ७३ ॥

आला शिवनेरीला[3] राय शहाजी स्त्रियेसि घेवोनी ।
परि तद्विचार रिपुशीं झगडावें परत तेथ जावोनी ॥ ७४ ॥

झाला सज्ज शहाजी मोंगलरिपुशीं लढावया जाया ।
ठेउनि दे शिवनेरिस धृतगर्भा आपुली प्रिया जाया[4] ॥ ७५ ॥

---

सैन्यावर वेळोवेळां छापे घालून त्यांस पुरेपुरे करून सोडिलें. या मर्दुमकीस्तव त्यांची निजामशाही दरबारांत मोठी वाहवा झाली. ते मोठे शूर व युद्धकुशल सरदार आहेत अशी सर्वांची खात्री झाली. मुत्सदीपणांतही ते कमी नाहींत असेंही सर्वांच्या निदर्शनास आलें. म्हणून मलिकंबर मेल्यानंतर त्या शाहीचीं सूत्रें शहाजीराजे यांच्या हातीं आलीं. त्या वेळीं मूर्तिजा निजामशहा अल्पवयी होता पण त्याच्या आईचा पूर्ण भरंवसा शहाजीराजे यांच्यावर होता. शहाजीराजे निजामशाहीचा कारभार पाहूं लागल्यानंतर मोंगल दौलताबादेवर ( त्या वेळच्या निजामाच्या राजधानीवर) चालून आले तेव्हां निजामशहास व त्याच्या आईस तेथून काढून कल्याणाजवळ माहुली नांवाच्या किल्ल्यांत त्यांना शहाजीराजानीं नेऊन ठेविलें. त्या किल्ल्यास मोंगलांनीं वेढा दिला. शहाजीराजे यांनीं सहा महिने तो किल्ला लढवून शत्रूस दाद दिली नाहीं. मोंगलांनींही असंख्य सैन्य जमविलें पण त्यांचें कांहीं चालेना. तेव्हां फितुरी करण्यास मोंगलांनीं सुरवात केली व प्रत्यक्ष निजामशहाची आई हिला दुर्बुद्धी सुचून ती फितुरीला बळी पडली. तेव्हां अशा स्थितींत तेथें राहून आपले प्राण धोक्यांत घालण्यांत कांहीं अर्थ नाहीं असें पाहून राजरोस निजामशहाला व त्याच्या आईला कळवून शहाजीराजे आपले बायकोसह निघून गेले.

१ बायकोसह. २ निजामाचें नांव. हा त्या वेळीं निजामतख्तावर बसलेला होता; ३ शिवनेरी हा किल्ला पुण्यापासून पन्नास व जुन्नरापासून पाऊण मैलावर आहे. जिजाई ज्या घरांत रहात असे त्याची एक भिंत अजून शिल्लक राहिलेली आहे. ४ बायको.

पूजी सती शिवाईदेवीला[1] भाकुनी तदीय दया ।
करि नवस होय सुत मज तरि ठेविन मी त्वदीय[2] नाम तया ॥ ७६ ॥

एकाधिक[3]पंचाशत् पंचत्रिंशतांत[4] होय मिळवून ।
शकसंवत्सरें[5] ज्याला शुक्ल[6] म्हणति, तो शुभीं नसे ऊन ॥ ७७ ॥

त्या अब्दांचा[7] फाल्गुन, कृष्ण तृतीया* सहस्त[8] भृगुवार ।
प्रसवलि सती जिजाई सुसुत दिनीं त्या सुलक्षणी फार ॥ ७८ ॥

सत्य कराया स्वोक्ति[9] क्षात्रसिसोदेमहाकुलामाजी ।
अवतरला देववर प्रणति पुन्हा ही असो तया माझी ॥ ७९ ॥

गोंडस अंग सुलोचन कांचनकांती[10] शशांकमुख[11], भाळ ।
विस्तृत, वक्षस्थळही कंठ उभा रम्य सुदृढ तो बाळ ॥ ८० ॥

पदकरकमळें कोमळ सुप्रभमणिनख[12] शरीर सुकुमार[13] ।
आजानुबाहु[14] उच्चस्कंधस्थळ सरळनाक सु-कुमार[15] ॥ ८१ ॥


---

१ शिवनेरी गडावरील प्रसिद्ध देवी. २ तुझें. ३ एकावन. ४ पंधराशेंमध्यें. ५ शालिवाहन शकाचें वर्ष. शालिवाहन नांवाचे राजानें भारतवर्षामध्यें सर्वत्र दिग्विजय केले. तेव्हांपासून त्यानें आपल्या नांवाच्या नवीन वर्षगणनेला आरंभ केला. या वर्षगणनेला शालिवाहन शक अगर शक म्हणत आले आहेत. नवीन शक सुरू करणें हें सर्वत्र विजयाचें व सर्वत्र मान्यतेचें लक्षण आहे. श्रीशिवाजी महाराजांला ज्यावर्षीं रायगड येथें राज्याभिषेक झाला त्या वर्षापासून शिवशकही चालू आहे. ६ संवत्सराचें नांव. प्रभवादि ६० संवत्सरांपैकीं तिसरा संवत्सर. ७ वर्षांचा. ८ हस्तनक्षत्रासह. ९ आपलें वचन. आर्या २९ पहा. १० सुवर्णासारखा अंगाचा वर्ण आहे ज्याचा तो. ११ चंद्रासारखा आहे चेहरा ज्याचा तो. १२ ज्याचीं नखें चमकणाऱ्या रत्नाप्रमाणें आहेत तो. १३ कोमल; नाजूक. १४ ज्याचे हात उभा राहिला असतां गुडघ्यापर्यंत पोहोंचतात तो. १५ चांगला मुलगा. * शिवाजी महाराजांच्या जन्मतिथीबद्दल बराच

वाद आहे व अजून त्या बाबतींत एकमत जाहलेलें नाहीं. पण ह्या आर्यंत सांगितलेल्या तिथीसच त्यांचा जन्म झाला असें मानण्यास पुढील आधार फार बळकट आहे.

शिवाजी महाराज जन्मले त्या वेळेचें जन्म टिपण शिवराम या नांवाचे ज्योतिषानें करून ठेविलें आहे. तें असें:—

संवत १६८६ ( शके १५५१ ) फाल्गुन वदि ३ शुक्रे उ. घटी ३०।९ राजा शिवाजी जन्म । र १०।२३ ल ४।२९.




हें टिपण शिवाजी महाराजांच्या वेळींच लिहिलें गेलें व त्याच स्थितींत तें उपलब्ध झालेलें आहे. शिवभारतकार यांनीं वरील तिथीस शिवरायांचा जन्म झाला असें सांगितलें आहे. शिवभारत हा ग्रंथ शिवाजी महाराजांच्या आज्ञेनें व त्यांच्याच पदरेच्या परमानंद कवीनें लिहिला असल्यामुळें त्याला शिवाजी महाराजांचा जन्मकाळ समजण्यास मुळींच अडचण नव्हती. बिआवर संस्थानांतील पंडित मिठालाल व्यास यांच्या संग्रहांतील जुन्या बाडांत शिवाजीच्या कालाच्या अनेक कुंडल्या आहेत व त्या विश्वसनीय आहेत या विषयीं अजमीर येथील संशोधन खात्याचे मुख्याधिकारी राय बहादुर पंडित गौरीशंकर ओझा यांनीं सविस्तर विवेचन केलें आहे. त्यावरून या बाडांतील शिवाजी महाराजांच्या कुंडलीचें हस्ताक्षर शिवराम ज्योतिषाच्या हातचें आहे व हा शिवराम केव्हां जन्मला व केव्हांपर्यंत हयात होता हें निश्चित करण्याचें साधन या बाडांत असल्यामुळें तो शिवाजी महाराजांचा समकालीन होता हेंही म्हणतां येतें. शिवशकावलीमध्येंही वरील तिथीसच शिवाजी राजे शिवनेरीस उपजले असा उल्लेख केलेला आहे. शिवाजी महाराजांचा जन्म कोणी शके १५४८ तर कोणी शके १५४९ या वर्षी झाला असें प्रतिपादन करून कांहीं जन्मकुंडल्यांचा त्यास आधार देतात पण त्या कुंडल्यांवरून तिथी, नक्षत्र वगैरेचा कांहींच मेळ बसत नाहीं.

गंभीरनाद पसरे घनरवसम[1], फोडितां प्रथम टाहो[2] ।
सोऽहं[3] सोऽहं[3] सांगे काढिन आमूल[4] यवनकांटा[5] हो ! ॥ ८२ ॥

द्वितीय[6] टाहो सांगे साँऽहं[7] साँऽहं महाप्रबलशक्ती[8] ।
आर्तत्राण[9], निवारण दुष्टांचें करिन; अन्य ना शकती ॥ ८३ ॥

गो, ब्राह्मण, श्रुतज्ञ[10], स्मृतिविद्[11], यति[12], सिद्ध[13], साधु, संन्यासी ।
तीर्थें, वेद, पुराणें रक्षिन मी; हें न होय अन्यासी ॥ ८४ ॥

या शुभसमयीं प्रेषी[14] साध्वी[15] ती दूत जे त्वरितगामी ।
शुभवार्ता कळवाया पतिराया जो तदा सुसुतकामी[16] ॥ ८५ ॥

होता विजापुरीं[17] तैं शाहाजी, तेथ दूत येऊन ।
कळविति शुभवार्ता ती नारळ साखर समीप ठेऊन ॥ ८६ ॥

पतिराय[18] तुष्ट झाला, झाला सुत हें सुवृत्त ऐकोनी ।
आस धरी मुक्त करिल मज हा सुत राज्यभार घेवोनी ॥ ८७ ॥

कुलदेवदेवतांसी[19] स्मरुनी आधीं तयांसि अर्पियलें ।
शुभ फल रायें तेव्हां विविधान्नें[20] ब्राह्मणांसि तर्पियलें[21] ॥ ८८ ॥

---

१ मेघगर्जनेसारखा २ जन्मतांच पहिल्यानें मुलें आवाज करितात तो. ३ सो ( सः )=तो ( परमेश्वर )+ऽहं ( अहम् )=मी ( आहें ). ४ मूळासहित. ५ यवनरूपी कांटा. ६ दुसरा. ७ सा=ती ( मायाशक्ति )+ऽहं ( अहम् )=मी ( आहें ). ८ मोठी बलवान शक्ती. ९ पीडिलेल्या जनांचे संरक्षण. १० वेद जाणणारा. ११ स्मृति ( वेदाच्या आधारें केलेले कायदे ) जाणणारा. १२ तपस्वी. १३ अणिमादि आठ सिद्धि ज्याला प्राप्त झाल्या आहेत असा. १४ पाठवी. १५ जिजाई १६ चांगला मुलगा व्हावा अशी इच्छा करणारा. १७ अदिलशाहीची राजधानी विजापूर तेथें. १८ शहाजी. १९ श्रीसांब व भवानी देवी यांसी. २० नानाप्रकारच्या अन्नानें. २१ संतुष्ट केलें.

84570

तोषवि देउनि दूतां **राय शहाजी** सुवस्त्र-आभरणें[१] ।
बहुदानधर्म करुनी **रायें** केलें यथार्ह[२] जें करणें ॥ ८९ ॥

साखरपुडे विडे किति देती **राया विजापुरस्थ-जन** ।
**राय**हि तेंवि तयांसी देई, ज्यांचें तदा प्रफुल्ल मन ॥ ९० ॥

झाला सुत **राया**ला, कळतां हें वृत्त **बादशाहातें**[३] ।
सन्मानिलें तयानें धाडुनि वस्त्रें अमूल्य **राया**तें ॥ ९१ ॥

बहुमोल-वस्त्रदानें **रायें** सत्कारिले सुविप्रवर ।
गोशतदानें ग्रहही शांतविले फार जे अनिष्टकर ॥ ९२ ॥

सुतमुखदर्शन ध्याया जावें वाटे परी न तो जाय ।
हतबल[४] रिपु केल्याविण जो क्षत्रिय तो फिरे परत काय ? ॥ ९३ ॥

चित्र कलाकुसरीचीं[५] बहुरंगाचीं अशीं मनोहारी ।
पाठवि सुतार्थ वस्त्रें **राय शहाजी** अमोल जरतारी ॥ ९४ ॥

**गणपति**[६]पूजनपूर्वक षष्ठीपूजन करोनि **जिवंतीस** ।
पूजियली आचार्यें मग तोषविली प्रसूति-शिवंतीस ॥ ९५ ॥

भूतपिशाच-उपाधी राक्षसबाधा न होय त्या बाळा ।
म्हणुनी दिधले बलि त्यां बहुविध तेंवी तसेचि दिक्पाळां ॥ ९६ ॥

एकादश दिवसीं त्या बाळाला स्नान घालुनी कुलजा ।
ओंवाळिती सुमंगल दीपारति त्यासि, काळ अनुकुल ज्यां ॥ ९७ ॥

---

१ चांगलीं वस्त्रें व अलंकार. २ जसें करण्यास पाहिजे तसें; उचित. ३ अदिलशहाला. ४ नष्टबल; नष्टशक्ति; बलरहीत. ५ नक्षी काढलेलीं. ६ गणपति हा शंकर आणि पार्वती यांचा पुत्र. संकटनिवारणकर्ता म्हणून हा प्रसिद्ध आहे. कोणत्याही मंगलकार्याच्या आरंभीं गणपतीची पूजा व आराधना करण्याचा

धृतकनक[1]पीतवसना मृग[2]नयना रत्न[3]भूषणा रुचिरा[4] ।
साध्वी, यदीय[5] अंकीं[6] बाळ सजे जेंवि कोंदणीं सुहिरा ॥ ९८ ॥

**शि**वनाम ठेविलें त्या बाळाचें सविधि[7] बारसें करुनी ।
म्हणति **शि**वाजी परि त्या, श्रवतां तें बाहु येति फुरफुरुनी ॥ ९९ ॥

पीत कुसुंबी केशरि कुंच्या वस्त्रें अनेक वर्णाचीं ।
शेले शाल्व सुंदर रत्नजडित भूषणें सुवर्णाचीं ॥ १०० ॥

इत्यादि-वस्तुपूर्वक[8] बाळंतविडे कितीतरि सतीला[9] ।
देती बांधवकुलजा[10] बहु खण लुगडींहि अधिक भरतील ॥ १०१ ॥

मयूरपोपटमैना-प्रतिमा[11] ऐशा कितीक पक्ष्यांच्या ।
आप्तेष्ट पाठवीती बांधाया पाळण्यासि बाळाच्या ॥ १०२ ॥

ग्रह वर्तविती जोशी काढुनियां कुंडली सुबाळाची ।
श्री, यश, सुख, बल भाग्यहि वरितिल या; या न भीति काळाची ॥

उंच असो खोल असो गहन असो परम दूर विकट असो ।
लक्ष्यस्थळ[12], सहज तिथे तद्गति, संदेहलव[13] मनीं न वसो ॥ १०४ ॥

करिलचि पराक्रमी हा निर्यवनी ही मही[14] महाबाहू[15] ।
**दि**ल्लींद्र[16]शीर्षकमलीं थयथय नाचेल संशय न वाहूं ॥ १०५ ॥

---

प्रघात आहे. ७ जीवंतिकेस ( एका देवतेस ). ८ बाळंतिणीला शिवणारणीस. ९ दिशांचें रक्षण करणाऱ्यांना.

१ सोन्याप्रमाणें पिवळें वस्त्र धारण केलेलें आहे अशी. २ मृग म्हणजे हरिण त्याचे डोळ्यांप्रमाणें जिचे डोळे आहेत अशी. ३ रत्नाचे अलंकार घातले आहेत अशी. ४ तेजस्वी; पाणिदार. ५ जिच्या (जिजाईच्या). ६ मांडीवर. ७ विधिसह; विधियुक्त. ८ वस्तू घेऊन. ९ जिजाईला. १० आप्त इष्ट मित्र यांच्या स्त्रिया. ११ आकृति; चित्रें. १२ जाऊन पोहोंचावयाचें आहे अशी जागा. १३ तिळभरही संशय. १४ पृथ्वी.

गड[1] कोट[2] दुर्ग[3] जिंकुनि घुसळिल सागर करील अर्यंत[4] ।
प्रस्थापिल स्वसत्ता अप्रतिहत[5] हा दिगंत-पर्यंत ॥ १०६ ॥
पृथु[6]-शिबि[7]-नहुष[8]-युद्धिष्ठिर[9]-भरत[10]-हरिश्चंद[11]-राम[12]-नल[13]सम हा ।
होइल दाता धाता[14] त्राता समयज्ञ[15] सुज्ञ सनय[16] महा ॥ १०७ ॥

---

१५ पराक्रमी. १६ दिल्लींद्र (दिल्लीचा बादशहा)+शीर्ष (मस्तक)+कमलीं.= दिल्लीच्या राजाच्या मस्तकरूपी कमलावर म्हणजे दिल्लीच्या बादशहाच्या मस्तकावर.

१ डोंगरावरील किल्ले. २ जमिनीवरील किल्ले. ३ आंत प्रवेश करण्यास अत्यंत कठीण असा किल्ला. विशेषतः नदी अगर समुद्राजवळचे किल्ले. ४ अरि+अंत=शत्रूचा नाश. ५ अबाधित. ६ एका राजाचें नाव. हा वेनराजाचा मुलगा. सर्व प्रजेनें जेव्हां दुष्ट वेनराजाचा वध केला त्यावेळीं आपल्याला कोणीतरी राजा पाहिजे म्हणून वेनराजाच्या मृतशरीराचा उजवा हात तिनें घांसला. त्या घर्षणामधून अग्नि-सारखा दैदीप्यमान असा पुत्र उत्पन्न झाला. ह्याला पाहून पृथ्वीनें आपल्या वनस्पती व फलवृक्ष गिळून टाकिले पण फिरून त्याच्या शरसंधानाला भिऊन आपल्या वनस्पती व फलवृक्ष तिनें त्याच्या प्रजेला परत दिले. ह्याच्या वेळेपासूनच या भूमीला पृथ्वी ही संज्ञा प्राप्त झाली, अशी कथा आहे. ७ एका राजाचें नाव. हा सोमवंशीय उशीनरराजाचा ज्येष्ठ पुत्र. शिबिराजाविषयीं महाभारतांत दोन कथा आहेत. पहिली कथा अशीः–शिबिराजाची परीक्षा पाहण्याकरितां इंद्रानें श्येनाचें (ससाण्याचें) रूप घेतलें व अग्नीनें कपोताचें (कबुतराचें) रूप घेतलें. नंतर श्येन आपले पाठीस लागला आहे अशा स्थितींत कपोत शिबिराजाजवळ आश्रयासाठीं आला. त्याला त्याचा आश्रय मिळाला हें पाहून 'माझें भक्ष्य मला दे' असें राजास श्येन म्हणूं लागला. तेव्हां कपोताचे भारंभार शिबिराजानें आपल्या शरीराचें मांस श्येनास देण्याचें कबूल केलें. परंतु शरीराचा बराच भाग तोडून तराजूंत घातला तरी कपोत जडच येऊं लागला, तेव्हां शिबिराजा स्वतःच पारड्यांत बसला. तें पाहून इंद्र व अग्नि उभयतां संतुष्ट झाले व त्यांनीं आपलीं रूपें प्रगट करून शिबिराजास वर दिले. दुसरी कथा आहे ती अशीः–या राजाचें सत्व पाहण्यासाठीं ब्रह्मदेव विप्ररूपानें आला. आणि त्यानें राजाच्या पुत्राचें (बृहद्गर्भाचें) मांस खावयास मागितलें. राजानें मांस शिजवून तयार केलें, पण विप्र कोठें दिसेना; तेव्हां मांसपात्र

अवयव पुष्ट मनोहर झाले येतांचि बाळसें त्याला ।
खुलविति ते सौंदर्या अनवद्या[1], भूषणें जरि न ल्याले[2] ॥ १०८ ॥

---

मस्तकावर घेऊन शिबिराजा विप्राचा शोध करीत फिरूं लागला. तों विप्र राजवाड्यास आग लावीत आहे असें त्यानें पाहिलें; पण मनांत विकल्प न धरितां राजानें विप्राची प्रार्थना करून सिद्ध केलेलें मांस स्वीकारावें अशी विनंती केली. मीं तें खात नाहीं तूंच तें खा असें प्रत्युत्तर त्या विप्रानें केलें. त्याप्रमाणें शिबिराजा तें मांस खाणार तों ब्रह्मदेवानें प्रसन्न होऊन, आपलें स्वरूप प्रकट करून, शिबिराजास त्यानें आशीर्वाद दिला व त्याचा पुत्र पूर्ववत् सजीव करून तो अंतर्धान पावला. ८ हा चंद्रवंशांतील राजा व ययातीचा बाप. हा अत्यंत बुद्धिमान व पराक्रमी असा राजा होता. वृत्राच्या वधाचें पापक्षालन करण्यासाठीं इंद्र पाण्यांत लपून बसला असतां याला इंद्राच्या सिंहासनावर बसविण्यांत आलें होतें. ९ धर्म. पान ४ टीप १३ पहा. १० हा दुष्यंत राजाचा मुलगा. हा चक्रवर्ती राजा होता. ह्याच्या नांवावरून ह्या भूमीला भारतवर्ष असें नांव पडलें. कौरव व पांडव ह्यांचा हा पूर्वज होय. ११ पान ४ टीप १४ पहा. १२ हा दशरथराजास कौसल्येपासून झालेला पुत्र. हा विष्णूच्या दहा अवतारांपैकीं सातवा अवतारी पुरुष. बाळपणीं विश्वामित्राबरोबर राहून ऋषींच्या यज्ञयागाचें राक्षसांपासून श्रीरामचंद्रानीं संरक्षण केलें. सीतेच्या स्वयंवराच्या समारंभांत जाऊन शिवधनुष्याचा भंग करून यांनीं सीतेला पणांत जिंकिलें. स्वतःला राज्याभिषेक होण्याच्या ऐन वेळीं आपल्या पित्याच्या आज्ञेवरून आपला भ्राता लक्ष्मण व पत्नी सीता यांसह श्रीरामचंद्र १२ वर्षें वनवासांत गेले. वनवासांत असतांना मारुतिरायाच्या सहाय्यानें देवादिकांनाही बंदींत टाकणाऱ्या लंकाधीश रावणाचा युद्धांत वध करून यांनीं त्याचा नाश केला व नंतर अयोध्यानगरींत येऊन पूर्ववत् प्रजेचें पालन केलें. श्रीराम एकवचनी, एकपत्नी व एकबाणी होते. १३ नल हा निषधदेशाचा राजा. हा थोर अंतःकरणाचा असून अत्यंत सद्गुणी असा होता. हा देखणा, सत्यवादी, पराक्रमी व अश्वविद्याप्रवीण असा होता. पुण्यश्लोकांत याची गणना आहे.

“ पुण्यश्लोको नलो राजा पुण्यश्लोको युधिष्ठिरः ।
पुण्यश्लोका च वैदेही पुण्यश्लोको जनार्दनः ॥ ”

१४ आद्यप्रवर्तक; निर्माणकर्ता. १५ प्रसंग जाणून वर्तन करणारा. १६ राजनीतिकुशल.

१ निर्दोष. २ अंगावर धारण केलीं.

भूषविलें अंगांगें[1] द्युतिमन्[2]मणिमय-सुवर्ण-आभरणें ।
फांके प्रभा तयांची स्फटिकाची जशि वरी पडुनि किरणें ॥ १०९ ॥

पिंपळपान कपाळीं वाघनखें दों[3] गळां, मधीं पुतळी ।
गळसर जुवळी काळी, कांचन-जिवती[4] नवी, पदेक[5] जवळी ॥ ११० ॥

कांचन[6]सूत्रीं ओंवुनि कांचन[7]मणि सप्रवाळ[8] नीळमणी ।
मणिबंधन[9]नग रचिले; विलसति जे **अ**रुण[10]तुल्य बाळमणीं[11] ॥ १११ ॥

अंगद[12] नगही त्याचे नानाविध रुचिर[13]रत्नखचिताचे ।
मणिमय कटिसूत्र[14], पदीं नूपुरवाळे अमोल जडितांचे[15] ॥ ११२ ॥

निटिलीं[16] कस्तुरि-तिटली गाल[17]तटीं रम्य किट्ट-तिटि[18] नटली ।
सांजन[19] पक्ष्में[20] तटलीं, भ्रूमध्यस्थित अबीर-तिट थटली[21] ॥ ११३ ॥

तों ये **राय शा**हाजी हरुनी मदमत्त[22]शत्रुचा गर्व ।
बाळमुखांबुज[23] पाहे हृदयीं तैं आठवूनियां **शर्व**[24] ॥ ११४ ॥

गोगजहय[25]भूकांचनमुख दानें[25] मुक्तहस्त[26] **राया**नें ।
दिधलीं पात्रजनांसीं, जेवविल्या विप्रपंक्ति बहु यानें ॥ ११५ ॥

---

१ प्रत्येक अवयव. २ चमकणारीं रत्नें व सोनें यांचे घडलेले दागिने. ३ दोन. ४ मुलांचें अरिष्ट टळावें म्हणून पुतळीच्या आकाराची जीवंतिका देवतेची प्रतिमा गळ्यांत घालितात ती. ५ गळ्यांत घालण्याचा दागिना. ६ सोन्याच्या तारेंत. ७ सुवर्णाचे मणी. ८ पोंवळ्याचे मण्यासहित. ९ मनगट्या. १० उगवत्या सूर्याच्या प्रभेप्रमाणें. ११ बाळाच्या मनगटांत. १२ बाहूवर घालण्याचे दागिने. १३ तेजस्वी रत्नें यांनीं जडविलेले. १४ कमरेंत घालण्याची सांखळी. १५ रत्नांनीं जडविलेले असे. १६ कपाळावर. १७ गालावर. १८ काजळाची तिटली. १९ काजळ घातलेलीं आहेत अशीं. २० डोळ्यांच्या पापण्या. २१ थाटली. २२ मदानें उन्मत्त झालेल्या शत्रुचा. २३ बाळाचें (शिवाजीचें) मुख हेंच अंबुज म्हणजे कमळ तें. २४ शंकर. २५ गो, गज, हय, भू, कांचन हीं मुख्य आहेत ज्यांमध्यें

द्वादशमास क्रमितां यत्न करी बाळ फार रांगाया ।
हात सुटे ऊर फुटे ओष्ठ तुटे तरि न भीति लव गा ! या ॥ ११६ ॥

प्रतिदिवशीं स्वैर[1]गती वाढे तो शुक्लपक्षचंद्र जसा ।
तच्चर्या अत्यद्भुत वाटे हा बाळ भाले[2]चंद्रजसा ॥ ११७ ॥

हीरकहरित्सुरत्नीं[3] प्रांगण[4] रचिलें सुता विहाराया[5] ।
हास्योत्पादक[6] नव नव लीला बहु करुनि दावि हा राया ॥ ११८ ॥

रत्नांगणतल[7]बिंबित निजबिंबा[8] तो धरावया झगडे ।
मानुनि त्या अन्यार्भक[9] रगडे उखडे तयासि ओरखडे ॥ ११९ ॥

पक्षी उडतां [10]व्योमीं पडत असे प्रांगणीं चलच्छाया[11] ।
स्पर्धा करी तिशीं तो रांगे भरभर सलील[12] पकडाया ॥ १२० ॥

श्रमला बहु, परि माते पाहुनि रांगे तियेकडे जाया ।
नूपुर[13]-छुमछुम-सुरवें[14] रमवुनि तिस खुणवि तो कडे घ्याया ॥ १२१ ॥

दाटुनि दटावि त्या ती ठेवुनि नाकावरी स्व-अंगुलिला ।
चिडवी सरेचि मागें जों जों तो ये पुढें करी कुलिला[15] ॥ १२२ ॥

---

अशीं दानें. २६ ज्याचा हात मुक्त (मोकळा, सढळ) आहे अशा रायानें.

१ कोणत्याही तऱ्हेचा विरोध न येतां. २ भालीं आहे चंद्र ज्याच्या असा जो शंकर त्याचे पासून जन्मलेला ह्यासारखा=कार्तिकेयासारखा. हा देवांच्या सेनेचा नायक होय. हा श्रीशंकराच्या वीर्यानें कृत्तिकांपासून झाला म्हणून ह्यास कार्तिकेय असें म्हणतात. अगदीं लहानपणापासूनच ह्यानें पराक्रम करण्यास सुरवात केली. लहानपणींच यानें तारकासुरास मारिलें. ३ हीरक (हिरा)+हरित् (हिरवें)+सुरत्नीं=हिरे, पाच या रत्नांनीं. ४ आंगण. ५ खेळाया. ६ हास्य उत्पन्न करणाऱ्या. ७ रत्नें बसविलेलीं आहेत अशा आंगणतलामध्यें प्रतिबिंबित झालेल्या. ८ आपले प्रतिबिंबाला (पडच्छायेला) ९ दुसरें मूल. १० आकाशांत.

रुदनोद्यत[1] बालकमुख पाहुनि तों ती अतीव[2] कळवळली ।
वात्सल्यें[3] झटदिशिं त्या कवळुनि, चुंबुनि मुखीं, गृहीं वळली ॥१२३॥

एवंविध[4] बहु लीला करि माता प्रेमपात्र बाळाशीं ।
माताच काय ? पण तत् कौतुक करि सृष्टि; विदित सकळांशी ॥ १२४ ॥

वस्त्राभरणें[5] लेवुनि धात्री[6] ने त्या यदा फिरायाला ।
पवनाहतकुसुमांहीं[7] पूजी विनता[8] वसुंधरा[9] याला ॥ १२५ ॥

किलकिल रवं[10] करुनी खग[11] नाचति उडती तयासि पाहूनी ।
झाला आनंद तयां, कधिंही झाला न अधिक याहूनी ॥ १२६ ॥

किर्मीरपुष्पपुष्पितविटपनिवहपाणिपल्लवें[12] करिती ।
स्वागत वृक्ष तयाचें वल्लिहि निजदलच्छत्र[13] वरि धरिती ॥ १२७ ॥

त्या तेथ अंगुलीचा आश्रय देवोनि चालवायास ।
लावितसे धात्री परि करि तिस बहु काल तो लवायास ॥ १२८ ॥

अंगुलि-आश्रय सुटतां चाले जरि तो अडे पडे धीट ।
धात्रीवरि रुसुनि करी कुंजाप्रति[14] जावया तडक नीट ॥ १२९ ॥

---

११ धांवती सावली. १२ सहज रीतीनें. १३ पायांत घालण्याचा दागिना. १४ मंजुल आवाजानें. १५ कुलि=हात.

१ रडण्याच्या बेतांत आलेलें म्हणजे रडवें. २ फार. ३ अपत्यप्रेमानें; पुत्रप्रेमानें. ४ अशा प्रकारच्या. ५ वस्त्र व अलंकार. ६ दाई. ७ वाऱ्यानें वाहून आणलेल्या फुलांनीं. ८ नम्र. ९ पृथ्वी. १० आवाज, शब्द. ११ पक्षी. १२ किर्मीर ( नानारंगी )+पुष्प ( फुलें )+पुष्पित ( फुललेल्या )+विटप ( झाडांच्या फांद्या )+निवह ( समुदाय )+पाणिपल्लव ( नाजूक हात )=नानारंगाच्या फुलांनीं फुललेल्या फांद्यांचे समुदाय हेच नाजूक हात त्यांनीं. १३ आपलीं पानें हेंच छत्र तें. १४ लतामंडपाकडे.

श्रमल्यें लवुनि म्हणुनि म्यां केली वर मान, अंगुली समज ।
सुटली. रुसूं नको बा ! धरिं, दे तव करकमळकळीस[1] मज ॥ १३० ॥

यापरि बोलिलि धात्री तरि न करी हस्त निज पुढें द्याया ।
मौनि[2] न मानी[3] तिस तो, परि उचली त्या बळें कडे ध्याया ॥ १३१ ॥

राग न निवे करी बहु धडपड उतरावयास तों वदली ।
'आईकडेस नेत्यें चल' तों वृत्ती सहर्ष[4] तो बदली ॥ १३२ ॥

आई मूर्ति अशी ती मोही आबालवृद्धजनधीला[5] ।
लागे न ओहटी परि भरति जिच्या प्रेमपूरजलधीला[6] ॥ १३३ ॥

धात्रीकटितट[7] सोडुनि उतरे झटपट सहास[8] पाहूनी ।
निज माते, बोले तो तिज मज उचलोनि घेइ बाहूंनीं[9] ॥ १३४ ॥

घे मंद[10] कले[11] तुझ्या[12] गे ! तळें[13] दे उडतो[14] सुलेख[15] तंदोळ[16] ।
प्रेमें उचंबळे ती ऐकुनि तन्मधुर बोबडे बोल ॥ १३५ ॥

चुंबुनि पुनःपुन्हा ती प्रेमभरें त्या भुजांतरीं[17] घट्ट ।
धरुनी कवळी परि तो सोडीना तिळहि आपुला हट्ट ॥ १३६ ॥

मिळतां पक्षिप्रतिमा[18] झाला त्या हर्ष फार **शि**वबाळा ।
होय जसा केकीलीं[19] **ग्री**ष्मार्ता[20] देखतांचि घनमाळीं[21] ॥ १३७ ॥

---

१ कर हेंच कमळ त्याच्या कळीला. २ जुमानी. ३ अभिमानी. ४ हर्षानें. ५ मुलापासून तों वृद्धापर्यंत सर्व जनांच्या बुद्धीला. ६ प्रेमाचा पूर हाच जलधी म्हणजे समुद्र त्याला. ७ दाईची कंबर. ८ हांसत. ९ हातांनीं. १० मज. ११ कडे. १२ तुझ्या. १३ चल. १४ उडतो. १५ सुरेख. १६ चंडोल. १७ बाहूंमध्यें; पोटाशीं. १८ पक्ष्यांचीं चित्रें. १९ मोराला. चंद्राला पाहून चकोरपक्ष्याला तसाच मेघाला पाहून मोराला फार आनंद होतो व तो नाचावयास लागतो. २० ग्रीष्मऋतूंतील उष्णतेमुळें पीडित झालेल्या. २१ मेघांच्या रांगा.

हसतां दिसे तदास्यीं[1] धवल[2] विरल-तीक्ष्ण[3]धार-दशन[4]तती ।
कुंदकलि[5]श्री हरुनी कठिणपणीं हीरकां[6] करी नत[7] ती ॥ १३८ ॥

ऐकुनि कोकिलकूजित[8] 'कू ऊ' करि हा पुनःपुन्हा निकरें[9] ।
अनुकरण[10]रवाशीं ह्या स्पर्धावें सर्वदा विहग[11]निकरें ॥ १३९ ॥

दुडदुड चालुनि उचली फेंकी मांजर तरी तयाजवळ ।
जाई पुनःपुन्हा तें, प्रेमें दे तो स्वयें तया कवळें[12] ॥ १४० ॥

शुकसाळुंकीमैनादिक हर्षें पिंजरस्थखग[13] निकरें[14] ।
फडफडती रव करिती कुरवाळी जों तयांसि धरुनि करें ॥ १४१ ॥

पंचाब्द[15] घालवीले यापरि तेणें रमोनि बाळपणीं ।
आतां कथितों पुढच्या क्रीडा ज्या करुनि दावि बाळमणी ॥ १४२ ॥

भ्रुकुट्या चढवुनि करि तो डोळे मोठे भयप्रदा[16] मुद्रा ।
पाहुनि पळती सौंगडि लीला ऐशा प्रकंपदा[17] रुद्रा[18] ॥ १४३ ॥

क्रीडेमाजीं[19] करि हा वीरोचितसे निजांगविक्षेप[20] ।
आविर्भाव तयाचे घ्यावे सुनटें न करुनि संक्षेप ॥ १४४ ॥

जों जों वाढे तों तों करि हा बहु ज्या प्रगल्भ[21]शा लीला ।
शोभाव्या सुज्ञमतें धीगुणसंपन्न[22]शौर्यशालीला ॥ १४५ ॥

---

१ त्यांच्या मुखांत. २ पांढरे. ३ अणकुचीसारखी धार आहे ज्यांना. ४ दशन ( दांत )+तति ( पंक्ति ). ५ कुंदाच्या कळ्यांची शोभा. ६ हिऱ्याला. ७ नम्र. ८ कोकिळेचें ओरडणें. ९ जोरानें. १० हुबेहुब नक्कल केलेल्या आवाजाशीं. ११ पक्ष्यांच्या समुदायानें. १२ घांस. १३ पिंजऱ्यांत असलेले पक्षी ( खग ). १४ जोरानें. १५ पांच वर्षें. १६ भीति देणारी. १७ थरकांप उत्पन्न करणाऱ्या. १८ भयंकर. १९ खेळामध्यें. २० आपल्या अंगाचे हावभाव. २१ प्रौढ अशा. २२ बुद्धि व गुण यांनीं युक्त अशा शूराला.

मोडुनि डावी मांडी, मांडी तो ठाण[1] बाण हाणाया ।
धनु करुनी काठीचें पाहे आकर्ण[2] दोरि ताणाया ॥ १४६ ॥

मृण्मयगज[3]हयपत्ती प्रांगण कल्पोनि तो रणांगणसें ।
भिडवी लढवी आपण सौंगडि घेवोनि जे धटिंगणसे ॥ १४७ ॥

सिंहासम गर्जुनि तो घालि उडी भेडवी स्वदायांना ।
पळवी सैरावैरा त्यां तों हांसे खदा खदा त्यांना ॥ १४८ ॥

हस्तीसम चीत्कारी खिंकाळी कधिंकधीं हयापरि तो ।
व्याघ्रासम डुरकेही; ऐके तैसाचि तो ध्वनी करितो ॥ १४९ ॥

गड बांधी मातीचे सौंगडि घेउनि समस्त साह्यास ।
खेळे द्वंद्व करी परि जिंकि न कोणीहि मस्तसा ह्यास ॥ १५० ॥

असकृत्[4] भरभर चेंडू उंच उडवि तो नभीं[5] महा वेगें ।
रोधिलें[6] निज पथ मानुनि विव्हल बहु तपन[7] भी महावेगें[8] ॥ १५१ ॥

चाटुनि तदंग चढती पुच्छें शतदां क्षणांत हालवुनी ।
शुनक[9] धरिति धीर न जरि चुचकारी फिरवि हस्त हा लवुनी ॥ १५२ ॥

प्रतिदिवशीं भक्तीनें गोसेवा हा करीच नियमानें ।
चारी जल पाजि तयां नवलाचें हें तदीय[10] वयमानें ॥ १५३ ॥

होउनि अधीर उठती हुंगिति चाटिति पुनःपुन्हा गाई ।
**शि**वबाळा प्रेमानें, स्पर्धा अतिमात्र, कोण ती घाई ! ॥ १५४ ॥

---

१ बाण सोडतेवेळीं विशिष्ट बैठकींत शरीर ठेवतात त्यास ठाण म्हणतात. २ कानापर्यंत. ३ मातीचे हत्ती, घोडे व पायदळ. ४ वारंवार. ५ आकाशांत. ६ अडवील. ७ सूर्य. ८ महा+आवेगें=मोठ्या चिंतेनें=धास्तीनें. ९ कुत्रे. १० त्याच्या.

सप्तमवर्षारंभीं[1] वर्णलिपिग्रहणयोग्य[2] **शि**वबाळा ।
गुर्वंकीं[3] बसवियलें **रा**यें पाहुनि सुयोग शुभ वेळा ॥ १५५ ॥

पूजुनि **स**रस्वतीला[4] प्रथमारंभीं गुरुप्रती नमन ।
करुनी पाठ गिरवि तो विद्यार्जन-उद्यत[5] प्रसन्नमन ॥ १५६ ॥

अति तीक्ष्णबुद्धि पाहुनि तद्वत्तत्तीव्र[6] धारणाशक्ती[7] ।
विस्मय पावति गुरुजन ज्यांचे ठायीं अपार तद्भक्ती ॥ १५७ ॥

सर्वय सहाध्यायीहुनि अधिक प्रिय हा गुरूसि तत्काळ ।
विनयादिगुणें झाला; सकलां यश दे सुविद्य तो बाळ ॥ १५८ ॥

नीतिपुराणेंशास्त्रें करतलगत ज्या असा असामान्य ।
पंडित गुरुवर त्याचा; कामाचे काय अन्य सामान्य ? ॥ १५९ ॥

करि तो सकळा विद्या श्रुतमात्रें[10] अवगता[11] कुमारवरें[12] ।
परि नम्रशील सविनय झाला कोणिहि तसा न आजवर ॥ १६० ॥

**भा**रत**भा**गवतादिग्रंथश्रवणेंकरूनियां[13] धर्मीं ।
द्विगुणित[14] झाली श्रद्धा त्याची तैशीच आपुल्यों कर्मीं[15] ॥ १६१ ॥

---

१ सातव्या वर्षाच्या आरंभीं. २ अक्षरांची ओळख होण्यास योग्य झाला आहे अशा. ३ गुरुच्या मांडीवर. ४ ही ब्रह्मदेवाची शक्ती. ही वाणीची व विद्येची देवता होय. ही प्रसन्न व्हावी म्हणून विद्या शिकण्याला प्रारंभ करण्याचे वेळीं हिचें पूजन करितात. ५ विद्या मिळविण्यास उत्सुक झालेला. ६ तद्वत् ( त्याप्रमाणें )+तत् ( त्याची )+तीव्र ( तीक्ष्ण ) ७ ग्रहण करून ध्यानांत ठेवण्याची शक्ती. ८ समवयाचे, बरोबरीचे. ९ ज्यानें उत्तम प्रकारें विद्या संपादन केली आहे असा. १० ऐकल्याबरोबर. ११ प्राप्त. १२ कुमार (बाळ)+वर (श्रेष्ठ). १३ व्यासानीं रचिलेले भारत व भागवत हे ग्रंथ ऐकून. भारत हें वीररसप्रधान काव्य आहे. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र यांचीं कर्तव्यें कोणतीं, हें सांगून उत्तम व्यवहार, उत्तम राजनीति, उत्तम तत्वें यांचें चांगले रीतीनें त्यांत विवरण केलें

क्षत्रियवृत्तिहि बाणलि, बाणलिंही राजनीतिचीं तत्वें ।
त्याचे ठायीं श्रवणें[1], श्रेष्ठ जयाचें चरित्र कर्तृत्वें[2] ॥ १६२ ॥

अवघें वय बारावें पण बैसे ध्यान धरुनि शिवबाळ ।
घे नियमें देवाचें दर्शन कांपे तया अशिव[3] काळ ॥ १६३ ॥

धर्मार्थकाममोक्षज्ञानामृतभृतकथाश्रवणकाम[4] ।
ऐके कथेंत तो हरिदासमुखें जाय कां वना राम ॥ १६४ ॥

सस्त्रीक[5] दाशरथिचा[6] श्रवतां वनवासहेतु[7] युवराया ।
आला गहिवर, त्याचे करिती नयनाश्रुबिंदु उतराया ॥ १६५ ॥

लंकाधीशें[8] कपटें हरिली श्रीरामवल्लभा[9] सीता ।
श्रवतांचि हें कंठे[10] तो, इतरांपरि होय मुखें न वासीतां[11] ॥ १६६ ॥

---

असल्यामुळें सर्वांना विशेषतः राजकारणपटूंना या ग्रंथापासून स्फूर्ती मिळते. भागवत हा भक्तिमार्गांतील एक प्रमाण ग्रंथ आहे. ह्यांत भगवंताच्या लीलेचें वर्णन असून निर्मत्सर अशा सत्पुरुषांचा अत्युत्कृष्ट धर्म सांगितला आहे. त्यावरून कल्याणकारक व तापत्रयाचें निर्मूलन करणारी सत्यवस्तु कोणती याचें ज्ञान होतें. १४ दुप्पट. १५ आपुल्या कर्तव्याच्या ठायीं.

१ ग्रंथांच्या श्रवणानें म्हणजे ऐकण्यानें किंवा अभ्यासानें. २ कार्य पार पाडण्याची लायकी, पराक्रमशक्ति यामुळें. ३ अशुभ. ४ धर्म, अर्थ, काम, मोक्ष, ह्या चार पुरुषार्थांविषयींचें जें ज्ञान तेंच अमृत यानें भरलेली ( भृत ) जी कथा ती ऐकण्याची ज्याची इच्छा (काम) असा. ५ बायकोसह. ६ रामाचा. ७ वनवासाचें कारण. ८ लंका ही रावणाची राजधानी तिचा अधीश म्हणजे राजा त्यानें; रावणानें. यास दहा शिरें होतीं. यानें उग्र तप करून ब्रह्मदेव व शंकर यांपासून अनेक वर मिळविले. त्याचप्रमाणें यास नलकुबेर इत्यादिकांचे शापहि पुष्कळ होते. यानें कुबेरापासून लंका व पुष्पक विमान मिळविलें होतें. त्रैलोक्यांतील अनेक देव व राजे यांचा यानें पराभव करून देवांना बंदिवासांत टाकलें. भिक्षु वेष घेऊन यानें, श्रीरामचंद्र वनवासांत असतां सीतेचें हरण केलें म्हणून श्रीरामचंद्रानें याचा वध केला. हिंदुस्थानाच्या दक्षि-

अनय[1] श्रवण न करवे साध्वीच्छल तेंवि शुद्ध राजन्यां[2] ।
वेदस्खलन[3] सुविप्रा अथवा कपटोक्ति सत्परा[4] जन्यां[5] ॥ १६७ ॥

परिसुनि कथा रणाच्या स्फुरण चढे बालराजबाहूंतें ।
क्षत्रियतेज प्रवहे[6], बुधजन म्हणती असें प्रवाहू[7] तें ॥ १६८ ॥

शस्त्रास्त्रशास्त्र शिकवुनि पढवि धनुर्वेद[8] राय तनयाला ।
झाला शरसंधानीं[9] निपुण विजयसाचि[10] हा; मद न याला ॥ १६९ ॥

शरचापढालभालाबरचीखड्गादि आयुधें सारीं ।
नत[11] त्या पुढती जेंवी जिष्णुपुढें[12] ज्या सहाय कंसारी[13] ॥ १७० ॥

---

णेस असलेलें सिलोन बेट ही लंका असावी असें म्हणतात. ९ रामचंद्राची बायको सीता. ही सीरध्वज जनकराजाची पाळलेली कन्या. पातिव्रत्याचा आदर्श; जनकराजास जमीन नांगरतांना ही भूमींत सांपडली. शंकरधनुष्य हिच्या स्वयंवरकालीं पणास लाविलें, तें भंगून रामानीं हिला जिंकिली. राम नको म्हणत असतां ही त्यांचेबरोबर वनवासांत गेली. मारीच राक्षसानें सुवर्णमृगाचें रूप धारण केलें तेव्हां ‘ याच्या कातड्याची चोळी मला पाहिजे ’ म्हणून इच्छा दर्शविल्यावरून राम त्याच्यामागें गेले. तेव्हां रावणानें भिक्षुवेषानें येऊन हिला उचलून लंकेंत नेलें. म्हणून रामानीं लंकेवर स्वारी करून रावणास ठार केलें. रावणास मारल्यावर सीता परगृहीं राहिली असल्यामुळें राम हिला स्वीकारीनात; तेव्हां अग्नींत उडी घालून ही सुरक्षीत बाहेर पडली व आपलें पावित्र्य तिनें सिद्ध केलें. १० संतापे. ११ तोंड पसरून पहाणारा.

१ अनीति. २ क्षत्रियाला. ३ वेद म्हणतांना केलेली चुकी. ४ सत्यनिष्ठ. ५ मनुष्याला. ६ वाहतें. ७ वाहो. ८ धनुष्यविद्या. हिच्या श्रेष्ठत्वामुळें हिला पांचवा वेद असें मानिलें आहे. ९ धनुष्याला बाण लावून नेम धरण्यांत. १० अर्जुनासारखाच. ११ नम्र. १२ अर्जुनापुढें. अर्जुनाला दहा नावें होतीं:—

अर्जुनः फाल्गुनो जिष्णुः किरीटी श्वेतवाहनः ।
बीभत्सुर्विजयः कृष्णः सव्यसाची धनंजयः ॥

अशीं नावें पडण्याचीं कारणें अर्जुनानें वैराटीस सांगितलीं तीं अशीं:-(१) साऱ्या पृथ्वींत माझ्यासारखा वर्ण कोठेंही सांपडणार नाहीं आणि माझें कर्मही शुक्ल असतें म्हणून मला अर्जुन ( शुक्ल ) म्हणत असतात. ( २ ) हिमाचलाच्या पृष्ठभागीं, उत्तरा आणि फाल्गुनि हीं नक्षत्रें असतां दिवसा मीं जन्मधारण केलें म्हणून मी फाल्गुन या नांवानें प्रसिद्ध झालों. ( ३ ) माझ्यापर्यंत येण्याचें कोणाचें धैर्य होत नाहीं, व माझ्यावर कोणाची चाल करून येण्याची शक्तिहि नाहीं, व माझ्या अंगीं दमन करण्याचा गुण आहे, व मी पाकशासनि ( इंद्रपुत्र ) आहे, यास्तव देवादिकांत व मनुष्यांत माझें नांव जिष्णु हें प्रसिद्ध झालें आहे. ( ४ ) पूर्वीं मी महापराक्रमी राक्षसांशीं युद्ध करीत असतां इंद्रानें माझ्या मस्तकावर सूर्यकांतीप्रमाणें चकाकणारा किरीट ठेविला म्हणून मला किरीटी म्हणत असतात. ( ५ ) युद्धप्रसंगीं माझ्या रथास सुवर्णालंकारविभूषित शुभ्र अश्व जुंपिले असतात, म्हणून मी श्वेतवाहन या नांवानें प्रसिद्ध आहें. (६) मी युद्ध करीत असतां बीभत्स कर्म कधींहि करीत नसतों यास्तव देव आणि मनुष्य यांत मी बीभत्सु ( कल्याणेच्छु ) या नांवानें प्रसिद्ध झालों आहें. ( ७ ) युद्धांत जे अजिंक्य असे गाजलेले आहेत, त्यांच्याशीं मी सामना करितों आणि त्यांचा पराजय केल्याशिवाय मी युद्धांतून कधीं परत येत नाही म्हणून माझें नांव विजय पडलें आहे. ( ८ ) माझे दोन्ही पटु हस्त गांडीव नामक धनुष्याची प्रत्यंचा आकर्षण करण्यांत गुंतलेले असतात यामुळें माझें नांव सव्यसाची पडलें आहे. ( ९ ) मी सर्व देश पादाक्रांत करून तेथलें केवळ द्रव्यच आणून त्याच्या मध्यभागीं उभा राहतों यास्तव माझें नांव धनंजय पडलें आहे. ( १० ) माझी कृष्ण व उज्ज्वल कांति असल्यामुळें व मी लहानपणीं अत्यंत गोजिरवाणा होतों यामुळें माझें नांव पित्यानें मोठ्या आवडीनें कृष्ण ( चित्ताकर्षक ) असें ठेविलें. १३ कंसाचा शत्रु ( श्रीकृष्ण ). कंस हा उग्रसेनाचा मुलगा व देवकीचा चुलत भाऊ. हा कालनेमी असुराच्या अंशानें जन्मास आला होता. वसुदेव देवकीच्या विवाहांत हा मोठ्या समारंभानें त्यांचा रथ हांकीत असतां " देवकीचा आठवा गर्भ तुझा नाश करील " अशी आकाशवाणी झाली; ती ऐकून हा देवकीस मारण्यास प्रवृत्त झाला पण वसुदेवानें देवकीचे पुत्र देण्याचें अभिवचन देऊन त्यास भगिनीवधापासून परावृत्त केलें. देवकीचे पहिले सहा पुत्र कंसानें ठार मारिले. नंतर बलराम तिच्या गर्भांत आला तो तेथून रोहिणीच्या गर्भांत गेला म्हणून वाचला. नंतर भगवान् श्रीकृष्ण स्वतः तिच्या पोटीं पुत्ररूपानें आले. याला

बैसुनियां वाजीवरि दौडत दौडत सलील तो बाणें ।
छेदी लक्ष्य[1], तन्मनीं शस्त्रास्त्ररहस्यें[2] सर्वथा बाणे ॥ १७१ ॥

पशुवशीकरण[3]विद्या शिकुनी तल्लक्षणें[4] शुभाशुभ जीं ।
पढिजेलीं **शि**वबाळें सुयशें संतुष्ट होय तद्गुरुजी ॥ १७२ ॥

बारा न पुरें वय तों लीलामात्रें करी[5] वशेंग हस्ती ।
काय हयांचा केवा[6] ? दौडुनि त्यांही जरी करिति मस्ती ॥ १७३ ॥

ज्या ज्या भाषा प्रचला त्या त्या बहु हा सुबुद्ध जाणतसे ।
बोले; बोलति लिहिति न भाषा[7]कोविद, म्हणे सुजाण[8], तसे ॥१७४॥

क्षत्रियकर्मक्षमगुण[9]मंडितनिजतनयसूर्यतेजानें ।
रिपुघूक अंध होतिल गणिलें हें दूरदर्शि**रा**जानें ॥ १७५ ॥

---

जन्मल्याबरोबर वसुदेवानें कंसाच्या भीतीनें मथुरेंतून गोकुळांत नंदाच्या घरीं नेऊन ठेविलें. तेथें तो वाढत असतां त्याला मारण्यासाठीं कंसानें अनेक राक्षस पाठविले त्या सर्वांना श्रीकृष्णानीं मारून टाकिले. सरतेशेवटीं कृष्णाला मथुरेस घेऊन येण्यासाठीं कंसानें अक्रूरास पाठविलें. मथुरेस आल्यावर कृष्णाचें व कंसाचें द्वंद्वयुद्ध झालें त्यांत कंसाला कृष्णानें ठार केलें.

१ नेम धरलेली वस्तु. २ शस्त्रास्त्रविद्येचें हृदय किंवा इंगित. ३ पशूंना वश करून घेण्याची विद्या. ४ तत् ( पशूंचीं ) लक्षणें. ५ वठणीस, ताब्यांत आणी. ६ पर्वा; महत्व. ७ भाषेंत प्रवीण असलेले. ८ जाणता, शाहणा. ९ क्षत्रियाचें कर्म करण्यास योग्य ( क्षम ) अशा गुणानीं युक्त ( मंडित ) असा जो आपला मुलगा तोच सूर्य त्याच्या तेजानें.

क्षतात्किल त्रायत इत्युदग्रः ।
क्षत्रस्य शब्दो भुवनेषु रूढः ॥

म्हणजे संकटापासून रक्षण करतो तो क्षत्र ( क्षत्रिय ) अशा अर्थानें हा शब्द लोकांमध्यें रूढ झालेला आहे.

इतुक्यांत ये **गि**[1]रीश स्वप्नीं त्याच्या सु[2]मंत्र सांगाया ।
कीं "पाठवी **पु**ण्यासी राज्य कराया तुझ्या सुता गा ! या ॥ १७६ ॥

"अल्पवयाचा **शि**वबा तरि आतां शक्त शत्रु झोडाया ।
"राज्याधिकार सूत्रें चालवुनी सुयशकीर्ति जोडाया" ॥ १७७ ॥

पाठवि **राय पु**ण्यां[3]सी **शि**वबाळा वर्ष ज्यासि बारावें ।
झाली मति **शि**वबासी यत्न करुनि **हिंदुराष्ट्र** तारावें. ॥ १७८ ॥

---

शौर्यं तेजो धृतिर्दाक्ष्यं युद्धे चाप्यपलायनम् ।
दानमीश्वरभावश्च क्षात्रं कर्म स्वभावजम् ॥

म्हणजे शौर्य, तेजस्विता, धैर्य, दक्षता, युद्धांतून पलायन न करणें, दातृत्व आणि प्रजेवर सत्ता चालविणें, हें क्षत्रियांचें स्वभावजन्य कर्म होय. १० रिपु हेच घुबड ( घूक ). घुबडपक्ष्याच्या दृष्टीला सूर्याचे किरण सहन होत नाहींत म्हणून तो दिवसास लपून बसतो व रात्रीचा फिरत असतो.

१ शंकर. २ योग्य आदेश, उपदेश. ३ पुण्याला. पुणे शहर मुळामुठानदीच्या कांठीं आहे. पुणे व सुपें हे परगणे अदिलशहाकडून शहाजीराजास जहागिरी दाखल मिळाले होते.

# अध्याय दुसरा

## गर्भावस्थाप्रसंग

( गीति वृत्त )

**मों**गलरिपुनें उडविलि खळबळ बहुतर **नि**जामराज्यांत ।
तधिं जन्म **शि**वाजीचें; पुरुष खरा क्षोणिपाल विख्यात ॥ १ ॥

---

१ तैमूरलंगाचा एक वंशज बाबर हा काबुलावर राज्य करीत होता. यानें हिंदुस्थानावर स्वारी करून दिल्ली, आग्रा हे प्रांत काबीज करून तो दिल्लीच्या तक्तावर बसला. हा व याचे मागून दिल्लीच्या तक्तावर जे जे बसले ते सर्व इतिहासांत मोंगलबादशाहा म्हणून प्रसिद्ध आहेत.

सोळाव्या शतकाच्या उत्तरार्धापासून दक्षिणेंतील स्वतंत्र असलेलीं, अहमदनगरची निजामशाही, विजापुरची आदिलशाही वगैरे मुसलमानी राज्यें आपले राज्याला जोडण्याचा दिल्ली येथील मोंगलबादशहाचा हेतु होता. मोंगलबादशहा शहाजहान याचे कारकिर्दींत तो विशेष बळावला. आणि म्हणून, ह्या वेळीं म्हणजे सतरावे शतकाचे आरंभीं दक्षिणेंतील हीं स्वतंत्र मुसलमानी राज्यें व दिल्लीचे मोंगलबादशाहा यांचे मधील शत्रुत्व जसें जसें वाढत चाललें तसें तसें ह्या दक्षिणेंतील राज्यांनीं मोंगलबादशाहाचे विरुद्ध संगनमत करून आपली संघशक्ति वाढविली. व प्रसंगविशेषीं तीं एकमेकांस मोंगलांबरोबर लढतांना साह्य करीत असत. प्रस्तुतकालीं निजामशाही बुडवून तें राज्य आपल्या राज्यास जोडण्यासाठीं मोंगलांनी तिचेवर स्वारी केली होती. २ दक्षिणेमध्यें चवदावे शतकांत बहामणी नांवाचें जें मुसलमानी राज्य प्रस्थापित झालें होतें तें सोळावे शतकाचे आरंभीं नाश पावून त्या राज्याचे निरनिराळे सुभेदार स्वतंत्र झाले व त्यांनीं स्वतंत्र पांच राज्यें निर्माण केलीं. त्यांपैकीं अहमदनगरची निजामशाही ही एक होय. त्याचप्रमाणें विजापुरची आदिलशाही, गोवळकोंडची कुतुबशाही, बेदरची बरीदशाही आणि वऱ्हाडची इमादशाही हीं दुसरीं चार राज्यें होत. यापैकीं शेवटलीं दोन राज्यें लवकरच मोडून पहिल्या तिहींत सामील झालीं.

मज वाटे जन्मकथा **शि**वरायाची तुम्हांसि सांगावी ।
धन्य **जि**जाई माता; एक तियेचीच धन्यता गावी ॥ २ ॥

तज्जन्मापूर्वींची धृतगर्भाजननिची कथा आणी ।
नयनांतुनि सकळांच्या पाणी खळखळ, तयांसि तें न्हाणी ॥ ३ ॥

परि वीरवधू ती हो ढळली ना, **द्रौ**पदीसमा गमली ।
पतिसुखदु:खविभागी होउनियां पतिसमेत ती रमली ॥ ४ ॥

प्रभुहितदक्ष पति तिचा त्यासि **शा**हाजीसि जाहले कष्ट ।
झटतां **नि**जामशाहीसाठीं तधिं कीं न व्हावि ती नष्ट ॥ ५ ॥

---

१ तत् ( त्याच्या=शिवाजीच्या ) जन्माच्या आधींची. २ गरोदर अशा मातेची (जिजाईची.) ३ कचरली; कर्तव्यापासून दूर झाली. ४ द्रौपदीसारखी. ही द्रुपदराजाची कन्या, पांडवांची स्त्री. ही परम पतिव्रता, सद्गुणी व मानी होती. पांडव वनवासांत गेले त्या वेळीं हीसुद्धां त्यांचेबरोबर वनवासांत गेली होती. पांडवांच्या अज्ञातवासांत ही सैरंध्री नांवानें विराटराजाच्या बायकोची (सुदेष्णेची) दासी झाली होती. वनवासांत व अज्ञातवासांत हिनें पतिबरोबर अनेक संकटें भोगिलीं. पांच पवित्र व पतिव्रता कुलवधूंपैकीं ही एक होय.

अहल्या द्रौपदी सीता तारा मंदोदरी तथा ।
पंचकन्याः स्मरेन्नित्यं महापातकनाशिनीः ॥

नित्य यांचें मनापासून स्मरण केलें असतां महापातकांचा नाश होतो. ५ राहिली. ६ दगदग. शहाजीराजांचे वडील मालोजीराजे हे निवर्तल्यानंतर त्यांची दौलत व मनसब निजामशहानें शहाजीराजे यांस दिली. शहाजीराजे यांच्या लग्नाचे वेळीं ही मनसब मालोजीराजे यांस निजामानें दिली होती. ( पान १२ टीप ५ पहा ). शहाजीराजांकडे मनसबी आली त्या वेळीं मोंगलांचे हल्ले निजामशाहीवर सुरू होते, त्या प्रसंगीं शहाजीराजे यांनीं निजामातर्फे लढून आपल्या अंगाच्या शौर्यवीर्यादिगुणांचें चांगलें निदर्शन केलें व मोंगलशत्रूंस पुरेपुरे करून सोडिलें. ह्या मर्दुमकीस्तव त्यांची निजामशाही दरबारांत मोठी वाहवा झाली. शहाजीराजे हे निजामशाहींत लहानाचे मोठे झाले व वैभवास चढण्यासही हीच शाही

बालक अल्पवयाचा मणितक्तावरि[1] **नि**जामशाहीच्या ।
पाहुनि **मों**गल उठले नाशातें संधि साधुनी तीच्या ॥ ६ ॥

त्या **शा**हीचीं सूत्रें **रा**यें तद्रक्षणार्थ चालविलीं ।
**शा**[2]हीगादी आधीं तेणें तधिं **मा**हुलीस[3] हालविली ॥ ७ ॥

केले हताश **मों**गल **रा**यें, त्यांचें न लेशही चाले ।
बुडवाया ती **शा**ही जरि त्यांहीं घातले कहरि[4] घाले ॥ ८ ॥

**दि**ल्लींद्रलोचनीं तधिं खुपले हो **रा**य वाळुकाकणसे ।
तत्कर[5] गमले **शा**हीमंजूषेचे[6] पिनद्ध[7]-झांकणसे ॥ ९ ॥

**मों**गलसैन्यें विपुलें वेढियला सपदि[8] **मा**हुली-किल्ला ।
धैर्य न त्यां तो ध्याया वीरांपरि भिडुनि चढवुनी हल्ला ॥ १० ॥

---

आपणास कारणीभूत झाली असें त्यास वाटत असे. यामुळें नेहमीं ते प्रामाणिकपणानें व स्वामिनिष्ठतेनें निजामशहाशीं वागून त्या शाहीचें कल्याण व्हावें म्हणून झटत असत. निजामशाहीवर कोणतेंही संकट आलें तर तें आपल्यावरच आलें असें त्यांस वाटत असे. अशा बुद्धिनें वागत असतां निजामशाही बुडविण्याकरितां मोंगलांनीं निकराचे हल्ले सुरू केले तेव्हां हा प्रसंग निभावून नेण्यासाठीं रात्रंदिवस शहाजीराजे झटत होते व त्यामुळें त्यांना अतिशयित कष्ट झाले होते.

१ रत्नखचित तक्तावर. २ निजामशाहीची गादी. ३ हा किल्ला ठाणें जिल्ह्यांतील कल्याणाजवळ कासर घांटांत आहे. मलिकंबराचे पश्चात जेव्हां मोंगलांचे विरुद्ध निजामाची बाजू शहाजीराजानें पत्करली व ज्या वेळीं मोंगल दौलताबादेवर चालून आले त्या वेळीं शहाजीनें निजामास व त्याचे आईस दौलताबादेहून आणून ह्या किल्ल्यांत ठेविलें. निजामशाहीची मूळ गादी अहमदनगर येथें होती. हें शहर ज्या वेळीं मोंगलांनीं घेतलें त्या वेळीं तेथील गादी मलिकंबर यानें दौलताबादेस हालविली होती. ४ हाहाःकार उडवून देणारे. ५ तत् ( त्याचे=शहाजीचे )+कर ( हात ). ६ शाही ( निजामशाही )+मंजूषा ( पेटी )=निजामशाही हीच पेटी तिचे. ७ घट्ट बसविलेले. ८ एकाएकीं; तात्काळ.

अंतर्वत्नी[1] पत्नी किल्यामाजीच तैं **श**हाजीची ।
अडकुन पडली व्यसनीं[2]; सकलां चिंता पडे बहुत तीची ॥ ११ ॥

तुंबळ युद्ध जहालें पडलें मेलें प्रभूत[3] रिपुकंटक[4] ।
जिंकाया किल्ला तें न शके; खचले मनांत ते भटक[5] ॥ १२ ॥

यश न दिसे रिपुला, जरि तद्बल[6] सोत्साह मास साँ[7] लढलें ।
भेदोपाय[8] रिपुमना सुचला, करण्यांत भेद तें गढलें ॥ १३ ॥

फितलि **नि**जामशहाची माय प्रत्यक्ष काय सांगावें !! ।
होय दगा फितुरीनें फितुरां घालोनि फांस टांगावें ॥ १४ ॥

कळतां फितुरि धन्याची तापें चित्तांत पोळला **रा**य ।
काय करावें न सुचे त्या तधिं त्या संकटीं हितोपाय ॥ १५ ॥

पेटवि धनी स्वयें गृह अन्यें तेथें कशास रागावें ? ।
जावें सोडुनि गृह तें सुटलों म्हणुनीच ईश्वरा गावें ॥ १६ ॥

वाटे **रा**या जावें परि तें **शा**हीस[9] सांवरायातें ।
यत्नांतरं[10] करुनि, प्रभुनिष्ठ प्रभुहित झटे करायातें ॥ १७ ॥

बालक **श**हा प्रबल तज्जननी अबला अशी स्थिती झाली ।
त्या **शा**हींत, न उरला **रा**याविण अन्य कोणि तद्वाली ॥ १८ ॥

कळवुनि **नि**जामजननिसि तेंवि **नि**जामासिही स्वयें **रा**य ।
कृत-संकल्प[11] स्वमनीं धरुनी तो **मा**हुली त्यजुनि[12] जाय ॥ १९ ॥

---

१ गरोदर. २ संकटांत ( मोंगलांनीं दिलेल्या वेढयांत ). ३ पुष्कळ. ४ शत्रूचें सैन्य. ५ क्षुद्रयोद्धे. ६ तत् ( त्यांचें=मोंगलरिपुचें )+बल ( सैन्य ). ७ सहा. ८ शत्रूला वश करण्याचे साम, दाम, दंड आणि भेद असे चार उपाय आहेत. त्यांतील हा एक. ९ निजामशाहीस. १० दुसरे प्रयत्न. ११ कृत–निश्चय. निजाम-

जातां रायें केलें रिपुतें बाजुस झुकांडि देवोनी ।
फोडुनि रिपुफळि मग तो गेला निजपुत्रदार घेवोनी ॥ २० ॥

तत्समयीं रायानें जातां भरधांव फेंकिला घोडा ।
उसळे तों कोलाहल[1] रिपुकटकामाजि, तो नसे थोडा ॥ २१ ॥

रिपुजन झाले चकित क्षुब्धहि त्यां पाहुनी निसटतांना ।
कां न तसे होती ते मळलें मुख दिवसरात्र झटतांना ॥ २२ ॥

"रोधों[2], धरा धरा त्या" यवनचमूपति[3] वदे स्वसेनेला ।
रायें विलया रिपुमद, गजमद हरि ने जसा, तसा नेला ॥ २३ ॥

रोधाया रायातें रिपुजन धांवे जैवें[4] तया मागें ।
रिपुरुद्ध[5] राय असता तरि जरि अविरुद्ध[6] सिंह यामागें ! ॥ २४ ॥

संभाजी शिवबाचा अग्रज[7] तधिं तीन चार वरसाचा ।
कौतुक काय वदावें निजपितृसम तोहि धीरवर साचा ॥ २५ ॥

मातेचे उदरीं तैं शिवबा अवघाचि आठ मार्सांचा[8] ।
प्रभविष्णु[9] विष्णुचा तो अंश जरी होय पिंड मांसांचा[10] ॥ २६ ॥

राय पुढें, सुत मध्यें, मागें सुकुमार-गर्भिणी-कांता ।
दौड करिति बसुनि हयीं; कांता परि होय घडिघडीं श्रांती[11] ॥ २७ ॥

भरधांव दौड करुनी वेगें जातां न फार दूरवर ।
उदरीं गर्भवतीच्या उठल्या बहु वेदना सुतीव्रतर[12] ॥ २८ ॥

---

शाही पुन्हा स्थापण्यासाठीं जाऊन प्रयत्न करावयाचा हा केलेला ( कृत ) संकल्प, आर्या १७ पहा. १२. सोडुनी.

१ गोंगाट. २ अडवा. ३ यवन (दिल्लीपति) सेनानायक. ४ वेगानें. ५ रिपुकडून अडविलेला. ६ मेढ्यांकडून ( अविकडून ) अडविलेला ( रुद्ध ). ७ वडील भाऊ.

जावेना बसवेना अशीं तिस ती धरातळीं पडली ।
गर्भवतीविण अन्या जाणों न शकेच जी व्यथा घडली ॥ २९ ॥

सुटतां एकांतुनि हो ! दुसऱ्या व्यसनांत[१] सांपडे **राय** ।
विष न तसें म्हणवि जसें सुज्ञाकरवीं प्रियाव्यसन[२] हाय ॥ ३० ॥

भार्यावस्था पाहुनि चिंतापाशांत **राय** पडला हो ! ।
केला विचार तेणें कैंवी साध्वीस होय सुख-लाहो[३] ॥ ३१ ॥

अभयस्थळीं प्रियेसी ठेवुनि जावें मनांत **राय** धरी ।
जाय म्हणुनि **शि**वनेरिस[४] तधिं, गड तो **श्री**निवासराव[५]-करीं ॥ ३२ ॥

**रा**वें[५] सखा **रा**याचा सत्यव्रत[६] सज्जनप्रवर[७] वीर ।
विश्वासयोग्य रक्षिल निजभार्येसी असा तया धीर ॥ ३३ ॥

**रा**वाश्रयासि तिजला ठेवुनि निश्चित त्या गडावरती ।
गेला **राय** तत्क्षणीं ठेवुनिही तदवनार्थ[८] दळें[९] वरती[१०] ॥ ३४ ॥

रिपु तोंचि थडकले हो किल्ल्याजवळी सतीस[१] पकडाया ।
यत्न करिति परि निष्फळ त्यां तों लागे अखंड रखडाया ॥ ३५ ॥

पकडाया स्फुरला तो कोण ? नसे अन्य, परि तिचा तात ।
दुष्टान्न सेवि जो तो, यद्यपि तातहि, करी स्वजन-घात ॥ ३६ ॥

**जा**धवराव **ल**खोजी तात[१२] तिचा **मों**गलांकित स्पष्ट ।
जामातृ[१३]-वैर-वन्ही त्यांत तयाचें ममत्व करि नष्ट ॥ ३७

---

८ महिन्याचा. ९ सामर्थ्यवान्. १० मासाचा, कण्याचा. ११ थकलेली. १२ अधिक तीव्र; दुःसह.

१ संकटांत. २ बायकोवरील संकट. ३ सुख-लाभ. ४ पान १७ टीप ३ पहा. ५ जुन्नर येथें स्वतंत्र होऊन बसलेला एक सरदार. ६ सत्यनिष्ठ, विश्वासू. ७ सज्जनांमध्यें श्रेष्ठ. ८ तत् ( तिच्या=जिजाईच्या )+अवनार्थ ( रक्षणासाठीं ). ९ सैन्य.

श्वशुर तसा जामाता असतां दोघे निजामदरबारीं ।
श्वशुराहुनि जामाता स्वगुणें उत्कर्ष पावला भारी ॥ ३८ ॥

तेज घटे निज म्हणुनी श्वशुर करी द्वेष जांवयाचाच ।
विधुंचा प्रकाश, रविशीं गांठी पडतांचि, जावयाचाच ॥ ३९ ॥

हृत्तापें लखुजीनें त्यजुनि निजामासि मोंगला वरिलें ।
जामातृ-सूड घ्याया रिपुपक्षें कर्म हें करीं धरिलें ॥ ४० ॥

सरसावला सतीचा तात गडावरि बळें घुसायास ।
तों वदति शिष्टजन त्या अजि ! घेतां हे कशास आयास ? ॥ ४१ ॥

जाधवकुलपुरुषोत्तम ! अजि ! तुमचा विश्वंगीत कुलमहिमा ।
स्तुत तुमचो कुलरीती कुलकीर्तिहि जी करी सुशुभ्र हिमा ॥ ४२ ॥

करितां करणि तुम्ही जी स्वकुलोचित ती किं काय तोलावी ।
पंकोद्धृत धेनु तिला पुनरपि पंकींच काय ढकलावी ? ॥ ४३ ॥

शुभ वांछिति हित करिती स्वापत्याचें सदा पहा बाप ।
विपरीतता परि दिसे तुमचे ठायींच कीं न हा शाप ? ॥ ४४ ॥

छळितां निज कन्येतें भोगावे लागले महाकष्ट ।
दक्षप्रजापतिसही. मानव किति ? हें धरा मनीं स्पष्ट ॥ ४५ ॥

---

१० आणखी. ११ जिजाईस. १२ बाप. १३ जांवयाबद्दलचें वैमनस्य हाच वन्ही म्हणजे अग्नी.

१ चंद्राचा. २ हृदयांतील संताप, जळफळाट यानें. ३ जगानें गाईलेला म्हणजे स्तुति केलेला. ४ स्तविलेली; प्रशंसिलेली. ५ अधिक पांढरा. कीर्ति, यश यांचा रंग पांढरा स्वच्छ असतो असा कविसंकेत आहे. तुमची कुलकीर्ति इतकी धवल आहे कीं तिच्यामुळें बर्फ अधिक पांढरें दिसतें. तात्पर्य तुमच्या कुलकीर्तिचा महिमा फार मोठा आहे. ६ बर्फाला. ७ चिखलांतून वर काढिलेली. ८ दक्षप्रजापति हा ब्रह्म-

युष्मत्कुलकीर्तिश्री[1] दुहिता तुमची सती महोदारा[2] ।
यवनांप्रति तिज नेतां न मराठ्याची किं ती सुता दारा ? ॥ ४६ ॥

कुलकीर्ति-अब्रु-हानी कवणाची हें कुकर्म आचरितां ।
पाहावें सुज्ञ तुम्ही, लागेलचि हा कलंक सच्चरिता[3] ॥ ४७ ॥

युष्मत्तनुजाधव[4] तो जाधवजी ! कांपवीच जो काळा ।
येथ नसे म्हणुनि तुम्ही काय तदपरोक्ष घालितां घाला ? ॥ ४८ ॥

---

देवाच्या दशपुत्रांपैकीं एक व श्रीशंकराचा सासरा. याची सती नांवाची कन्या शंकराला दिलेली होती. एकदां दक्षानें यज्ञ चालू केला असतां मोठमोठे ऋषी व देवगणही यज्ञासाठीं आले होते. दक्षप्रजापतीनें ज्यावेळीं सभामंडपांत प्रवेश केला त्या वेळीं इतरांप्रमाणें शंकर उठून उभा न राहतां ब्रह्मदेवाबरोबर आसनावरच बसून राहिला त्यामुळें दक्षानें संतप्त होऊन शंकराला देवयज्ञांत इतरदेवांबरोबर हविर्भाग मिळूं नये असा शाप दिला. पुढें दुसरे वेळीं यज्ञ आरंभिला असतां दक्षानें सर्व देवांना, ऋषींला निमंत्रण केलें परंतु शंकराला व त्याच्या बायकोला म्हणजे आपली मुलगी सती तिला निमंत्रण केलें नाहीं. या यज्ञाची वार्ता सतीला कळली तेव्हां त्या यज्ञाला जाण्याविषयीं नवऱ्याची संमति (परवानगी) ती मागूं लागली. प्रेम नसतांना निमंत्रणाशिवाय जाणें इष्ट नाहीं असें सांगून शंकरानें तिला परावृत्त करण्याचा प्रयत्न केला पण अखेर ती यज्ञामध्यें गेली, तेथें बापानें केलेला अपमान सहन न होऊन तिनें त्वेषानें आपले बापाची निर्भर्त्सना केली व समाधियोगानें अग्नि उत्पन्न करून स्वतःस त्या अग्नीनें दग्ध करून घेतलें. ही वार्ता शंकरास कळतांच अत्यंत संतप्त होऊन त्यानें आपली एक जटा भूमीवर आपटली तेव्हां त्या जटेपासून प्रचंड शरीराचा वीरभद्र नांवाचा एक उंच पुरुष उत्पन्न झाला त्यानें शंकराच्या गणांना बरोबर घेऊन दक्षाचा यज्ञ उध्वस्त केला. तेथील मुख्य ऋषींना शासन करून त्यानें यज्ञमंडपही जाळून टाकिला. शेवटीं यजमानरूप पशू जो दक्ष त्याचेबरोबर युद्ध करून वीरभद्रानें त्याच्या मस्तकाची दक्षिणाग्नींत आहुती दिली व तो वीरभद्र कैलासपर्वतावर निघून गेला.

१ युष्मत् (तुमच्या)+कुल+कीर्ति+श्री (शोभा). २ मोठी उदार. ३ चांगले चरित्रास. ४ युष्मत् (तुमच्या)+तनुजा (मुलगी)+धव (नवरा)=तुमच्या मुलीचा नवरा.

हें वैमनस्य तुमच्या कन्यापतिशीं किं कन्यकेपाशीं ।
निवडाचि निरपराधी कन्या कां घालितां व्यसनपाशीं[1] ? ॥ ४९ ॥

**मों**गलकरीं पडे जरि तुमची कन्या, न काय ती स्वांगा[2] ।
जाळील चिता रचुनी ? होय कुणाची विटंबना सांगा ? ॥ ५० ॥

या शुद्ध बुद्धिवादें[3] वळला गत-मोह-कोप[4] **जा**धवजी ।
द्रवला मनांत तनुजा-वात्सल्येंकरुनि **म्हा**ळसाधव[5] जी ! ॥ ५१ ॥

वात्सल्य[6] अपत्याचें द्रवी हो थोर थोर तातांतें ।
द्रवला **शु**क्राचार्यहि[7]; वरि तो कन्यार्थ आत्मघातातें ॥ ५२ ॥

---

१ व्यसनाचे पाशांत म्हणजे संकटांत. २ स्वतःच्या ( स्व )+शरीराला ( अंगा ) ३ युक्तिवादानें. ४ गत म्हणजे गेला आहे मोह म्हणजे भ्रम आणि कोप म्हणजे राग ज्याचा असा. ५ म्हाळसेचा नवरा ( धव )=जाधवराव. हिला गिरिजाबाई असेंही म्हणत असत. ६ अपत्यप्रेम. ७ हा दैत्यांचा गुरु होय. देव-दानवांच्या युद्धामध्यें मृतदानवांना आपल्या मंत्रसामर्थ्यानें हा जीवंत करीत असे. यामुळें सर्व देव जेरीस येऊन त्यांनीं देवगुरु बृहस्पतीचा मुलगा कच ह्याला ती विद्या प्राप्त करून घेण्याकरितां शुक्राचार्यांकडे पाठविलें. ह्याप्रमाणें कच शुक्राचार्याचे घरीं असतां दानवांनीं त्याचा कित्येक वेळां वध केला पण कचावर मोहित झालेली आपली मुलगी देवयानी हिच्या विनंतीवरून प्रत्येक वेळीं त्याला शुक्राचार्यांनीं जीवंत केलें. शुक्राचार्यांला कच पुन्हां जीवंत करतां येऊं नये म्हणून अखेर दानवांनीं त्याचें भस्म करून तें मद्यांतून शुक्राचार्यांस पिण्यास दिलें. पुन्हा मुलीचे आग्रहावरून शुक्राचार्यानें कचाला जीवन्त करून हाक मारिली तेव्हां त्यानें शुक्राचार्यांचे पोटांतून ओ दिली. तेव्हां दानवांचें हें कपट त्याचे ध्यानांत आलें. शुक्राचार्य मुलीस म्हणाले “ आतां कच तर तरलाच पण हा बाहेर येऊं लागला म्हणजे माझें मात्र प्राणोत्क्रमण होणार. ” देवयानीला हे दोघेही पाहिजे होते म्हणून तिनें कचाला तुम्ही विद्या शिकवा म्हणजे हा बाहेर आल्यावर तुम्हांला जीवंत करील आणि मला दोघांचाहि सहवास घडेल. या युक्तिवादानें

**जा**धवराव मग किती ? द्रवला तो हें न नवल वाटावें ।
परि नवल गुणी कन्या तिजवरचें प्रेम आधि आटावें ! ॥ ५३ ॥

रिपुपण गळलें, वळलें पितृपण, केवळ मनांत हें आतां ।
" निववावि केंवि कन्या ? धिक्कारिल ती मला पुढें जातां " ॥ ५४ ॥

नेति गडावर ते जन **जा**धवजीतें मुलीस भेटाया ।
अन्योन्यदृष्टिमात्रें[1] करि तनया-कोप-वन्हि पेटाया ॥ ५५ ॥

धन्य सुता-धर्म तिचा होता जागृत तरी तशा समयीं ।
केला प्रणिपात[2] तिनें ताता तो धर्म दे सुगति अनयीं[3] ॥ ५६ ॥

चढला बहु कोप तिचा ब्रह्मांडींही गमे न तो माय ।
जो दक्षसुता-हृदयीं[4] होता तो ऊन, होमितां काय ॥ ५७ ॥

साश्रु वदे ती क्रोधें उचित तुम्हां कीं मदीयें जरि घात ।
मज जन्मतांच नख कां न कुणाकरवींहि रोविलें ? तात ! ॥ ५८ ॥

लालन पालन पोषण केलें प्रेमें मदीय या हातें ।
सरसावति तेचि पुढें घात कराया मदीयें हा ! हा ! तें ॥ ५९ ॥

कां न तुम्ही धजलां हो असतां येथें मदीयें[5] पतिराय ।
गेले ते तों धरितां, भीरु[6]परि तुम्ही, अनाथ ही गाय ! ॥ ६० ॥

---

देवयानीनें आपले बापाचें मन वळविलें; व तिच्या आग्रहावरून आपल्या पोटांत असलेल्या कचाला शुक्राचार्यांनीं संजीवनी विद्या शिकविली. कचानेंही बाहेर आल्यावर गुरुदक्षणा म्हणून शुक्राचार्यांना जीवन्त केलें.

१ एकमेकांनीं एकमेकांस पाहतांक्षणींच. २ नमस्कार. ३ अडचणींच्या वेळीं, धर्मसंकटाच्या वेळीं. ४ दक्षप्रजापतीची मुलगी ( सती ) तिच्या अंतःकरणांत. पान ४३ टीप ८ पहा. ५ माझा. ६ भितऱ्याप्रमाणें.

**वेदस्मृ**तिशास्त्रमतें मी अर्धांगी[1] असेंचि **रा**याची ।
म्हणुनि तुम्ही आलां कां मति धरुनी मान मम चिरायाची ? ॥६१॥

मत्पतिजागीं ही मी सांपडल्यें तुमचिया करीं तात ! ।
वीर[2]वधू मी पण, मम तात तुम्ही पूज्य ! नावरा हात ॥ ६२ ॥

कोपानें सणसणली भूमितळीं पडलि तत्क्षणीं तनया ! ।
मूर्च्छा येउनि तिस, तों गहिंवरला तात, खाय निज मन या ॥ ६३ ॥

शीतजलाद्युपचारें[3] आणुनि संज्ञा[4] तियेसि तातानें ।
धरियेली पोटाशीं वात्सल्यें सांवरीत हातानें ॥ ६४ ॥

दाटुनि ये ताताचा कंठ तदा तो विषण्णचित्त[5] बसे ।
पुसुनी अश्रु मुलीचे निज शेल्यानें, वदे तियेसि असें ॥ ६५ ॥

'होणार तशी बुद्धी झाली मज तूं रडूं नको थांब ।
'अभय जिजे ! हें दिधलें छळिल तुला त्या करीन मी लांब ॥ ६६ ॥

'विधि फिरतां बुद्धि फिरे थोरां थोरांहि तो मुली ! भ्रमवी ।
'मानव किति त्या पुढती भ्रमवुनि देवांहि तो वृथा श्रमवी ॥ ६७ ॥

---

१ पतीच्या अर्ध्या अंगाची मालकीण; बायको. २ वीराची पत्नी. आपला बाप आपल्या पतीचा सूड उगवावा म्हणून आपल्याला पकडण्याकरितां गडावर चढून आला आहे हें जेव्हां तिनें पाहिलें, तेव्हां पती जवळ नसतां आपल्यावर आलेल्या घाल्यापासून वीरपत्नीनें आपण स्वतःच युद्ध करून आपलें संरक्षण करावें या वीरपत्नीधर्माला अनुसरून ती जाधवराबरोबर युद्ध करण्यास एकदम सिद्ध झाली. पण समोर असलेला इसम हा आपला प्रत्यक्ष पूज्य बापच आहे हें पाहून, सुताधर्माच्या विचारानेंही तिचें मन घेरलें गेलें. आणि 'तात ! हो ! तुम्ही आपले हात आतां आवरूं नका' असें बोलत आहे तोंच ती बेशुद्ध होऊन जमिनीवर निचेष्ट पडली. ३ थंड पाण्याचे वगैरे इलाज करून. ४ शुद्धीवर आणून. ५ विषण्ण म्हणजे खिन्न आहे ज्याचें चित्त असा.

'फिरतां विधि नल[1]भूपा घोर अरण्यीं फिरावया लागे ।
'होय मति श्रीरामा कनकमृगाला[2] धरावयाला गे ! ॥ ६८ ॥

'मोह उडाला माझा झालों मी स्वच्छबुद्धि मत्तनये !
'राहे त्वदाश्रयीं[3] मत्प्रेमा'[4] कामासि मूढचित्त न ये ॥ ६९ ॥

'वत्से ! प्राप्त तुला हा ताप वृथा मन्निमित्तें[5] घोरतर ।
'परि तुझिया सुविवेकाविण सांत्विल तुजसि कोण गे इतर ? ॥ ७० ॥

---

१ हा निषधदेशाचा राजा. अत्यंत सौंदर्यवान् अशा दमयंतीनें स्वयंवराचे वेळीं इंद्रादि देवांचाही अव्हेर करून नलाला वरिलें. हिला वरावयाची कलीची इच्छा सफळ न झाल्यामुळें कलीनें नलाचा छळ करण्याचे हेतूनें नलांचे देहांत प्रवेश केला. त्यानें आपल्या भावाबरोबर नलाच्या मनांत द्यूत खेळण्याची बुद्धी उत्पन्न करून त्या खेळांत नलाला हरविलें. द्यूतांत सर्व राज्य हरल्यामुळें वनवासाचे हाल व दुःख त्याला काढावे लागले. वनांत असतांना कलीनें त्याला आपल्या प्रियपत्नीला निजलेली ठेवून सोडून जावयास लाविलें. पुढें कर्कोटकनागानें दंश करून नलाला विद्रूप केलें. २ राम वनवासांत असतांना रामाच्या पर्णकुटींतून सीतेला पळवून नेण्याचा रावणानें बेत केला. तेव्हां रामाला सीतेपासून दूर नेण्याच्या हेतूनें रावणानें मारीच राक्षसाला कनकमृगाचें रूप देऊन पर्णकुटिकेजवळ जावयास सांगितलें. सीतेला हा मृग प्राप्त करून घेण्याची इच्छा झाली. हा मायामृग आहे हें जाणत असूनही सीतेच्या आग्रहावरून कनकमृगाला पकडण्याकरितां त्याचे मागोमाग बुद्धी फिरून राम धांवत गेला. रामाचा बाण मृगाला मर्मस्थानीं लागतांच हे सीते ! हे लक्ष्मणा ! अशा मरणसमयींच्या आवाजांत रामाप्रमाणें स्वर काढून तो कनकमृग मोठ्यानें ओरडला. हें ऐकून सीतेनें तिकडे धांवत जाण्यास लक्ष्मणास आज्ञा केली तेव्हां राम मरणें शक्य नाहीं, हें राक्षसांचें कांहीं कपट आहे असें वाटत असतांही सीतेच्या आग्रहावरून लक्ष्मणाला तिकडे जाण्याची बुद्धि झाली अशा अवस्थेंत रावणानें भिक्षुवेषानें ( भिक्षेच्या मिषानें ) येऊन सीतेला हरण करून नेली. ३ तुझ्याठिकाणीं. ४ माझें प्रेम. ५ माझ्यामुळें.

'राहो सर्व अतां, त्वां यावें स्वास्थ्यार्थ[1], ऐक, माहेरीं ।
'शंका धरी न कसली; वेळ कठिण ही असे, मनीं हेरी[2] ॥ ७१ ॥

'हूं' म्हण पोंचवितों तुज रक्षक देऊनि सिंधखेडांस[3] ।
'सुख तेथें येथ न तें, येथ तुझा दुःखसर्प घे डांस ॥ ७२ ॥

साध्वी पतिव्रता ती साश्रु वदे मंद मंद हो ! तात ! ।
पतिसेवाधर्मरता पतिकुशलें मात्र सुखित होतात ॥ ७३ ॥

आग्रह तात ! करुं नका माहेरा यावयासि मज तिकडे ।
माहेराहुनि बहुतर सुखद मला हेचि वाटताति कडे[4] ॥ ७४ ॥

ती मानिनी कशि वळे कीं तातें वैर मांडिलें पतिशीं ।
तें त्यजिलें न म्हणे तो; ती मानि घडे किं वैर तेंच तिशीं ॥ ७५ ॥

दृढ संकल्प मुलीचा शिवनेरीवर तिथे रहायाचा ।
पाहुनि, तिला न न्यावें झाला ऐसा विचार रावाचा ॥ ७६ ॥

तद्रक्षणार्थ जाधव ठेवी निजलोक अधिक भरतीला ।
घे मग निरोप तीचा, धन्या जन म्हणति देशभर तीला[5] ॥ ७७ ॥

देतां निरोप साध्वी विनवि तया भोजनार्थ पाय धुवा ।
भोजन करि आंशी[6] दे तिस तो, प्रतिजेवणार[7] अन्य दुवा[8] ॥ ७८ ॥

गेला तात परि गमे त्यासी दुहितेसिही हृदय छिन्न ।
हुरहुर लागलि दोघां त्यांचीं तीं मात्र कारणें भिन्न ॥ ७९ ॥

---

१ स्वस्थता मिळावी म्हणून. २ विचार करून पहा. ३ पान १० टीप ८ पहा.
४ डोंगराचे तुटलेले भाग; घांट; सुळके. ५ जिजाईला ६ आशीर्वाद.
७ प्रत्येक जेवणारा इसम. ८ धन्यवाद. दुवा देणें=अभीष्ट चिंतणें.

४

अस्तु[1]. मनाचा जाधव ऋजु[2]; मळवि तया खलाश्रयत्व[3] पण ।
कज्जल-आश्रय करितां सुंपट[4] कसा नासिना स्वशुभ्रपण ? ॥ ८० ॥

हें संकट टळलें जरि, चिंताज्वाला नसे तिची शमली ।
पतिसंकट-आर्त-सती ती जणुं हरिणी दवार्त[5]शी गमली ॥ ८१ ॥

आक्रमिले तेथ तिनें यापरि दिन आठ मास एक वर ।
झाला सिद्ध तदुदरीं अवताराया जनांत सर्वेश्वर[6] ॥ ८२ ॥

शुभसमयीं अवतरला रविकुलतिलक प्रतापवान् त्राता ।
गोब्राम्हणधर्माचा, आर्तजनांचा[7] दयाकुल भ्राता ॥ ८३ ॥

काळ खलांचा प्रकटे, प्रकटे तो भक्त साधुसंतांचा ।
बंधु खरा अबलांचा तेंवि तसा मित्र सुगुणवंतांचा ॥ ८४ ॥

ध्वनि उठले दुंदुभिचे, झाले वर्षाव चित्र[8] सुमनांचे[9] ।
तेंवि गजर टाळ्यांचे हर्षें उधळुनि गुलाल जन नाचे ॥ ८५ ॥

प्रभु[10] राम[11] अयोध्येसी[12], मथुरेसी[13] देव कृष्ण[14] कीं जेंवी ।
शिवनेरीसी[15] श्रीशिवराय करी धन्य जन्मुनी तेंवी ॥ ८६ ॥

---

१ असो. २ सरळ. ३ खल म्हणजे दुष्ट त्यांचें आश्रयत्व ( आश्रय धरून रहाणें ). ४ चांगलें वस्त्र, शुभ्र वस्त्र. ५ दव म्हणजे वणवा त्यानें पीडित झालेली तशी. ६ सर्वश्रेष्ठ, ईश्वर. ७ पीडित (आर्त) जनांचा. ८ नाना प्रकारच्या रंगांचीं. ९ फुलांचे. १० देव. ११ पान ३ टीप ९ पहा. १२ पान ७ टीप १२ पहा. १३ ही मोक्षदायक सप्तपुरीपैकीं एक. सप्तपुरींचीं नांवें अशीं:—

अयोध्या मथुरा माया काशी कांचिरवंतिका ।
पुरी द्वारवती चैव सप्तैता मोक्षदायिकाः ॥

मथुरेमध्यें श्रीकृष्णाचा जन्म झाला. ही पुरी संयुक्तप्रांतांत यमुनेच्या पश्चिम तीरावर आहे. येथें श्रीकृष्णानें पुष्कळ पराक्रम केले. येथें महा पापी व दुष्ट

हिंदुमहद्भाग्याचल[1]-उपरि अहा! दिव्य[2] हिंदुभूभानू[3]।
तेज:पुंज उगवला मंडल[4]मणि दीप्ति[5]मान् विभवसानू[6] ॥ ८७ ॥

---

कंस राजा राज्य करीत असतां त्यास कृष्णानें ठार केलें. पूर्वी रावणभगिनी कुंभिनसीचा पति मधुनामक राक्षस येथें तप करीत असल्यामुळें या प्रांतास मधुवन असें नांव पडलें. त्यानें मधुरा नांवाची नगरी स्थापिली. हिलाच पुढें मथुरा असें नांव पडलें. १४ पान ३ टीप १० पहा. १५ पान १७ टीप ३ पहा.

१ हिंदूंचें महत् ( मोठें ) भाग्य तद्रूपी जो अचल म्हणजे पर्वत त्यावर. २ अलौकिक. ३ हिंदुभू म्हणजे हिंदुस्थान त्यावरील सूर्य ( भानु ). ४ आकाशरत्न पक्षीं राजमंडलश्रेष्ठ. ५ अत्यंत शोभायमान. ६ वैभवाचा सूर्य ( सानु ).

क्र. 8590

# अध्याय तिसरा

## मुजराप्रकरण

( गीति वृत्त )

शिवनेरी[1] किल्ल्यावरि ठेवुनि पत्नी विजापुरा[2] गेला ।
राय शहाजी, तेथें बादशहानें[3] तयाँ सुकृत केलें[4] ॥ १ ॥

बुडते निजामशाही खास तितें केंवि सांवरायाची ।
ही त्यासि एक चिंता अन्यत्र कुठेंहि मति न रायाँची[5] ॥ २ ॥

पडलें तैं तत्कर्णीं मर्मच्छि[6]दुष्टकर्म अधमाचें ।
क्रूर न तसें कुणाचें हृदय जसें मूर्तिजा-निजामाचें ॥ ३ ॥

देउनि दगा धरियले श्वशुर[7] तसे श्याल[8] दोन रायाचे ।
केले ठार निजामें; अधमच हें कर्म हो करायाचे ! ॥ ४ ॥

---

१ पान १७ टीप ३ पहा. २ पान २० टीप १७ पहा. ३ अदिलशहानें. ४ शहाजीचें स्वागत केलें. ५ शहाजीची. ६ हृदयाला भेदून टाकणारें दुष्ट कृत्य. ( पुढील आर्या पहा ). ७ सासरा ( जाधवराव ). ८ मेहुणा (बायकोचा भाऊ). जाधवराव हा प्रथम निजामशहाच्या पदरीं होता. मूर्तिजा निजामाचे मरणानंतर आपल्या लहान मुलांचा राज्यकारभार हांकण्याकरितां निजामाच्या राण्यांनीं शहाजीराजांना लायक म्हणून शोधून काढून वजीर केलें. वजीरीच्या कारकीर्दींत शहाजीराजे या बालबादशहांना मांडीवर घेऊन तक्तावर बसत असत. या वेळीं जाधवरावांना शहाजीसमोर येऊन कुर्निसात करावा लागे. जाधवरावाला हा कमीपणा असह्य होऊन तो मोंगल बादशहाचे पदरीं रहावयास गेला. कांहीं कालानें जाधवरावाला निजामशाहींत अनुकूल परिस्थिति आहे असें वाटल्यामुळें त्यानें पुन्हा निजामशहाकडे जाण्याचा बेत केला व त्याच्याशीं सलोख्याचें बोलणें लाविलें. तेव्हां निजामानें जाधवरावाला दौलताबादेचे किल्ल्यांत आपल्या भेटीस बोलाविलें आणि हा निजामशाहीला एकदां सोडून जाऊन मोंगलांच्या बाजूनें

सोडिलि मति पहिली[१] मग **रा**यें धरिली दुजी, न राहावें ।
अंकितसें कत्रणाचें. कैसें तें अधमकृत्य साहावें ? ॥ ५ ॥

ईश्वरसंकल्प बळी, मानवसंकल्प किति ? कसा तगतो ? ।
वरि कोण **नि**जामातें ? दुष्ट महा कपटि घातकी ठग तो ॥ ६ ॥

स्वातंत्र्य वृत्ति टिकली परि ती अत्यल्पकाळ **रा**याची ।
**मों**गलरिपुनें धरिली मति कीं **रा**यासि नें[२]त करायाची ॥ ७ ॥

अल्पावधींत झालें स्थित्यं[३]तर तधिं **नि**जामराज्यांत ।
तें **मों**गलें बुडविलें रण तेंवी फितुरिही करुनि त्यांत ॥ ८ ॥

बाळ**नि**जामा केलें बंदी मग जोडिलेंहि तद्राज्य ।
निज राज्या तं[४]द्रिपुनें लुटुनी गज रत्न हेमही प्राज्यं[५] ॥ ९ ॥

वळलि पुन्हा **रा**याची मति कीं स्थापावि ती[६] पुन्हा **शा**[७]ही ।
आँजन्म अन्नदाचें, करुनि असें, ऋण फिटेल आशा ही ॥ १० ॥

निजपर्क्षवर्तिबाल[८] स्थापुनि तत्तीं **नि**जामशाहीच्या ।
द्वाही फिरविलि **रा**यें, देश बळें जिंकिले स्वहेतीच्यां[९] ॥ ११ ॥

[१०]रिपुनें तधीं स्वसेना धाडिलि झोंबावयासि **रा**यासीं
शेतांत टोळधाडसि आली तन्नाश ती करायासी ॥ १२ ॥

---

आपल्या विरुद्ध लढावयास आला होता याविषयीं पोटांत दंश ठेवून निजामानें अखेर त्याला दगा दिला व खुनशीपणानें यावेळीं दौलताबादेस जाधवरावाला त्याच्या दोन मुलांसह ठार केलें.

१ आर्या २ पहा. २ नम्र. ३ परिस्थितींत बदल. ४ त्याच्या ( निजामाच्या ) शत्रूनें ( मोंगलानें ). ५ पुष्कळ. ६ निजामशाही. ७ जन्मापासूनच्या. ८ आपले पक्षांत राहणारा ( वर्ति ) मुलगा. ९ आपल्या तरवारीच्या. १० मोंगल बादशहानें; दिल्लीपतिनें.

समरीं यत्न करुनि बहु **राय** न फावे, करील तो काय ? ।
दुर्दैव **नि**जामाचें रिपुसंख्येहुनि बळी म्हणे **राय** ! ॥ १३ ॥

दैव न अनुकूल म्हणुनि सोडुनि **राय** स्वतंत्रतामतितें ।
अंकित **अ**दिलशहांचा[1] झाला; व्यसनीं वरी अशा गतितें ॥ १४ ॥

**रा**यानें आक्रमिलीं वर्षें सों[2] सात **अ**दिलशाहींत ।
विक्रमें[3] करूनि केले शत्रु तिचे मत्त तेधवां चीत ॥ १५ ॥

गमला **अ**दिलशहाला **रा**य जणों निज बहिश्चरँ[4] प्राण ।
कीं **रा**यें बहु केलें स्वासुत्रोणाहुनि[5] प्रभुत्राण ॥ १६ ॥

संतुष्ट[6] त्या **शा**हानें दिधलि जहागिर उदंड **रा**याला ।
ज्याच्या तेजानें रिपु **शा**हाचे लागले डरायाला ॥ १७ ॥

धन दौलत संपादुनि मेळविलें नांव रूप **रा**यानें ।
पूर्वाधिक हो तेथें देउनि शत्रूंसि चापरा यानें ॥ १८ ॥

**शि**वबाळ दहा बारा वरसाचा तेधवां पित्यासहित ।
होता; पण वाटेना **य**वनांचें साहचर्य त्यास हित ॥ १९ ॥

हें साहचर्य घडलें सतत तया दोन वर्ष सां[8] मास ।
**य**वनहृदय जाणाया आलें तें हो ! तयास कामास ॥ २० ॥

---

१ विजापूरच्या अदिलशहाबादशहाचा. २ सहा. ३ पराक्रम. ४ बाहेर वावरणारा. ५ स्व+असु (प्राण)+त्राण (रक्षण) त्याहून. ६ खूष. अदिलशहासाठीं राजांनीं लढून अक्कलकोट, बागलकोट वगैरे परगणे काबिज केले; कर्नाटक व द्रवीड ह्या प्रांतांचा नीट बंदोबस्त करून व व्यवस्था लावून राजांनीं तिकडची सगळी बेबंदशाई मोडून टाकिली व अदिलशहाचें तिकडील उत्पन्न बरेंच वाढवून तें त्याला नेमानें पावतें व्हावें अशी व्यवस्था केली यामुळें अदिलशहाचा राजांवर पूर्ण विश्वास बसून तो फार खुष झाला होता. ७ पुष्कळ. ८ सहा.

**य**वन[1]द्वेष तन्मनीं होता आधींच ठाणें[2] देउनियां ।
झाला तो दृढ आतां प्रत्यय घडिघडि तयासि येउनियां ॥ २१ ॥

गुणरूपशील भुलवी **शि**वबाचें हो ! अमीर-उमरावां[3] ।
गंधश्रीरंग कुणा पद्माचे भुलविना सुखविना वा ? ॥ २२ ॥

कीर्ति पसरली भारी **शा**हाजीच्या **शि**वाख्य[4]-तनयाची ।
झाली प्रिय सर्वांना नगरीं ती स्तोक[5]मूर्ति विनयाची ॥ २३ ॥

**अ**दिलशहाच्या कर्णीं पडली तत्कीर्ति जी सुधेहून ।
सुरस तया गमली तो वदला **रा**यासि तूर्ण[6] बाहून[7] ॥ २४ ॥

त्वत्पुत्रकीर्तिसत्कृति ऐकुनि वाटे तुझ्यापरिस तात ।
धन्य नसे अन्य कुणी; तद्गुण मच्छ्रवण हे परिसतात ॥ २५ ॥

पाहावें मज वाटे त्वत्पुत्रातें म्हणोनि आणावें ।
तद्दर्शनलाभ मला **श**शिर्दर्शनलाभ होय जाणावें ॥ २६ ॥

---

१ यवनांबद्दलचा तिरस्कार. बाळपणीं शिवाजीराजे आपल्या आई-बरोबर जेव्हां औरंगाबादचे बाजूस सुमारें २५ मैलांवर बायझापूर येथें रहात होते त्यावेळीं शहाजीराजे यांचा सूड घ्यावयाचा म्हणून जिजाबाईला यवनांनीं पकडून मोंगलांच्या छावणींत नेलें होतें; पण सुदैवानें तिचा चुलता मोंगलांचे छावणींत होता त्याच्या रदबदलीनें तिची सुटका होऊन आलेलें अरिष्ट कसेंबसें टळलें. यवनशत्रूंबरोबर शहाजीराजे हे लढत होतेच. तेव्हां शत्रु घाला घालून आपल्या प्रिय पुत्राचा व आपला केव्हां नाश करील याचा नेम नाहीं, असा जिजाबाईला एकसारखा घोर लागून राहिला होता ह्यामुळें ती आज ह्या किल्ल्यांत तर उद्यां त्या किल्ल्यांत अशी तिची पळापळ होत असे. या व अशा इतर गोष्टींचा परिणाम शिवाजीच्या मनावर होऊन शिवाजीच्या मनांत यवनांबद्दल तिटकारा उत्पन्न झालेला होता. २ घर करून. ३ अमीर=सरदार; उमराव=मानकरी; बडे लोक. ४ शिवनांवाच्या मुलाची. ५ स्तोक ( लहान ) मूर्ती. ६ लवकर. ७ बोलावून. ८ शशि ( चंद्र )च्या दर्शनाचा लाभ.

शाहाच्या भेटीला जावें घेउनि सुतासि दरबारीं ।
हा तात-बेत कळतां हृदयीं सुत होय खिन्नतर भारी ॥ २७ ॥

दरबार नव्हे गद[1] हा मानिजनां तो करीच निःसत्त्व ।
गद[1] पुरवला पण न हा तीक्ष्ण तयाचें असे नृशंसत्व[2] ॥ २८ ॥

हुरहुर लागुनि मोठी शिवबा पात्रे मनांत तापातें ।
आप्तमुखें हृद्गत तो कळवी साहसकरून बापातें ॥ २९ ॥

न्यावें न तात ! मजला दरबारा तो गमे मजसि पंक[3] ।
मी ये न एथ युष्मल्लंघनहेतु[4] न मदीय निःशंक ॥ ३० ॥

बलसंपदंध[5] दुर्मद[6] नीच स्वार्थी महा कपटि खोटे ।
गोधर्मवेदभूसुरनिंदक[7] हे यवन दुष्ट खल मोठे ॥ ३१ ॥

कलिशील[8] विश्रृंखळ[9] खळ निर्दय हे करिति नित्य गोवध हा[10] ! ।
व्यसुहि[11] न मग जीवंतचि सहन करी हिंदु हो ! कसा वध हा ? ॥३२॥

तत्कर्में ऐशीं कीं शिर त्यांचें, मज गमेच, छेदावें ।
मत्कर परि बांधाया तुमचें भय मात्र होतसे दावें ॥ ३३ ॥

स्नेह नको यवनांचा परिचय संसर्गही नको त्यांचा ।
संसर्गस्नेहादिक कवि टाळिति अहिपरीस[12] डसत्यांचा ॥ ३४ ॥

हृदयीं जळतों मी हो ! हें दुःख कृतांतरूप[13] मज वाटे ।
नेऊं नका तिथें मज, जाउं नये कोणि माझिया वाटे ॥ ३५ ॥

---

१ रोग. २ दुष्टपणा. ३ चिखल. ४ युष्मत् ( तुमच्या )+लंघन=उल्लंघन ( आज्ञेचें उल्लंघन हा )+हेतु ( उद्देश ). ५ बल+संपत्+अंध=बळ व संपत्ती त्यामुळें अंध झालेले असे. ६ मदोन्मत्त. ७ गाई, आर्यधर्म, वेद व ब्राह्मण (भूसुर) यांची निंदा करणारे. ८ भांडखोर. ९ उच्छृंखल. १० हाय ! ११ वि+असु= मेलेला. १२ सर्पाप्रमाणें. १३ काळाप्रमाणें.

पाहुनि यापरि चित्तीं **य**वनद्वेषा[१]तिरेक **शि**वबाच्या ।
आणिल संकट तो ही चिंता शिरली मनांत **शि**व-बा[२]च्या ॥ ३६ ॥

**रा**यें योजियलें मग बोधाचे शब्द चार सांगावे ।
**शि**वबाळा आप्तमुखें, किं हिता[३]हित तन्मनांत वागावें ॥ ३७ ॥

आप्तेष्टजनांकरवीं प्रथम **शि**वाजीस बोध करवीला ।
मातेकरवींही बहु पण न तयानें स्वभाव फिरवीला ॥ ३८ ॥

बाहुनि जवळि मुलाला करि मग **रा**य प्रयत्न वळवाया ।
वात्सल्यें तधि तेणें, जाऊं दिवलें न एक पळ वांया ॥ ३९ ॥

मद्वाग्ग्रहणीं[४] सादर[५] आजवरी त्वन्मनश्रवणकाय[६] ।
असतां **शि**वबा ! आतां करिती[८] मच्छ्रवण[७] हे श्रवण काय ? ॥ ४० ॥

सांप्रत सुटलें वाटे तुजसि पितापुत्र काय हें नातें ? ।
वा पावसि मोहा रे ! कीं उभयीं लेशही वसेना तें ? ॥ ४१ ॥

तव हित जें जें तें तें साधाया मी परोपरी झटतों ।
कां मग मदुदित[९] हित तूं अहित असें मानुनी करिसि हट तों ? ॥४२॥

तव मम हृद्गत सम परि बोलों न शके कदापि मी तें रे ! ।
आम्हां तदाश्रितांच्या वृत्तिस्थितिचें[१०] घडेल मातेरें ॥ ४३ ॥

पृथ्वीपती **य**वन हे प्रान्तेश्वर[११]वर असंख्य बलवान ।
जोर सदीचा त्यांचा न पडे संप्रति तयां किमपि वाण ॥ ४४ ॥

---

१ यवनांबद्दलचा अमर्याद द्वेष. २ शिव+बा (बाप)=शिवाजीच्या बापाच्या ३ हित+अहित=लाभ आणि हानि. ४ मत्+वाक्+ग्रहणीं=माझें वचन ऐकण्याच्य कामीं. ५ तत्पर, उत्सुक. ६ त्वत्+मन+श्रवण+काय=तुझें मन, कान आणि शरीर. ७ माझे कान. ८ ऐकिती. ९ मत्+उदित=मी सांगितलेलें. १० निर्वाहाचें

असतां जोर सदीचा हातीं घेतांचि होय मातीचें ।
सोनें; सोन्याची, तो नसतां, माती असें चल[१]न तीचें ! ॥ ४५ ॥

हिंदूंचें राज्यपद स्थिर बहु वर्षें असोनि कां पडलें ।
यवनकरीं ? शिवबा ! रे ! प्रभुवर[२]सूत्रेंच हें असे घडलें ! ॥ ४६ ॥

भाळीं राज्य तयांच्या, सेवा अमुच्या लिहीयली विधि[३]नें ।
दिसतें हें संप्रति, तें न फिरे कसल्याहि योजिल्या विधि[४]नें ॥ ४७ ॥

त्वज्जनि[५]समयीं लढलों यवनांशीं मी परी तधीं आले ।
प्रत्यय उदंड मजसी कीं संप्रति आमुचें तिळ न चाले ॥ ४८ ॥

करुनी स्वधर्मरक्षण सेवा त्यांची करावया वाळा ! ।
हरकत काय असे बा ! झालें हें प्राप्त आमुच्या भा[६]ळा ! ॥ ४९ ॥

हतदैवा[७]धीन अम्हां निज योगक्षेम चालवायाला ।
भाग असे तत्सेवा संप्रति हा ! लागतें लवायाला !! ॥ ५० ॥

निजतेज विपत्का[८]ळीं पांडुसुतां[९]नींहि आड[१०] ठेवोनी ।
योगक्षेम करियला की[११]चकभगिनीधवासि सेवोनी ॥ ५१ ॥

---

साधन ( वृत्ति ) दर्जा ( स्थिति ) यांचें. ११ प्राप्त+ईश्वर+वर=ईश्वराचा वर ज्यांना प्राप्त झाला असे; ईश्वराची ज्यांच्यावर मर्जी आहे असे.

१ वर्तन. २ प्रभुवर+सूत्रें=प्रभुश्रेष्ठ म्हणजे ईश्वर त्याच्या सूत्रानें म्हणजे नियमानें, योजनेनें. ३ दैवानें. ४ कर्मानें; मार्गानें. ५ त्वत्+जनि (जन्म)+समयीं= तुझ्या जन्माचे वेळीं. ६ कपाळाला, कपाळीं. ७ हत (नष्ट)+दैव=दुर्दैव त्याच्या अधीन म्हणजे ताब्यांत झालेले असे. ८ संकटाच्या वेळीं. ९ पंडुराजाचे मुलगे पांडव ( धर्म, अर्जुन, भीम, नकुळ आणि सहदेव ) यांनींही. द्यूतांत जो हरेल त्यानें १२ वर्षेंपर्यंत वनवास पत्करावा व नंतर १ वर्ष अज्ञातवासांत काढावें व या अज्ञातवासच्या अवधींत ओळखलें गेल्यास पुन्हा बारा वर्षें वनवास पत्करावा, असा पण लाऊन कौरवांनीं धर्मराजाला द्यूत खेळण्यास बसविलें व कपटानें धर्म-

कालानुरूप वर्तुनि वैभव धन यश जहागिरी-महि म्यां ।
जोडिलिं तीं रक्षावीं त्वां रे ! रक्षोनि आमुच्या महिम्यां[1] ॥ ५२ ॥

सेवा करावि त्याची मनुजांहीं खावि भाकरी ज्याची ।
**शा**हा स्वामी सांप्रत, संपादावी कृपा तुवां त्याची ॥ ५३ ॥

तातोक्ति शुद्धभावें काहूर उठे मनीं **शि**वाजीच्या ।
तें ऊन होय भेटीपूर्वीचें जें मनीं शहाजीच्या ॥ ५४ ॥

तधिं तातादर **य**वनद्वेष असे ओढिती तया[2] दोघे[3] ।
झाला आदर बळवान् शीलें[4]गुणें ओढुनी तया तो घे ॥ ५५ ॥

तेचि कुलीन करिति जे ताताचें वचन पुत्र ते धन्य ।
परि लंघिती[5] वचन तें पुत्र न ते मूर्त[6] पाप खल जन्य[7] ॥ ५६ ॥

---

राजाला द्यूतामध्यें हरवून त्यांनीं पांडवांना १२ वर्षेंपर्यंत वनवास भोगावयास लाविलें. यानंतरचें अज्ञातवासाचें वर्ष, आपलें तेज व राजचिन्हें हीं कोणाच्याही दृष्टोत्पत्तीस येऊं नयेत म्हणून त्यांनीं विराटाच्या घरीं नांवें व वेष पालटून हीन स्थितींत अत्यंत कष्टानें काढिलें. १० बाजूंस. ११ (मदोन्मत्त सेनापति जो) कीचक त्याच्या (सुदेष्णानांवाच्या) बहिणीचा पति (धव) जो विराटराजा त्यासी. मत्स्यदेशाचा राजा जो विराट त्याचा कीचक हा सेनापति. हा फार नीच होता. अज्ञातवासांत पांडव विराटाच्या घरीं असतां, त्या वेळीं द्रौपदीजवळ त्याणें अतिप्रसंग आणिला, म्हणून द्रौपदीनें विराटाजवळ तक्रार केली पण विराटराजानें ती तक्रार मनावर घेण्याचें नाकारलें. अखेर भीमाकडून तिणें कीचकाचा वध करविला.

१ मोठेपणास. २ शिवाजीला. ३ ताताबद्दलचा आदर आणि यवनांबद्दलचा द्वेष असे दोघे. ४ शुद्धाचरण हीच दोरी तिनें; शुद्धाचरणानें. ५ उल्लंघन करिती, मानीत नाहीं. ६ मूर्तिमंत. ७ मनुष्य.

द्रवलें मन **शि**वबाचें ऐकुनि तातोक्ति शुद्ध[1] सम सरळ[2] ।
खंबीर जरी होतें केलें[3] तन्मन तिनें तदा तरळ[3] ॥ ५७ ॥

सविनय हळूच बदला **शि**वबा तातासि अंजली करुनी ।
श्रुति[4]सम मज भवदाज्ञा[5] वंद्य. करावी मला क्षमा गुरुनीं[6] ॥ ५८ ॥

करिती **य**वनाधम हे सुरविप्रविटंबना, अहो ! तात ! ।
निंदाही धर्माची अमुच्या करुनी असंख्य गोघात ॥ ५९ ॥

जाळी मद्देहासी तापद हें प्रति[7]कुकर्म **य**वनांचें ।
सहन न करवे मज तें ज्वलन तयाहुनि सुसौम्य दहना[8]चें ॥ ६० ॥

विस्तर कशास ? पण यापरि तेणें दुःखहेतु कळवीला ।
सांत्वन करुनी तातें समजावुनि मग मुलासि वळवीला ॥ ६१ ॥

उत्साहें तातानें दरबारा न्यावया **शि**वाजीतें ।
सूतातें[9] कथियेलें स्वरथा जोडावयासि वाजीतें[10] ॥ ६२ ॥

आग्रह करोनि नेलें अश्वरथीं बैसवूनि रा[11]जानें ।
**शि**वबाळा दरबारा; दिपले सगळे तदीय[12] तेजानें ॥ ६३ ॥

मोहा पाडी **शि**वबा स्वगुणें तत्काळ **अ**दिलशाहातें ।
न तसा भृंगातेंही[13] सुरसगुणें[14] पद्म[15] पाडि मोहातें ॥ ६४ ॥

---

१ समतोलपणाची. २ सहज अंतःकरणापासून निघालेली. ३ लवावयास लाविलें; अस्थिर केलें ४. वेदाप्रमाणें. ५ तुमची आज्ञा. ६ वडिलांनीं. ७ प्रत्येक वाईट कर्म. ८ विस्तवाचें. ९ रथ हांकणाराला. १० घोड्यांना. ११ शहाजीराजानें. १२ त्याचे. ( शिवाजीचे ). १३ मधुपालासुद्धां; भुंग्यालासुद्धां. १४ उत्तम मधाच्या योगानें. १५ ( उत्तम प्रफुल्लित ) कमळ.

दरबारस्थळ सुरुचिर रचिलें सजिलें विशाळ कनकमय ।
रत्नमण्यांहीं जडिले स्तंभ, तयाचा गमेच जनक **म**य[1] ॥ ६५ ।

स्वस्वस्थानीं बसले दरबारीं सर्व मुख्य मानकरी ।
**मुजरा करी न शिवबा, बादशहाचा तिथें न मान करी॥**

गो विप्र देव तत्सम[2] यांहुनि इतरां लवे न नमनाला ।
क्षत्रिय; खपे तयाच्या करण्या इतरांसि नमन न मनाला ॥ ६७ ॥

साधा सलाम करि परि न करी **शि**वबाळ तो कुरनिसात[3] ।
**बा**दशहासी संशय ये त्या पाहुनि तसाच दिन सात ॥ ६८ ॥

**रा**य म्हणे **शा**हासी न करी **शि**वबाळ लवुनियां मुजरा[3] ।
हेतु न मनीं कशाचा पाहुनि हा थाट होय तो बुंजरा[4] ॥ ६९ ॥

केला न सुतें मुजरा हें लंघन[5]-विघ्न त्या दिनीं टळलें ।
कौशल्यें **रा**याच्या **शि**वबाचें मन **श**हासि ना कळलें ॥ ७० ॥

सदसद्विचारशक्ति[6] ज्ञान सुजनता सुतेज जरि असती ।
तरि हूडपणा करि सुत काय करूं ? बोधशब्द ना ठसती ॥ ७१ ॥

---

१ हा असुरांचा शिल्पी. हा शिल्पचमत्कारकोटिजनक म्हणजे कोट्यवधि शिल्पचमत्कार निर्माण करणारा होता. अर्जुनानें औषध म्हणून खांडववन अग्नीस भक्षणार्थ दिलें त्यावेळीं त्यांत हा मयासुर सांपडला, तेव्हां त्याचें अग्नीपासून अर्जुनानें रक्षण केलें. ह्या उपकाराची फेड म्हणून मयानें अर्जुनास देवदत्त नांवाचा शंख देऊन पांडवांकरितां एक उत्तम अपूर्व असें सभागृह निर्माण करून दिलें. त्या ठिकाणीं जलावर स्थलाचा व स्थलावर जलाचा भास व्हावा असा कांहीं विलक्षण चमत्कार मयानें केला होता. २ त्यांचे सारखे. ३ **मुजरा.** जमिनीला हात लावून सलाम करणें. ४ बावरा. ५ मर्यादा मोडल्याचें विघ्न. ६ सत्+असत्+विचार+शक्ति =चांगलें कोणतें वाईट कोणतें हा विचार करण्याची शक्ति.

सुज्ञ मुलां वळवाया योग्य न उपयोग देहदंडाचा[1] ।
जी सुप्रजा फिरे तिस निववाया जेंवि राजदंडाचा[2] ॥ ७२ ॥

**रा**य म्हणे "जग कैसें हें तुज नाहीं अजून माहित रे ! ।
अद्यापि सान[3] शिशु तूं हूडपणें कोणि ना कधींहि तरे ॥ ७३ ॥

**शा**हासि **हिंदु** मुजरा न करी हें त्या कसें पहावेल ? ।
गोवध बघतांचि उपसि असि[4] **हिंदू** हें न त्या सहावेल. ॥ ७४ ॥

ही **शा**ही **य**वनांची कांहींही **हिंदु**चें न येथ चले ।
भलतैसें[5] वृत्त तुझें आजवरी भाग्य रे ! म्हणुनि पचलें ॥ ७५ ॥

तूं बुद्धिमान् चतुर तूं हित अहित तुझें तुला सकळ कळतें ।
कां मग वागसि ऐसा ? स्नेहें मन्मन उदंड कळकळतें[6] ॥ ७६ ॥

न लगे अधिक निवेदन; करि बा ! तूं रे ! विचार उचित असा ।
होय न राग **शा**हाचा आम्हांवरि; हेरिं[7] आज काल कसा ?" ॥ ७७ ॥

---

१ शारीरिक शिक्षेचा. २ राजानें हातांत धरावयाचा दंड; एक राजचिन्ह. राजानें केलेल्या शिक्षेचा. ३ लहान. ४ तरवार. ५ वाटेल तसलें. विजापुरांत भर रस्त्यावर कसायांचीं दुकानें असत. एके दिवशीं शिवाजी त्या रस्त्यानें जात असतां, एक कसाई गाईचा वध करितांना त्यांच्या दृष्टिस पडला. त्याबरोबर ते त्याच्या अंगावर धावून गेले; आणि त्याला चांगला मार देऊन त्यांनीं ती गाय सोडविली. असे गोवधाचे प्रकार तेथें नित्य चालत तें ऐकूणेंही त्यांना असह्य होत असे. एकदां एक कसाई गोमांस पाटींत भरून शहराच्या दरवाज्यानजीक आंत येऊन विकावयास बसला असतां तिकडून शिवाजीराजे आपल्या कांहीं समवयी मित्रांसह घोड्यावर बसून चालले होते. त्यांची नजर त्या कसायाकडे गेली. त्याबरोबर त्यांनीं तलवार उपसून त्याचा तेथेंच शिरच्छेद केला. ६ कळवळतें; द्रवतें. ७ ध्यानांत आण; नीट विचार करून पहा.

आदरपूर्वक बोले सुत "वंद्या मजसि तात ! भवदाज्ञा ।
"पण गोभक्ष[1]नरातें नमन कराया रुचे कुणा प्राज्ञा[2] ? ॥ ७८ ॥

" देव न शाहा, न विप्रहि, नमन करायासि पात्र तो न मनें ।
" आज्ञा करा करिन मी शतदां विप्रा लवोनियां नमनें ॥ ७९ ॥

" आज्ञाधारक बालक हा तुमचा पसरितो तुम्हां पदर ।
" बाळा क्षमा करा जी !" वाटे न कसा मुलासि तातदर[3] ? ॥ ८० ॥

" येऊन आज मी जी ! दरबारातें यशासि जोडीन ।
" शाहासि तुष्ट[4]मति मी, चिंता न करा, करोनि सोडीन " ॥ ८१ ॥

वाटे आतां ताता निश्चित हा भावि[5] विघ्न टाळील ।
करिल शाहाला मुजरा जरि तो करितां स्व-अश्रु ढाळील ॥ ८२ ॥

ते बापलेक गेले दरबारानिकट, तों रथावरुनी ।
झटकन उतरे शिवबा जाय पुढें वस्त्रही न सांवरुनी ॥ ८३ ॥

केला सलामचि परी मुजरा नाहींच बादशाहाला ।
तेणें, मग तो[6] बसला शाहाच्या निकट[7] तात तों आला ॥ ८४ ॥

दिसला प्रसन्न शाहा[8], पिकला आनंद आज रायाचा ।
जेंवि पिके केकीचा[9] दिसतां घन[10], वृष्टि जो करायाचा ॥ ८५ ॥

चापल्य[11], तेज, हंसतमुख, भाषण मधु, रम्यरूप बाळोचें[12] ।
मोही शाहासि तेंवी जेंवी भृंगा प्रफुल्ल-कमळाचें ॥ ८६ ॥

---

१ जिवंत गाई मारून ती खाणाऱ्या ( भक्ष ) मनुष्याला. २ शहाण्याला. ३ बापाविषयी वाटणारा ( आदरयुक्त ) धाक. ४ संतुष्ट. ५ पुढें होणारें. ६ शिवाजी. ७ जवळ. ८ अदिलशाहा. ९ मोराचा. १० मेघ. ११ चपळपणा. १२ शिवाजीचें.

निकट[1]स्थितबाळाशीं लडिवाळपणा करूनियां बोले ।
प्रत्युत्तरें तयाचीं समुचित तीं ऐकुनी **शहा**[2] डोले ॥ ८७ ॥

झाला संतुष्ट **शहा**[2] पाहुनि त्याचें शहाणपण इतुकें ।
गोंजारि तया तो[2] हो ! मग फिरवी हात त्यावरी कुतुकें ॥ ८८ ॥

कोमल तत्कर[3]पल्लव **शहा**[2] प्रेमें धरी तदा स्वकरीं[4] ।
धरितां दिसे तसा तो कलभांचा[5] कर[6] करीं[7] जसा स्वकरीं[8] ॥ ८९ ॥

हांसत हांसत तेव्हां तेणें पुसिलें सुतुष्टिच्या मखरा[9] ।
मेरा[10] प्यारा[11] बेटा[12] क्यंव्[13] तुं[14] करते[15] नहीं[16] मुझे[17] मुजरा ? ॥ ९० ॥

" तातांज्ञा मुजऱ्याची करिं पण मी हजरतीस[18] जोहार[19] " ।
**शिवबा वदे " न घे तो, धर्मन्यायेंच जाय जो, हार[20] ॥९१॥**

" जन्मद कीं, ज्ञानद कीं, अन्नद कीं, पूज्य हे मला तीन ।
" जन्मद ते, अन्नद हे हजरत[21] सम मजसि भेद कांहीं न ॥ ९२ ॥

" त्यों[22] तातांतें[22] करिं मी जोहार[19] जसा तसाचि यों[23] तातां[23] ।
" मुजऱ्याचा मोह उडे, बालक मी, हजरतीस पाहातां " ॥ ९३ ॥

---

१ जवळ बसलेल्या बाळाबरोबर ( शिवाजीबरोबर ). २ आदिलशहा. ३ त्याचे (शिवाजीचे) हात. 'पल्लव' हा शब्द कोमलता दाखविण्यासाठीं लावितात. ४ आपले हातांत. ५ बालहत्तीची. ६ सोंड. ७ हत्ती. ८ आपल्या सोंडेंत. ९ मखर=ताट्या किंवा जाळी वगैरे लावून केलेली सुशोभित जागा. सुतुष्टिच्या मखराला म्हणजे शिवाजीला. १० माझ्या. ११ लाडक्या. १२ मुला. १३ कां. १४ तूं. १५ करीत. १६ नाहींस. १७ मला. १८ बादशाहास. 'हजरत' ही बहुमानाची पदवी राजा, पैगंबर इमाम इत्यादिकांना लावितात. १९ **सलाम**. २० माघार; पिछेहाट. २१ बादशाहा; खाविंद. २२ बापाला ( शहाजीला ). २३ या तुम्हां बादशहाला. तात हा शब्द आदरार्थीं मोठ्या पूज्यव्यक्तीलाही लावितात.

हसुं आलें **शा**हाला इतरांलाही श्रवोनि **शि**वबाचें ।
समयोचित उत्तर तें, झालें निश्चित चित्त **शि**वे[1]-बाचें ॥ ९४ ॥

मणि, रत्न-हार, वस्त्रें देउनि **शि**वबाळ फार गौरविला ।
**शा**हानें; **चं**द्र भगणे[2] अभ्रें हीं होत काय हो ! **र**विला ? ॥ ९५ ॥

---

१ शिवाजीच्या बापाचें. २ आकाशांतील तारे.

दा. क्र.

# अध्याय चवथा.

## राजगुरु दादोजीचा उपदेश.

( गीतिवृत्त )

श्रीमद्गुरु **दा**दोजी[1] सज्जन सच्छील सन्महित[2] आर्य[3] ।
पाजी बोधामृत **शि**वयुवराया जो करी महत्कार्य ॥ १ ॥

**म**ळठण[4]वासि ब्राह्मण सत्कर्मी **कों**डदेव तत्तात ।
**कु**ळकर्णीवतन करी, कीर्ति जयाची अजूनि गातात ॥ २ ॥

आय[5] न पुरे म्हणुनि हा व्यग्रमनें[6] भेटला **शा**हाराया ।
विनवि " विप्र मी दीन क्षम[7] आपण मद्धृदाश[8] हाराया ॥ ३ ॥

"सह्य न दयानिधे ! हो ! अल्पायास्तत्र[9] कुटुंबभार मला ।
"आश्रय यांचि[10] रमे[11] मी युष्मत्[12] श्रितवर्ग[13] कीं जसा रमला[14]" ॥ ४ ॥

---

१ दादोजी हा मोठा इमानी व स्वामिकार्य दक्ष असा होता. त्याचें वर्तन पवित्र असून स्वधर्मावर त्याची पूर्ण श्रद्धा होती. एकंदर धर्मकर्मं तो नियमानें करी. त्याच्या मनाची वृत्ती अशी असे कीं, स्वामिकार्यासाठीं देह झिजवून व दक्षतेने आणि इमानानें वागून आपल्या यजमानाचा उत्कर्ष साधावा. अशा ह्या प्रामाणिक, धर्मशील व पापभीरु पुरुषाच्या स्वाधीन शिवाजी महाराजांना शिक्षण घेण्यासाठीं शाहाजीराजानीं केलें. आणि दादोजीनेंही आपल्या यजमानाच्या ह्या गुणी व हुशार मुलाचें संगोपन मोठ्या प्रेमानें करून योग्य प्रकारचें व्यवहारिक शिक्षण त्यांस दिलें. क्षत्रियकर्म करण्यास योग्य व्हावा म्हणून दादोजीनें महाराजांस युद्धकला वगैरे शिकविण्याची उत्तम व्यवस्था केली. २ चांगल्यांनी म्हणजे मोठमोठ्यांनीं मान दिलेला. ३ पूज्य; कुलवान; सुसंस्कृत. ४ मळठण गांवीं रहाणारा. मळठण हा गांव पुणें जिल्ह्यांतील शिरूर तालुक्यांत आहे. ५ आदा, उत्पन्न. ६ अस्वस्थ चित्तानें. ७ समर्थ. ८ मत्+हृद्+आश=माझे अंतःकरणाला

परिसुनि विप्रनिवेदन **राय शा**हाजी दयार्द्र कळवळला ।
दैन्यग्रस्त[1]ब्राम्हणचातक पाहुनि दयौघघ[2]नें वळला ॥ ५ ॥

व्यवहारज्ञ बहुश्रुत[3] चतुर गुणी स्वामिकार्यतत्पर हा ।
त्या **राय** देइ आश्रय, कोण अशा ब्राह्मणा म्हणे न रहा ? ॥ ६ ॥

सद्गुणराशि तयाचा संपादी प्रेम लोभ विश्वासें[4] ।
**रा**याचा, पुरुष असे होती अतिमोहित[5] सकळ विश्वासें[6] ॥ ७ ॥

---

खाणारा त्याला. ९ थोडें उत्पन्न म्हणून. १० याचना करितों. ११ राहीन. १२ तुमचा. १३ आश्रित. १४ राहता झाला.

१ दैन्यानें म्हणजे दारिद्र्यानें ग्रस्त झालेला ब्राह्मण हाच कोणी चातक. चातक पक्ष्याला मान खालीं करून पाणी पितां येत नाहीं म्हणून तो मान वर करून 'आ' पसरून मेघवृष्टिची वाट पहात असतो. २ दयेचा ओघ (राशि) हाच मेघ (घन). ३ विद्वान्; पुष्कळ माहिती असलेला. ४ भरंवसा. शहाजीराजे यांचा दादोजीवर इतका विश्वास बसला कीं शिवाजीमहाराजांस योग्य शिक्षण देऊन चांगलें वळण कोणी लावील तर दादोजीच लावील असें त्यांस वाटत असे. इतकेंच काय पण शिवाजीमहाराजांचें पहिलें लग्न जें झालें त्या वेळीं चांगली मुलगी पाहून पुण्यासच आम्ही कार्य करून घेतों असें दादोजीनें शहाजीराजांस कळवितांच त्यांनीं आपली संमती दिली व तें कार्य त्यांच्या गैरहजेरींत दादोजीनें करून घेतलें. ह्या विश्वासू कारभाऱ्याच्या सचोटीची अशी एक गोष्ट सांगतात कीं, एके दिवशीं शिवाजी-महाराजांस बरोबर घेऊन तो राजाच्या एका बागेंतून चालला असतां एक पाडाचा आंबा दादोजीनें आपल्या हातानें तोडला. पण आपण हें बेकायदा काम केलें असें मनांत येऊन तो म्हणाला कीं, आपणास ह्याबद्दल शासन असावें; आणि ज्या हातानें तो आंबा तोडिला तो हात तोडा असें तो बरोबरच्या चाकरांस सागूं लागला. तें पाहून शिवाजीमहाराज म्हणाले, " हें तुमचें करणें बरोबर नाहीं. ह्या बागेची लावणी तुम्हीच केली जाहे. तुम्ही मालकच आहां. " हें ऐकून त्यानें आपल्या आंगरख्याची एक अस्तनी लांडी केली व असा लांड्या अस्तनीचा अंगरखा दादोजी वापरीत असे. ही गोष्ट पुढें शहाजीराजे यांस

अपुल्या जहागिरीचें काम पहाया पुण्यासि पाठवि तो ।
**दा**दोजीतें, तेथिल जन सद्गुणगण तदीय आठवितो ॥ ८ ॥

वर्षें तीस क्रमि हा सांभाळुनियां जहागिरी-वतन ।
सरळपणें जनतेचें, सुजन कीर्तिचें जसें करी जतन ॥ ९ ॥

निजानुगांसह[1] आली स्थविरावस्था[2] तया वरायाला ।
**शि**वबासि बोध तो तधिं करि; युक्तचि तो मनीं धरायाला ॥ १० ॥

प्रातःकाळीं प्रथम स्मरण करावें शुचिप्रसन्नमनें[3] ।
श्री**ह**रि**ह**रनामाचें[4] तत्पदकमलीं करूनियां नमनें ॥ ११ ॥

**का**लोपद्रुत[5] जग हें क्षम[6] कोणि न **का**लपाश[7] तोडाया ।
तरि हें मनीं धरावें प्रतिदिन-कार्यीं सुकीर्ति जोडाया ॥ १२ ॥

ह्या सुविचारें कधिंही मनुजाचें मन न जाय कुमतिकडे ।
**गं**गोदक सागर बा ! कधितरि सोडोनि जाय भलतिकडे ? ॥ १३ ॥

येतांचि कोणिही जन मागाया दाद, साग्र तकरार ।
ऐकुनि खराचि द्यावा न्याय, कुणाची करा न दरकार[8] ॥ १४ ॥

अविचारें न कुणाला द्यावें, दिधलें परंतु जें वचन ।
राखावें तें यत्नें नृपति **ह**रिश्चंद्रसें[9] जरी कठिण ॥ १५ ॥

---

कळली तेव्हां ते त्याच्या प्रामाणिकपणाबद्दल फार संतोष पावले व त्यास सातशें होन व एक झगा त्यांनीं बक्षीस म्हणून पाठवून दिला. ५ फार मान्य. ६ जगाला.

१ निज+अनुगांसह=आपल्या अनुयायांसह (अशक्तता, कंप, आजारीपण वगैरे). २ म्हातारपण. ३ शुद्ध आनंदित मनानें. ४ श्रीहरि ( विष्णु )+हर ( शंकर ) यांच्या नांवाचें. ५ काल+उपद्रुत=कालानें पीडिलेलें. ६ समर्थ. ७ यमपाश. ८ पर्वा. ९ हरिश्चंद्रराजासारखें, पान ४ टीप १४ पहा.

गोष्ट हरिश्चंद्राची प्रथिता[1] ती सांगतों तुम्ही ऐका ।
दिधला स्वप्नीं त्यानें मुनिला[2] राज्यादि सर्वही पैका ॥ १६ ॥

स्वप्नप्रदत्तदान[3] ख्यात तपोनिधि[4] समक्ष ये मागे ।
पूजि तया नृपति[5] उदक सोडुनि दे तें तरीहि तो रागे[6] ॥ १७ ॥

मज दक्षिणा दिल्याविण होय तुला दानसांगता[7] कैंची ? ।
बोलुनि हें मागे मुनि[8] तो त्याजवळी न संपदा पैची ॥ १८ ॥

जाय तदा काशिपुरीं[9] ससुतकांत[10] सांगतार्थ-धनकामें ।
विकुनि तयां नृप कमि जें भरति करी करुनि डोमजन[11]-कामें ॥१९॥

राज्यपदभ्रष्ट धनभ्रष्ट सुतभ्रष्ट यापरी झाला ।
दाराभ्रष्टहि झाला, वचनभ्रष्ट न परंतु तो झाला ॥ २० ॥

अंतीं भूपतिसी त्या दिव्या ती सत्यसंधता[12] फळली ।
आजन्मतप[13]फलोदक दे त्या तो मुनि, तदस्मिता[14] गळली ॥ २१ ॥

---

१ प्रसिद्ध. २ विश्वामित्रऋषीला. ३ स्वप्नामध्यें दिलेलें ( प्रदत्त ) दान. ४ तपाचा केवळ निधी (सांठा); तपस्वी (विश्वामित्र). ५ हरिश्चंद्र. ६ रागावला. ७ दानाची पूर्तता. ब्राह्मणाला जें आपण दान देतों त्याची पूर्तता दक्षिणा दिल्याशिवाय होत नाहीं. दानावर दक्षिणा दिल्याशिवाय दान दिल्याचें पुण्य घडत नाहीं. ८ विश्वामित्र. ९ गंगेच्या तीरावरील एक प्रसिद्ध क्षेत्र. ही मोक्षदायक सप्तपुऱ्यांपैकीं एक. पान ५० टीप. १३ पहा. हल्लीं हिला बनारस असें म्हणतात. १० सुत ( मुलगा )+कांता ( बायको ) यांसह. ११ चांडालाच्या ( डोमजनाच्या ) घरचीं कामें. हरिश्चंद्रानें स्वतःस डोमाला विकून घेतलें व तो त्याच्या घरचीं तशींच स्मशानातलीं कामें करीत असे. १२ सत्यैकनिष्ठता, सत्यपरायणता. आपल्या ( सत्य ) वचनाप्रमाणें अगदीं बरोबर वागण्याचा गुण. १३ जन्मापासून (आजन्म) केलेल्या तपश्चर्येच्या फलाचें उदक (पाणी). १४ तत् (त्याचा=विश्वामित्राचा )+अस्मिता ( अहंपणा ).

जें जें गेलें तें तें पूर्वाधिक होउनी परत आलें ।
भूपतिकडे पुन्हा त्या यश ज्याचें शतगुणें अधिक झालें ॥ २२ ॥

क्रीडा पराक्रमाच्या करुनि करावाचि शस्त्र[१]-अभ्यास ।
दौड करावी वाजी[२]वरुनि धरावा स्वकर्म-हव्यास[३] ॥ २३ ॥

मृगया[४] शरसंधान[५] द्वंद्व[६]-रण क्षात्रजां[७] करायाला ।
विहित[८], अशीं हीं कर्में संमति दे धर्म आचरायाला ॥ २४ ॥

या कर्मींहीं लाभे बळ आयु[९] मनःप्रशांति[१०] आरोग्य ।
सर्वार्थी[११] साधाया हीं कर्में क्षत्रियासि बा ! योग्य ॥ २५ ॥

वचनीं पानीं[१२] अशनीं[१३] धरावि मितता[१४] जसा अधन वित्तीं ।
कर्मीं धर्मीं दानीं बरवि अमितता[१५] असें धरा चित्तीं ॥ २६ ॥

उलटी रीति गृहीं ज्या नांदतसे तेथ अवदसा[१६]-व्याली ।
सुक्षेत्रींहि[१७] विषलता नवलचि ती जरि न कटुरसा व्याली[१८] ! ॥ २७ ॥

अन्यासि न तुच्छावें मोठा मी मी असें न मिरवावें ।
मन हें लहरि नसावें समर्थ-सज्जन-चरित्र गिरवावें ॥ २८ ॥

कोण शहाणा ? तो जो सावध पुढच्यास लागतां ठेंच ।
ध्यानीं ठसवावें हें, कौरव[१९] विरले सबंधु ताठेंच ॥ २९ ॥

---

१ शस्त्रांचा अभ्यास; दांड पट्टा तलवार, भाला वगैरेचा अभ्यास. २ घोड्यावरबसून. ३ आपल्या कर्मांचे ठिकाणीं उत्साह, व्यासंग. ४ शिकार. ५ बाणानें नेम धरणें. ६ दोनव्यक्तींचें युद्ध; मल्लयुद्ध, कुस्ती. ७ क्षत्रियांना. ८ योग्य. ९ आयुष्य. १० मनाची शांती. ११ सर्व पुरुषार्थ (धर्म, अर्थ काम आणि मोक्ष) १२ पिण्यांत. १३ खाण्यांत. १४ नेमस्तपणा. १५ सढळपणा. १६ अवदसारूपनागी. १७ चांगल्या शेतांतहि. १८ प्रसवली. १९ कौरव हे धृतराष्ट्राचे दुर्योधनादि १०० पुत्र. धर्मादि पांच पांडवांचे चुलतभाऊ. हे लहानपणापासून पांडवांबरोबर

कुल, शील, रूप, दौलत, संतति, तारुण्य, बुद्धि हीं सर्व ।
असती अनुकूल जरी, कोणींहि कधीं करूं नये गर्व ॥ ३० ॥

अंगीं शहाणपण जरि गर्व नसावा स्वघात तो पिकवी ।
पिकवियला कर्णाचा[1] गर्वें तो असुनि शूर सुज्ञ कवी ॥ ३१ ॥

---

अत्यंत गर्वानें व ताठ्यानें वागत असत व ते राज्याला भागीदार होणार म्हणून त्यांचा मत्सर करीत असत. पांडवांना ठार करण्याचे यांनीं अनेक प्रयत्न केले पण ते सर्व व्यर्थ गेले. अखेर त्यांनीं पांडवांना कपटानें द्यूतांत जिंकून त्यांचें राज्यादि सर्वस्व हरण केलें तेव्हां ते मदांध होऊन इतके ताठ्यानें वागूं लागले कीं पांडव आपल्या स्वतःच्या चरितार्थाकरितां पांच गांवावर संतुष्ट असतांही सुईच्या अग्रावर भूमी राहील इतकीहि भूमि देण्यास आम्ही तयार नाहीं असें ते म्हणूं लागले. इतकेंच नव्हे तर त्यांच्या मदांधपणाची व ताठ्याची सीमा होऊन प्रत्यक्ष द्रौपदीचें ती पणांत जिंकली गेली असें धरून भरसभेंत वस्त्र फेडून घेण्यालाही त्यांनीं सुरवात केली. ह्या वेळीं तेथें जमलेल्या थोर व पूज्य लोकांनीं पूर्वींच्या पुष्कळ थोर व सज्जन लोकांचीं चरित्रें सांगितलीं; दुराचरणानें व अधर्मानें ज्यांचा नाश झाला आहे अशांच्याहि कथा सांगितल्या पण या कौरवांना सद्बुद्धि न सुचून त्यांचा उन्मत्तपणा व ताठा यत्किंचितहि कमी झाला नाहीं. अखेर भारती महायुद्धांत कौरवांचा पांडवांबरोबर टिकाव न लागून सर्वस्वाला पारखे होऊन ते सर्व आपल्या आप्तेष्ट बांधवांसह प्राणांस मुकले.

१ हा कुंतीस लग्नापूर्वीं सूर्यापासून झालेला मुलगा. एकदां दुर्वासऋषीनें प्रसन्न होऊन हिजला पुत्र प्राप्त्यर्थ मंत्र दिला. हा मंत्र खरा आहे किंवा नाही हें पहाण्यासाठीं लग्नाच्या आधीं हा मंत्र म्हणून तिनें सूर्याला हांक मारिली. या मंत्राच्या प्रभावानें व सूर्याच्या प्रसादानें हा तिला मुलगा झाला. जनलज्जेस्तव तिनें याला जन्मतःच गंगेंत सोडून दिलें. पुढें हा मुलगा धृतराष्ट्राचा सूत जो अधिरथ त्याचे हातीं लागला. अधिरथाच्या बायकोनें आपल्या मुलाप्रमाणें त्याला वाढविलें. तेव्हांपासून हा सूतपुत्र आहे अशी प्रसिद्धि झाली. त्याचें सर्व शिक्षण कौरवपांडवांबरोबर द्रोणाचार्यापाशीं झालें. धनुर्विद्या शिकून हा अर्जुनाचा प्रतिस्पर्धी झाला. हा अत्यंत दुरभिमानी व गर्विष्ठ असा होता. कर्ण हा

पायसराशि[1] विनासे पडतांचि खडा तयांत लवणोचा[2] ।
नासे गुणराशि तसा गर्वलव स्पर्शतां न कवणाचा ? ॥ ३२ ॥

विभवें फुगूं नये कीं लक्ष्मी तरला[3] नभीं जशी चपला[4] ।
घटिकेंत राव[5] रंका[6] करि रावा रंक ही अशी चपला[7] ३३ ॥

कतमव्यसनग्रस्तचि[8] कतमोपायेंचि[9] ते तदा तरले ।
इतिहास पूर्वजांचे सांगाया तें जनासि अवतरले ॥ ३४ ॥

---

सामर्थ्यवान् व पराक्रमी कांहीं कमी नव्हता पण त्याच्या गर्विष्टपणामुळें व गर्वोक्तिमुळें त्याच्या आंगच्या गुणाचें चीज झालें नाहीं. ह्याचें नेहमीचें भाषण फार गर्वोक्तीचें असे व आपण कर्तुमकर्तुमन्यथाकर्तुम् असा आहें असें तो कौरवांना भासवीतहि असे. परशुरामाकडे ब्रह्मास्त्रविद्या शिकण्याकरितां हा गेला असतां त्याला ब्रह्मास्त्रविद्या प्राप्त झाली पण मी ब्राह्मण आहें असें खोटेंच सांगून ती विद्या प्राप्त करून घेतल्यामुळें ही विद्या तुला ऐनप्रसंगीं स्फुरणार नाहीं असा परशुरामानें याला शाप दिला होता ही गोष्ट त्यानें कौरवांना न कळवितां तशीच गुप्त ठेविली; तसेंच एका ब्राह्मणाच्या गाईच्या वासराचा वध केल्यामुळें तूं युद्ध करीत असतां ऐनप्रसंगीं तुझ्या रथाचीं चाकें पृथ्वी गिळून टाकील असा जो त्या ब्राह्मणानें त्याला शाप दिला होता हीहि गोष्ट त्यानें कौरवांना कळविली नव्हती. भारत युद्ध होण्याच्या अगोदरच्या याच्या गर्विष्ठपणाच्या भाषणावरून हाच आपलें युद्धांत रक्षण करील असा भरंवसा सर्व कौरवांना वाटत होता. चांगल्या बोधाची कोणीहि गोष्ट सांगितली तरी ती याला पटत नसे. प्रसंगीं भीष्माचार्य व द्रोणाचार्य यांचाही उपमर्द व निर्भर्त्सना करण्यास यानें कमी केलेलें नाहीं मग इतरांची काय कथा ? याची बहुतेक पुष्कळशी शक्ति नुसत्या गर्वोक्तीच्या भाषणांतच खर्च होऊन पांडवांसमोर केव्हांही याला टिकाव धरतां आला नाहीं व अखेर अर्जुनाचे हातून याचा वध झाला. कर्णासारखा कोणी दाता नव्हता अशी याची ख्याती आहे.

१ पुष्कळ दूध. २ मिठाचा. ३ चंचल. ४ वीज. ५ श्रीमंत, राजा. ६ भिकाऱ्याला. ७ चंचळ. ८ कोणत्या ( कतम ) संकटानें ( व्यसन ) ग्रासून गेलेले. ९ कोणत्या उपायानेंच.

प्राचीन राजियांचे उज्ज्वल इतिहास म्हणुनि वाचावे ।
कवि वदति रचिति जे निज चरितें ऐशीं तिहींच वांचावें[1] ॥ ३५ ॥

स्वमनीं मनुजें अक्षक्रीडेसम[2] हा प्रपंच मानावा ।
पडेल जुगदानच[3] हा नित्य भरंवसा परी न राखावा ॥ ३६ ॥

मानवलोकीं या, जन सर्वज्ञ असोनिही निरभिमानी ।
राहे जो मतें[4] सर्वां, कोणी त्याचा न शब्द अवमानी ॥ ३७ ॥

वर्तन शुद्ध असावें धर्मासम[5] धन्य म्हणुनि बा ! घ्यावें ।
उलटें ज्यांचें त्यांनीं छी थु न व्हावी म्हणोनि विष प्यावें ॥ ३८ ॥

दुर्जन परित्यजावे जरि ते विद्यासमन्वितहि[6] असती ।
खल भुजग अंतरींचे ते सविमलमणिहि[7] काय ना डसती ? ॥ ३९ ॥

वैर वृथा निर्दयता परधनदाराभिलाषिता[8] खळता ।
दुर्जन-लक्षण ऐसें विदित न त्यांची कुणा विश्रृंखळता[9] ? ॥ ४० ॥

परमेशपदीं निष्ठा अढळा, भूतीं दया सुधा धर्मीं ।
आसक्ति असों द्यावी श्रुतिसारें[10] असाचि शर्म[11] या कर्मीं ॥ ४१ ॥

प्रेमें अकृत्रिमें[12] बा बद्ध करावेंचि लोकमात्रासी[13] ।
वाणी गोड असावी दे जी सुख फार कर्ण-गात्रासी[14] ॥ ४२ ॥

---

१ जगावें. २ सोंगट्याच्या ( अक्ष ) खेळाप्रमाणें. ३ तिन्ही फासे सारख्याच अंकाचे पडणें. सोंगट्याचें जूग चालवायाच्या उपयोगी पडणारें फांशावरचें दान. ४ मान्य. ५ धर्माप्रमाणें. पान ४ टीप १३ पहा. ६ विद्येनें युक्त. ७ उत्तम (विमल) मणी असले तरी ही. सर्पांच्या मस्तकांत मणी असतात अशी समजूत आहे. ८ दुसऱ्याचें धन व बायको (दारा) यांच्या प्राप्तीची (अपहार करण्याची) इच्छा बाळगणें ९ उच्छृंखल-स्वैर वर्तन, दुराचाराचें वर्तन. १० वेदाचें सार. ११ कल्याण; सुख. १२ शुद्ध, खरें. १३ सर्व लोकांसी. १४ कानाच्या अवयवाला; कानाला.

आकर्षिति सकल जनां हे गुण लोहासि लोहचुंबकसे ।
प्रभुकार्यदक्ष राहति ते रिपु-नाशींच टपुनियां बकसे ॥ ४३ ॥

बरवा मृत्यु पण न हो अपकीर्ति जनांत जपुनि वागावें ।
सादर[1]-दर पसरे सच्चरितें नलगे कुणाहि सांगावें ॥ ४४ ॥

स्वीकारावि हितोक्ति प्रेमें असली जरी लहानाची ।
वय जात न प्रमाण ज्ञानिजनीं, त्यजि न ती शहाणाची ॥ ४५ ॥

प्रमाण[2] मदितर[3] कुणिहि न म्हणुनि दुराग्रह धरूनि जो बसतो ।
भ्रमतो श्रमतो फसतो अंतीं त्या कार्यनाश[4]-अहि डसतो ॥ ४६ ॥

श्रीमंतनिकटवर्ती जन बहुधा प्रिय निजप्रभुसि वदती ।
ऐसे स्तुतिपाठकजन तोल्याचे काय संप्रती[5] असती ? ॥ ४७ ॥

विश्वास न ठेवावा तद्वचनीं ते प्रभूसि जरि भजती ।
प्रभुपुढती बोलाया अप्रिय जरि सत्यही न ते धजती ॥ ४८ ॥

अप्रियहि सत्य बोले तो प्रेमास्पद[6] बहु प्रभुवरांचा[7] ।
होतो हें कळतां घे लाभ न कोण श्रित[8] प्रभुवरांचा[9] ? ॥ ४९ ॥

अढळ न निश्चय जन-जन[10]-मत-अनुवर्ती, प्रतिक्षणीं फिरवी ।
बेत, क्षणिकबुद्धि तो चरित तयाचें न सुज्ञजन गिरवी ॥ ५० ॥

देशाटनें चतुरता वादविवादें तशीच पंडितता ।
सच्छीलता सुसंगें वाढे जशि भूषणें सुमंडितता[11] ॥ ५१ ॥

---

१ आदरयुक्त धाक. २ कोणताही विचार अगर वस्तु सिद्ध करण्याचें ( खरें आहे किंवा बरोबर आहे हें ठरविण्याचें ) साधन; आधार. ३ माझ्यावांचून दुसरे. ४ कार्याचा नाश हाच कोणी सर्प तो. ५ सांप्रत, सध्यां. ६ प्रेमाचें स्थान ( आस्पद ). ७ श्रेष्ठ धन्याचा. ८ आश्रित लोक. ९ धन्याच्या प्रसादाचा. १० निरनिराळ्या लोकांच्या मताप्रमाणें. ११ चांगली शोभा.

वडिलोपार्जित केवळ धन भोगुनि जे जगांत वावरती ।
मान न जनांत त्यां ते संसारीं जरि कदापि ठावरती[1] ॥ ५२ ॥

फसतो कोण ? बसे तो, फिरतो जो सर्वदा सुखें चरतो ।
पाहे कसा चराचर[2] पृथ्वीगत[3] जरि फिरे न खेचर[4] तो ? ॥ ५३ ॥

परतंत्रवृत्ति खोटी प्रसवे ती दास्यवृत्तिभुजगीला[5] ।
त्यजुनि तिला पाळावी मनुजें स्वातंत्र्यवृत्तिसुमृगीला[6] ॥ ५४ ॥

तापद, कष्टद, कंपद रौरव नामक जसा असे नरक[7] ।
स्पष्ट नरक परवशता इह[8] तेंवि तसाचि, तिळ नसे फरक ॥ ५५ ॥

भूवरि या सर्वांहुनि मोठें जें दुःख मानवा आहे ।
देहव्यथा न, परि तें मात्र असंतोष जो मनीं वाहे ॥ ५६ ॥

गालिप्रदान[9] निंद्यचि करुनी तें जे विटाळिती तोंड ।
क्रोधभरांतहि अपुल्या पदरीं ते घेति बांधुनी धोंड ॥ ५७ ॥

व्हावें न क्रोधवश क्रोधकरिप्रति[10] विवेक-हरि[11] धाडी[12] ।
बुध धैर्यगुणें झोडी व्यसनवृकाची[13] महा केहरि[14] धाडी[15] ॥ ५८ ॥

---

१ स्थिरस्थावर होतात, सांवरतात. २ चर ( जंगम )+अचर ( स्थावर ). ३ पृथ्वीवर असलेली, पृथ्वीवरील. ४ आकाशांत फिरणारा. ५ आपण दास आहोंत अशा भावनेची वागणूक ( दास्य-वृत्ति ) हीच कोणी भुजगी म्हणजे सर्पीण तिला. ६ स्वातंत्र्यवृत्ति हीच कोणी सुमृगी म्हणजे चांगली हरिणी तिला. ७ ह्या जन्मांत केलेल्या पातकाची मरणानंतर शिक्षा भोगण्याची जागा. रौरव, अंधतामिस्र, अर्वाचि, कुंभीपाक, लोहमूर्ति वगैरे बरेच नरकलोक आहेत. ८ या जगामध्यें. ९ शिव्या देणें. १० क्रोध म्हणजे राग हाच हत्ती त्याप्रती ( कडे ). ११ विवेक ( विचार ) हाच हरि म्हणजे सिंह त्यास. १२ धाडतो. १३ व्यसन ( संकट ) रूपी वृकाची म्हणजे लांडग्याची. १४ कहर करून सोडणारी. हाहाःकार उडविणारी. १५ धाड, हल्ला.

न मिळे शक्तिबळें जें युक्तिबळें परि मिळे सहज यश तें ।
समयीं ह्याचि बळानें देवांहीं मिळविलींच विजय-शतें ।। ५९ ।।

प्रसन्न मुख, मन, दृष्टिहि सतत असावी असोनियां ऋजुता[1] ।
अंगीं नीतिनिपुणता शौर्य सुजनता क्षमा वचनपटुता ।। ६० ।।

भुलतां न बाह्य[2] रंगा एक[3] खरें अंतरंग वळखावें ।
दुसऱ्याचें, ना तरि ये समय कदाचित् स्वयें गरळ[4] खावें ।। ६१ ।।

म्यान असो मखमलिची वा मूठहि बुट्टिदार, परि साची[5] ।
थोरवि तरवारीची पातीं[6], अन्यत्र ती न परिसाची[7] ।। ६२ ।।

कार्य महत्वाचें जें जपुनि करावें विलंब जरि लागे ।
सतत धरावि चिकाटी स्वीकृतकार्यीं शरीर जरि भागे ।। ६३ ।।

स्वीकृतकार्य[8] फसे जरि खेद करित ना बसे खरा सुकवी[9] ।
पुनरपि पुनरपि यत्नें साधी तो तें, न धैर्य निज सुकवी[10] ।। ६४ ।।

मेरुपरी[11] न करावा जड जो अपराध होय अणुमात्र[12] ।
परि विपरीत असे जरि न करावा तो क्षमेसि तिळ पात्र[13] ।। ६५ ।।

मनुजें क्षमा करावी, पण ती सर्वत्र सर्वदा न बरी ।
करितां तशी म्हणति जन 'दुर्बळ भितरा' तया तसा न जरी ।।६६।।

कार्य करावें वेळिंच, पण अति घाई न येच कामाला ।
कार्यांत महत्वाच्या बोधिति हें इच्छिताप्तुकामाला[14] ।। ६७ ।।

---

१ सरळपणा. २ बाहेरील. ३ फक्त, केवळ. ४ विष. ५ खरी. ६ पानांत. ७ ऐकाच, ध्यानीं धराच. ८ स्वीकारलेलें कार्य. ९ शहाणा. १० वाळवी; सोडी. ११ मेरुपर्वतासारखा. मेरु नांवाचा सर्वांत मोठा पर्वत हा सोन्याचा व हिऱ्यांचा बनलेला आहे व याच्याभोंवती सूर्य प्रदक्षिणा घालतो अशी कल्पना आहे. १२ अणु एवढा; अत्यंत लहान. १३ योग्य. १४ इच्छित जें तें मिळविण्याची

चूक घडे श्रित[१]हस्तें म्हणुनि गमे जरि तयांसि दंडावें ।
पाठीवरिच तयांच्या पोटावरि परि कधीं न खंडावें ॥ ६८ ॥

दारू-गांजा-अफुचें व्यसन नसावेंच हानि तें करितें ।
कीर्तियशाचि न केवळ सर्ववस्त्रों[२]चीहि; बुद्धिबळ हरि तें ॥ ६९ ॥

व्यसनांत व्यसन खोटें दारूचें तें अनर्थकर पितेया[३] ।
आयुर्बलयश खपवी, लोकतिरस्कारवन्हि[४] जाळि तया ॥ ७० ॥

धनहानी धीहानी जीवितहानी तशीच कुलहानी ।
मद्यपित्याची[५] होते सतत भरे गृह तदीय कलहांनीं ॥ ७१ ॥

अल्पावधींत मनुजां लागति दुर्गुण, परी न सुगुण तसे ।
म्हणुनि कुसंगति टाळिति सुज्ञ बळें, लोक कुष्टिनीस[६] जसे ॥ ७२ ॥

भूकेविना न खावें तैसें झोंपेविना न पहुडावें[७] ।
वागावें या नियमें कीं रोगानें तया न पछाडावें ॥ ७३ ॥

नियमित निद्रा घेउनि करितो जो नर सदा मिताहार ।
उद्योग नित्यकष्टहि, दुर्घटकार्यींहि घे न तो हार ॥ ७४ ॥

दुःख प्रथम सुख पुढें ऐसा क्रम या जगांत चालतसे ।
दिवसास कष्ट करिल्या रात्रिस बहु गाढ झोंप लागतसे ॥ ७५ ॥

---

इच्छा करणाराला (आप्तुकाम). धातूपुढें 'तुम्' प्रत्यय लागून त्यांतील 'म्' चा लोप होऊन 'काम' शब्द लागून हें रूप सिद्ध झालें आहे. कर्तुकाम, गंतुकाम इत्यादी दुसरीं उदाहरणें आहेत.'काम' शब्दाप्रमाणें 'मनस्' शब्दाचाही प्रयोग करितात जसें गंतुमना, कर्तुमना इत्यादि. काम आणि मनस् यांच्या योगें इच्छिणारा असा अर्थ होतो.

१ आश्रितांच्या हस्तें, आश्रितांकडून. २ सर्व वस्तूंची, मालमत्तेची. ३ पिणारास. ४ लोकांचा तिरस्कार हाच कोणी वन्ही म्हणजे अग्नी. ५ दारू पिणाराची. ६ जिच्या आंगावर रक्तपितीचा रोग उठलेला आहे अशा स्त्रीस. ७ पडावें; निजावें.

घर्षण होतां पडतो काष्ठस्थित[1] अग्नि जेंवि बाहेर ।
घडतांचि सत्समागम होते बुद्धि प्रदीप्त चौफेर ॥ ७६ ॥

बुद्धीचा न करावा क्षणभरही दुरुपयोग मनुजानें ।
करित्या तसा ढकलि तो व्यसनीं विलया अखेर मनुजा ने ॥ ७७ ॥

दुर्योधन[2]राजानें केला बहु बुद्धिचा दुरुपयोग ।
प्राणा अंतीं मुकला कैचा मग त्यासि राज्यपदभोग ? ॥ ७८ ॥

द्रव्यबळाहुनि विद्याबळ मोठें करवि तें नरा मान्य ।
न तसें द्रव्याचें बळ श्रीमंतासी जरी असो[3]मान्य ॥ ७९ ॥

केवळ देशीं त्याच्या लोकांसी पूज्य भूपती होतो।
परि सर्वत्र चहुंकडे विद्वान् जरि अति दरिद्र कीं हो ! तो ॥ ८० ॥

सन्मानावे आधीं विद्वज्जन जरि असोत धनरहित ।
तत्संगति फळते, जशि फळली धर्मासि, ती करी नृहित ॥ ८१ ॥

ऋण काढुनि न करावा सण, करि ऋण काढुनी बुडे खोल ।
ऋणरूपी डोहीं मग होय तयाचें जिणें कवडिमोल ॥ ८२ ॥

जन्मा येउनि करणें केलें म्यां काय तें तपासावें ।
कर्म करावें मनुजें उचित असें कीं न कोणि हांसावें ॥ ८३ ॥

---

१ लांकडामध्यें असलेला. २ हा कौरवांचा ज्येष्ठ भ्राता. हा अत्यंत दुष्ट बुद्धीचा होता. यानें आपली सर्व बुद्धि अंगीकारलेलीं दुष्ट कार्यें तडीस नेण्याच्या प्रयत्नांत खर्चिली. पांडवाचें राज्य आपल्याला मिळावें म्हणून त्यांना ठार मारण्याचे प्रयत्न केले. साध्वी द्रौपदीची विटंबना केली, कपटानें द्यूत खेळून पांडवांना वनवासांत जावयास लाविलें. प्रत्यक्ष भगवान श्रीकृष्णाचा उपदेश मान्य न करून कुबुद्धीनें भारतीय युद्ध केलें. या भारती युद्धांत भीष्माचार्य कृपाचार्य यांसारख्यांच्या सुविचाराच्या विरुद्ध जाऊन अखेर तो प्राणास मुकला. ३ पुष्कळ.

धृति[1] तेजें[2] शौर्य दाक्ष्य[3] प्रभृतिगुणें क्षत्रियांसि मानवेंती[4] ।
तरि हे गुण पिकवावे, त्यांपुढती हो ! बलाढ्य रिपु लवती ॥ ८४ ॥
सुटतां नीति नृपतिची तापद होय प्रजेसि तच्चरित ।
पसरुनि अनर्थ देशीं निश्चित तन्नाश होतसे त्वरित ॥ ८५ ॥
समयीं पडती तदसुंहि[5] कालमुखीं[6] स्वप्रजेचिया हातें ।
मारीयलें प्रजेनें ठार च्युतनीति-नृपति-वेनाँतें[7] ॥ ८६ ॥
पदरीं असोंचि द्यावे निवडक विश्वास्य कुशल बा ! हेर ।
जे गुप्त वृत्त आणिति यत्नेंही जें फुटे न बाहेर ॥ ८७ ॥
राज्यासि होति मंत्री आधार सदा घरा जसे खांब ।
वा[8] चार वर्ण[9] धर्मा[10] यन्महिमा गत दिगंतरीं लांब ॥ ८८ ॥
परि ते मंत्री गुणवान् विद्वान् कुलवान् सुशीलसंपन्न ।
प्रभुकार्यीं दक्ष असे अणिक असावे नयांत संपन्न ॥ ८९ ॥

---

१ धैर्य. २ पराक्रम, तेजस्विता. ३ दक्षता. ४ मान देतात. ५ तत्+असुहि =त्याचे ( राजाचे ) प्राणहि. ६ काळाच्या 'यमाच्या मुखांत.' ७ सुटली ( च्युत ) आहे नीति ज्याची असा राजा जो वेन त्याला. हा अंगराजाचा मुलगा. हा अत्यंत क्रूर स्वभावाचा होता. याच्या दुष्ट स्वभावामुळें अंगराज्याला फार खेद झाला म्हणून राज्य सोडून तो आपल्या राजधानींतून निघून गेला. वेन राजा इतका दुष्ट होता कीं ऋषींचीं यज्ञयागादी कर्मेंही तो बंद करूं लागला. अखेर ऋषींनीं त्याचा वध केला. ८ अथवा. ९ सनातन वैदिक धर्माची उभारणी वर्णाश्रम पद्धतीच्या आधारावर केलेली आहे. याच धर्मांतील समाजाचें वर्गीकरण ब्राह्मण, क्षत्रीय, वैश्य व शूद्र या चार वर्णांत केलेलें असून, व्यक्तीच्या आयुष्यक्रमाची रचना ब्रह्मचर्य, गृहस्थ, वानप्रस्थ आणि संन्यास या चार आश्रमांत केलेली आहे. ही व्यवस्था मनुष्याचा स्वभाववृत्ति व जगतांतील त्रिकाल अबाधित सिद्धांत यांचा पूर्ण विचार करून त्याच्या आधारानें केलेली असल्यामुळें हा सनातन वैदिक धर्म आजपर्यंत टिकून राहिलेला आहे व त्याची कीर्ति दिगंतीं पसरलेली आहे. १० सनातन वैदिक धर्माला.

अधिकाराचीं सूत्रें देतां पाहावि पात्रता पहिली ।
जात न गोत न तेथें पाहावें नीति ही अशी लिहिली ॥ ९० ॥

अधिकारपदविसूत्रें[1] धरण्या प्राकृत[2] न पात्र लव[3] जन्य[4] ।
गजभारा उचलाया शक्त न कोणिहि गजाविना अन्य ॥ ९१ ॥

रण करितां दुर्दैवें हातीं पडती जरी अहितें-दारा[5] ।
छळतां न पाठवाव्या सन्मानुनि त्यां तदीय घरदारा ॥ ९२ ॥

बंदीकृत[6]परसैनिकसरदारां छळुं नये विजेत्यांनीं[7] ।
परि वर्णावे समयीं केले विक्रम[8] रणांत जे त्यांनीं ॥ ९३ ॥

घायाळ सैनिकांच्या परपक्षांच्या[9] क्षतांसि[10] बांधुनियां ।
तच्छुश्रूषा करवुनि कुशल पुसावें तयांसि भेटुनियां ॥ ९४॥

क्षतदु:खमुक्त होतां वस्त्राभरणें तयांसि देऊन ।
धाडावे देशीं निज निज ते जाती कृतज्ञ[11] होऊन ॥ ९५ ॥

ऐशा दयाद्रकर्मैं साक्षात् **य**मतुल्य कठिण-हृदयाचा ।
क्रूर द्वेष्टा वैरी होउनि मृदु सोडि पथ अपायाचा ॥ ९६ ॥

आप्त सखा पुत्र पिता गुरुहि प्रत्यक्ष वा असो समरीं[12] ।
तद्वध न पाप, रणहत भोगिति तें स्वर्गसौख्य दे अमरी[13] ॥ ९७ ॥

अल्पांत अल्प यत्नें लाभ महत्तर[14] मिळेच ज्या कामीं ।
योजुनि मतिसर्वस्वहि घालि तिथें हात सुज्ञ जयकामी[15] ॥ ९८ ॥

---

१ अधिकाराच्या जागेचीं ( पदवीचीं ) सूत्रें. २ साधा, गांवढळ. ३ थोडाही. ४ मनुष्य. ५ शत्रूंच्या बायका. ६ शत्रूकडील पकडून आणिलेले सैनिक व सरदार. ७ विजय मिळविलेल्या वीरानीं. ८ पराक्रम. ९ शत्रूंच्या. १० जखमांसी. ११ आभारी, केलेले उपकार जाणणारा. १२ युद्धांत. १३ स्वर्गांतील देवी. १४ अधिक मोठा. १५ जयाची इच्छा करणारा.

प्रेमें प्रजेसि पाळिल मानुनि राजा स्वलेंकरें तिजसी ।
तरि त्या भजेल ती श्रीरामा भजली प्रजा तदीय जसी ॥ ९९ ॥

पडतांचि संकटीं तो ये धांवत ती प्रजा निवाराया ।
तत्संकट बिकटहि, जरि कोणि न म्हणतांहि 'तें निवारा या' ॥१००॥

मरुं देत दहा पण कीं न मरूं दे एक पालक दहांचा ।
इच्छुनि असें प्रजा दे समयीं बलि निज तदर्थ देहाचा ॥ १०१ ॥

कर घ्यावा क्षितिपतिनें[1] पण तो अनुसरुनि राजधर्मातें ।
द्यावाचि तो प्रजेनें साधायातें अखंड शर्मातें[2] ॥ १०२ ॥

मधुलव्र मधुप[3] फुलांतिल पाकळिला दुखवितां न, घे जैसा ।
जनमन न दुखवितां कर घ्यावा जनशक्ति जशि नृपें तैसा ॥१०३॥

छळ करुनियां प्रजेचा हरण करी नृप बळें तिचें धन तो ।
जातो अधोगतीला त्वरित असें श्रेष्ठ शुक[4]मुनी म्हणतो ॥ १०४ ॥

स्वार्थ तसा परमार्थहि साधी सद्व्ययचि जो करि धनाचा ।
ऐहिक सुख भोगी तो; वाटे दर[5] ना तयासि निर्धनाचा[6] ॥ १०५ ॥

---

१ क्षिति म्हणजे पृथ्वी तिच्या पतिनें; राजानें. २ कल्याण, ३ भुंगा, भ्रमर. ४ हा व्यासाचा मुलगा. हा गर्भावस्थेंत असतांना याला आत्मज्ञान झालें होतें. हा जन्मतःच योगसंपन्न असून अत्यंत निग्रही होता. हा तत्वज्ञानाचा जणुं काय पुतळाच होता. यानें सारा कर्ममार्ग सोडून देऊन सर्वस्वाचा त्याग केला व शेवटपर्यंत तो ज्ञानावस्थेंतच राहिला. रंभा नांवाचे अप्सरेनें याचें मन वळविण्याकरितां पुष्कळ प्रयत्न केले पण ते सर्व तिचे निष्फळ झाले. तूं सात दिवसांत सर्पदंश होऊन मरण पावशील असा शाप झालेल्या परिक्षिति राजाला सात दिवसांत सर्व भागवतग्रंथाचें श्रवण करवून त्याला यानें मोक्षप्राप्ति करून दिली. ५ भीति. ६ मरणाचा.

सद्व्यय तो व्यय जो बा ! यज्ञीं धर्मीं सुपात्रजनदानीं ।
तीर्थीं लोकहितार्थीं; खर्चावें धन तदर्थ धनदांनीं[1] ॥ १०६ ॥

निंदेसि पात्र होतो करि जन जो धर्मबाह्य[2] आचरण ।
आचरण धर्मविहितेंचि[3] त्याचे जन देवही धुती चरण ॥ १०७ ॥

सत्य वदे कविवर हें 'मातुःपरदैवतं न[4]' या जगतीं ।
आशीःप्रसाद नसतां मातेचा ते गतासु[5] जरि जगती ॥ १०८ ॥

दुसरें पिताचि दैवत देउनि देहासि पोषि पुत्रातें ।
त्या योगें पुरुषार्थप्राप्ति[6]; धरा, या मनीं सुमंत्रांतें[7] ॥ १०९ ॥

---

१ धन देणारांनीं, श्रीमंतांनीं. २ धर्माला सोडून असलेलें; धर्मानें निषिद्ध मानिलेलें. ३ धर्मानें सांगितलेलें. ४ मातेपेक्षां दुसरें दैवत नाहीं.

गायत्र्या न परो मंत्रो न तिथिर्द्वादशीसमा ।
न हि सत्यात्परो धर्मो न मातुः परदैवतम् ॥

५ गत आहेत असु ( प्राण ) ज्याचे म्हणजे मेलेले. ६ धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष या चार पुरुषार्थांची प्राप्ती. सनातन वैदिक धर्मांत पुरुषानें जन्मास येऊन ह्या चार अर्थांची (वस्तूंची) प्राप्ती करून घेतली पाहिजे असें सांगितलें आहे. व ते मनुष्याच्या स्वभावाला व चरित्राला धरून असेच आहेत. मनुष्य प्राणी जन्माला आल्यापासून जितक्या जितक्या म्हणून इच्छा करूं शकतो त्या सर्वांचा समावेश या चार अर्थांमध्यें होतो. व्यासमुनींनीं 'भारतसावित्रीं'त असें सांगितलें आहे कीं 'धर्मादर्थकामश्च.' धर्माचरणानेंच अर्थ व काम यांची प्राप्ती होते. सर्वार्थांचा धर्म हाच पाया होय. आणि म्हणून ते पुढें म्हणत आहेत कीं

'न जातु कामान्न भयान्न लोभात्
धर्मं त्यजेत जीवितस्यापि हेतोः ।

मनुष्यानें कामाला ( विषयवासनेला ), भयाला तसेंच लोभाला बळी पडून केव्हांही जीविताचें कारण जें शरीर तें धोक्यांत पडत असलें तरी धर्माला सोडूं नये. धर्माच्या यागानेंच पुढें बाकीचे सर्व अर्थ प्राप्त होत असतात. ७ चांगल्या उपदेशाला.

वडिलांसि मान देउनि तोषवि जो मीपणासि सोडून ।
घाली माळ तयाला लाभजयश्री स्वहस्त जोडून ॥ ११० ॥

पित्राज्ञा पुत्रानें मानावी वेदवचनसी[1] आधीं ।
*श्रीरामें जशि मानिलि सोसुनिही कठिण मानसी आधी[2] ॥ १११ ॥

दशरथसुत राम प्रभु कीर्तिश्रीशांतिभूतिचें[3] भवन[4] ।
नामस्मरण तयाचें करि त्या बाधा कदापि दे भव[5] न ॥ ११२ ॥

यापरि दादोजीनें केला श्रुतिपात्र[6] बोध शिवराया ।
सुश्रोतृवक्तृसंगम[7] झाला सुख हिंदुभूसि वितराया[8] ॥ ११३ ॥

बोधान्तीं आशी दे गुरु दादोजी उदंड शिवबाळा ।
गुरु-आशीर्बळ[9] मोठें करि वश सकलांसि काय ? पण काळा[10] ॥ ११४ ॥

तेजस्वी तुमचे भुज होतिल गोविप्ररक्षणीं क्षम ते ।
ज्यांहीं यवनेंद्रांसि[11] न केला मुजरा स्वधर्मदक्षमते[12] ! ॥ ११५ ॥

---

१ वेदाच्या वचनाप्रमाणें. २ पीडा, दुःख. ३ कीर्ति+श्री (शोभा)+शांति+भूति (भरभराटी)चें. ४ घर. ५ संसार. ६ ऐकण्यास योग्य. ७ सु ( चांगला )+श्रोतृ (ऐकणारा)+वक्तृ ( बोलणारा )+संगम ( संयोग ). ८ द्यावयास. ९ गुरूच्या आशीर्वादाचें सामर्थ्य (बळ). १० यमाला. ११ यवनराजाला. १२ स्वधर्माचे ठायीं दक्ष ( तत्पर ) आहे मति ज्याची असे जे तुम्ही ते अहो ! * श्रीरामचंद्राची सावत्र आई कैकेयी हिला दशरथराजानें पूर्वी दोन वर देऊं केले होते. श्रीरामचंद्राच्या यौवराज्याभिषेकाचे वेळीं कैकेयीची दासी मंथरा हिनें कैकेयीचें मन वळवून एका वरानें रामचंद्रास वनवास व दुसऱ्यानें भरताला ( कैकेयीपासून दशरथराजाला झालेला मुलगा त्याला ) राज्याभिषेक असे दोन वर दशरथराजाजवळ मागण्यास तिला प्रवृत्त केलें. त्याप्रमाणें कैकेयीनें वर मागतांच मोठ्या कष्टानें व दुःखानें दशरथराजानें रामचंद्रास वनवासास पाठविलें. पित्याची आज्ञा तत्काळ मान्य करून रामचंद्र वनवासास गेले. रामचंद्र वनवासांत गेल्यावर दशरथराजा पुत्रशोकानें सातवे दिवशींच मृत्यु पावला. पान २३ टीप १२ पहा.

सुज्ञ तुम्ही चतुर तुम्ही कार्याकार्यज्ञ[1]ही तुम्ही थोर ।
व्हाल समर्थ तराया व्यसन कितीही असेल जरि घोर ॥ ११६ ॥

अढळ श्रद्धा तुमची ईशपदीं जरि सदैव राहील ।
तरि तो परमेश शिरीं तुमच्या निज वरदे[2] हस्त ठेवील ॥ ११७ ॥

## उपसंहार.

श्री**शि**वछत्रपतीच्या भक्तकराब्जीं अविज्ञ[3] मी भावें ।
ठेवीं कृति[4] ही स्वल्पा कीं ती तेथ न अनादरा पावे ॥ ११८ ॥

---

१ करण्यास योग्य कोणतें व अयोग्य कोणतें हें जाणणारे. २ वर देणारा. ३ अज्ञ. ४ काव्य.

REFBK-0004510
ग्रा. क्र. ४४९०